# आर्य-स्त्री-रत्नें.

लेखिका

सौ. यशोदाबाई भट.

'शिक्षणाच्या प्रभावानेंच'
या पुस्तकाची कर्त्री.

---

मुंबई.

---

सन १९१७.

मुद्रक-रा. चिंतामण सखाराम देवळे, मुंबई वैभव प्रेस, सर्व्हंट्स
ऑफ् इंडिया सोसायटीज् बिल्डिंग, सँढर्स्ट रोड, गिरगांव-मुंबई.

प्रकाशक, सौ. यशोदाबाई भट, भाई जिवनजीची गल्ली, ठाकुरद्वार, मुंबई.

# प्रस्तावना.

श्रीमती सौ. **यशोदाबाई** यांचें **भट** नांव 'लेखिका' म्हणून महाराष्ट्रीय वाचकांस परिचितच आहे. ललितवाङ्मयांत प्रत्यहीं दृष्टीस पडणारे त्यांचे लेख त्यांच्या लेखनकौशल्याची साक्ष देत आहेत. 'चतुर्थीचा चंद्रमा' दृष्टीस पडल्यावर, असे तारे स्त्री लेखिकांनींच निर्माण करावे, असा सहज उद्गार निघतो. 'मातृशाप' ही लहानशीच गोष्ट ऐतिहासिक माहिती ललितवाङ्मयाच्या वाचकांस देण्याच्या त्यांच्या प्रयत्नाची साक्ष पटवीत आहे, तर 'सुगृहिणी वादावरून सुचलेले विचार' हा लेख वाचतां प्रस्तुतच्या संक्रमणकालांत स्त्रीपुरुषांच्या आचरणाची दिशा रेखाटण्याचा प्रयत्न दृष्टीस पडतो.

प्रस्तुत परिस्थितीचा विचार करितांना, पाश्चात्य संस्कृतीचा परिणाम समाजावर होऊं लागला आहे; व पश्चिमेकडील चांगल्याबरोबर कांहीं वाईट चालींचाही इकडे प्रवेश होऊं पहात आहे. अशावेळीं मूळचें चांगलें असेल तें कायम ठेवून, त्यांतील उणीव असलेलीच तेवढी दूर करणें, व आगंतुक गर्ह्य, त्याज्य, अथवा निंद्य गोष्टींना मज्जाव करणें प्रत्येक समाजभक्ताचें पवित्र कर्तव्य आहे. अशा प्रकारचाच प्रस्तुतचा श्री. सौ. यशोदाबाई भट यांचा प्रयत्न आहे. मानवीय समाजाचें सोपपात्तिक व व्यावहारिक निरीक्षण केलें असतां असें दिसून येतें कीं, स्त्रिया व पुरुष हीं समाजाचीं समबल व समांतर चक्रें आहेत. त्यांतूनही या उभयतांच्या नैसर्गिक भावनांचा उत्क्रांतिदृष्ट्या विचार केल्यास स्त्रियांची अंतः-संस्कृति पुरुषांपेक्षां फार उच्चतम कोटीची आहे असें दिसून येतें. स्त्रीजातीची नैसर्गिक शांतता, त्यांची परोपकारतत्परता, तसेंच अपकारसहिष्णुता, व बऱ्याच प्रसंगीं अपकाराची फेड उपकारानें करणारी त्यांची साधुवृत्ति हीं सर्व त्यांच्या उच्च संस्कृतीची साक्ष देत आहेत.

अशा प्रकारच्या उच्चतम कोटींतल्या स्त्रीरत्नांची ओळख करून देण्याचा श्री. सौ. यशोदाबाई यांचा हा नवीनच प्रयत्न आहे असें नाहीं हें त्यांच्या 'शिक्षणाच्या प्रभावानेंच' या गोष्टींवरून लक्षांत येईल. प्रस्तुतचा त्यांचा प्रयत्न आपल्या भारतवर्षांतील स्त्रीरत्नांनीं उच्चतम आत्मत्याग करून आपल्या भगिनींकरितां तयार करून ठेवलेल्या उज्ज्वल रत्नमालेपैकीं कांहीं रत्नें अर्पण करण्याचा आहे.

प्रस्तुत पुस्तकांत (१) 'पतीचा उद्धार करणारी **चुडाला,**' (२) 'पतींचें व स्वकुलाचें सत्व राखणारी धीर गंभीर **चांगुणा,**' (३) 'पितृकुलरक्षणार्थ आत्मयज्ञ करणारी **सुमती,**' (४) 'सुप्रसिद्ध राक्षससम्राज्ञी महासाध्वी **मंदोदरी,**' (५) 'पतिनिष्ठ **गांधारी,**' या स्त्रीरत्नांच्या उज्वल चरित्रांचे साहाय्यानें भारतीय महिलांचा उच्चतम आत्मत्यागाचा आदर्श आपले बंधुभगिनीं-पुढें ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे, व तो उत्कृष्ट साधला आहे, हें वाचकांच्या लक्षांत येईलच.

सर्वमान्य **रामायण** व **महाभारत** यांतील नायिका **सीतादेवी** व सती **द्रौपदी** या साध्वींचा आपल्या आर्यावर्तातील आबालवृद्धांस उत्तम परिचय आहे; परंतु त्यांच्याच मार्गानें क्रमण करणारे दुसरे महदात्मे ज्या इतर मानवशरीरांतून अवतरण पावले, व ज्यांच्या चरित्र कथानकांचा सर्वांस लाभ मिळत नाहीं, अशा महासाध्वी स्त्रीरत्नांचा आर्यवाचकांनां प्रस्तुत पुस्तकांत परिचय करून दिला आहे. यांपैकीं पहिलें आख्यान सुप्रसिद्ध **योगवासिष्ठांतील** निर्वाण प्रकरणांपैकीं ७७ ते ११० सर्गांचे आधारानें ग्रथित केलें आहे. तिसरें आख्यान **श्रीमन्महा-भारतांतील** वनपर्व १२२ ते १२५ अध्यायांचे आधारें दिलें आहे. बाकीच्या तीन साध्वी वाचकवर्गांना परिचितांपैकींच आहेत.

आर्यस्त्रियांचें राष्ट्रीय, सामाजिक, धार्मिक, व नैतिक बाबींत कोणचें ध्येय असावें, यासंबंधीं एका सुसंस्कृत आर्यविदुषीचे विचार या दृष्टीनें प्रस्तुत ग्रंथाचें फार महत्व आहे. अशा विचारांचा आदर्शभूत असा हा ग्रंथ कदाचित् रुचि-वैचित्र्यामुळें सर्वांस सारखाच आवडणार नाहीं. परंतु सामाजिक बाबतींत श्रम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस हा ग्रंथ नवीन विचार व नवीन मार्ग दाखवील यांत शंका नाहीं.

शेवटीं आमचे मित्र रा. रा. माधवराव भट यांनीं प्रोत्साहन दिल्यामुळें प्रस्तुत ग्रंथाचा अवतार झाला, सबब त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करून ही प्रस्तावना संपवितों.

मि. कार्तिक कृ. ११<br>मंगळवार शके १८३८ } **जगन्नाथ रघुनाथ घारपुरे.**

# माझे दोन शब्द.

प्रसंगानुसार एखादें कार्य घडून येण्यास अगदीं क्षुल्लक कारण पुरतें. प्रस्तुत पुस्तक लिहिण्याची कल्पना अशाच क्षुल्लक कारणानें उद्भवली. सुमारें वर्षापूर्वी मी एका मासिकाकरितां गोष्ट लिहिली; व नेहेमीप्रमाणें ती पाठविण्यापूर्वी स्वतःस वाचून दाखविली. गोष्ट वाचून झाल्यानंतर पांच मिनिटें अगदीं स्वस्थपणें विचारांत गढल्यासारखें केल्यावरून मी ह्मटलें, " कां, कथानकाच्या मांडणींत कांहीं चुकलें कीं काय " ? तेव्हां स्वतः ह्मणाले, " छे, छे, तसें नव्हे. गोष्ट उत्तम साधली आहे. परंतु मी ह्मणतों हीं काल्पनिक चित्रें दाखवून वाचकांच्या मनावर जो परिणाम होईल, त्यापेक्षां आपल्या पौराणिक आर्यस्त्रियांचीं घडीव चित्रें, अशाच मनोरंजक गोष्टीच्या भाषेंत लिहिल्यास जास्त उत्तम होईल. पहा बरें ! रा. वासुदेवराव आपट्यांनीं लहान मुलांकरितां अशा रितीनें केवढें कार्य केलें. ? आपटे आणि किनरे यांच्या सारख्यांनीं अशा कथा लिहाव्यात आणि तुमच्या लेखिकावर्गांत एकीच्याही हातून असा प्रयत्न होऊं नये ? "

" पण भारतभागवतांतील स्त्रीचरित्रें कथापुराणांतून बहुतेक स्त्रीवर्गास माहीतच होतात. " मी म्हटलें.

" परंतु आतां कथा पुराणाला जातो कोण ? बरें घरच्या घरीं आजीबाईकडून अशा गोष्टीं मुलींच्या कानावरून जावयाच्या; परंतु शाळा, अभ्यास, खेळ, इतकें उरकून अशा गोष्टीं ऐकावयास मुलींना फुरसत तरी कोठें आहे ? तेंच चटकदार भाषेंत कोणी गोष्टी लिहील तर मुली व तरुण स्त्रिया सर्वच हौसेनें वाचतील. "

या साध्या बोलण्यावरून माझे मनानें ' अशा गोष्टी आपण लिहून पाहूं या ' असें अगदीं दृढ घेतलें. नंतर मी चिपळूणकरांचें भारत व भागवताची अनुक्रमणिका चाळली. परंतु त्यांत साधारणतः अप्रसिद्ध असें एकही स्त्रीचरित्र सांपडेना. मला तर वाटे कीं निदान पहिलें एक चरित्र तरी लोकांच्या दृष्टिक्षेपांत नसावें. तोंच मला योगवासिष्ठांतील चुडालेच्या कथेची आठवण झाली; व तेंच मीं प्रथम लिहून काढलें; व स्वतःस तें फार आवडून, अशाच भारत-भागवतांतून कथा घेऊन गोष्टीरूपानें लिहिण्याबद्दल प्रोत्साहन दिलें.

असें प्रोत्साहन माझ्या परमपूज्य व प्रिय पतीकडून न मिळतें तर मजकडून हा प्रयत्न झाला असता किंवा नाहीं याची शंकाच आहे.

माझ्या विनंतीला मान देऊन अत्यंत उद्योगमग्न असतांही मुमुक्षुचे संपादक श्रीयुत रा. रा. लक्ष्मणराव पांगारकर यांनीं काळजीपूर्वक हा ग्रंथ वाचून जो अभिप्राय लिहून दिला त्याबद्दल मी त्यांची अत्यंत आभारी आहें. तसेंच आमचे स्नेही श्री. रा. रा. जगन्नाथ रघुनाथ उर्फ नानासाहेब घारपुरे यांनीं प्रस्तावना लिहून व छापण्याच्या संबंधानें सर्व व्यवस्था करून जें साहाय्य केलें त्याबद्दल त्यांचे आभार मानून मी मोकळी न होतां कायमची ऋणीच राहीन.

शेवटीं ज्या जगच्चालकाच्या कृपेनें हा ग्रंथ लिहून पार पडला त्याची अनन्यभावें करुणा भाकून मी पुरें करतें.

ता. ७।१।१७<br>
भाई जिवनजीची गल्ली<br>
ठाकुरद्वार, मुंबई.

सौ. यशोदाबाई भट

# अनुक्रमणिका.

| | | |
|---|---|---|
| | | पृष्ठें. |
| प्रकरण | १ लें–पतीचा उद्धार करणारी चुडाला ... ... ... | १ |
| | २ ,,–पतीचें व स्वकुलाचें सत्व राखणारी चांगुणा ... | २७ |
| | ३ ,,–पितृकुलरक्षणार्थ आत्मयज्ञ करणारी सुमती ... | ४४ |
| | ४ ,,–च्यवन भार्गव व सुकन्या ... ... ... ... | ६५ |
| | ५ ,,–महासाध्वी मंदोदरी... ... ... ... ... | ७५ |
| | ६ ,,–पतिव्रता गांधारी ... ... ... ... ... | ८६ |

# अभिप्राय.

" आर्यस्त्रीरत्नें " ह्या सौ. यशोदाबाई भट यांच्या ग्रंथाची हस्तलिखित प्रत मी समग्र वाचून पाहिली. ग्रंथ वाचून मला फार आनंद झाला. सांप्रतच्या सुशिक्षित तरुणींच्या व कुमारींच्या हातीं द्यायला यापेक्षां अधिक कल्याणप्रद ग्रंथ मिळणें कठिण आहे. चूडाला, चांगुणा, सुमती व तिचीवहीण शांडिल्या, च्यवन भार्गवांची भार्या सुकन्या, मंदोदरी व गांधारी यांचीं मनोरंजक व बोधप्रद चरित्रें यांत सभ्य, सोप्या, पण परिणामकारक भाषेंत लिहिलीं आहेत. सीता सावित्री द्रौपदी इ. सतींचीं चरित्रें सर्वांना माहीतच आहेत. यांतील स्त्रीरत्नांचीं चरित्रें तितकीं लोकप्रसिद्ध नसलीं तरी त्यासारखींच आनंददायक व बोधप्रद आहेत. हीं सहाही चरित्रें मिळून कुमारी, मुग्धा, तरुणीं, युवती, प्रौढा व वृद्धा या सर्व अवस्थांतील सच्छील कसें असतें याचा बोध उत्तम प्रकारें होईल. हीं चरित्रें स्त्रीपुरुषांना सारखींच उपदेशपर आहेत. तरी तीं विशेषतः स्त्रीवर्गाच्या वाचनांत येतील तर त्यांना सतीत्वाचें दिव्य बोधामृत मिळून त्या संसारास धन्यत्व आणतील.

ता. १३।११।१६
मुंबई.

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर.

# पतीला उद्धारणारी चुडाला.

चुडालेची कथा फार प्राचीन काळची आहे. ही कथा वसिष्ठांनीं श्रीरामचंद्रास सांगितली. श्रीरामप्रभूंनीं आपल्या गुरूंना जेव्हां 'महाराज, मला कांहीं बोध करून पावन करा' असें म्हटलें तेव्हां गुरु वसिष्ठ म्हणाले:—

'रामा, तुला पावन कोण करणार? पावनांचा पावन, वेदांचा वेद, देवांचा देव असा तूं पृथ्वीचा भार हरण करण्यासाठीं, रावणादिकांचा संहार करून पृथ्वीला त्यांच्या कचाट्यांतून सोडविण्यासाठीं, अवतार घेऊन आला आहेस, हें मला माहित आहे. पण जनोद्धाराकरितां त्यांना आपल्या सदाचरणानें धडा घालून देण्याकरितां, तूं हें मायेचें पांघरूण घेऊन मला विचारितोसच तर मी थोड्याच कालापूर्वीं होऊन गेलेल्या चुडालेची कथा तुला सांगतों.'

असें म्हणून त्यांनीं गोष्ट सांगण्यास आरंभ केला. ते म्हणाले "रामा, स्त्रिया म्हणजे नरकाचें साधन असा जरी त्यांचेवर ऋषिमुनींनीं शेरा मारिलेला आहे; तरी त्यांच्याखेरीज मोक्ष नाहीं, संसार सुखावह नाहीं." रामा मी जिचें चरित्र सांगणार आहें, त्या स्त्रीरत्नानें दोन्ही कुलांचा उद्धार तर केलाच केला, परंतु शिवाय इतर स्त्रियांचा, बायकांचा देव, गुरु म्हणून मानलेल्या पतीचा सुद्धां उद्धार केला.

रामा, शिखिध्वज नांवाचा एक राजा होता. तो न्यायानें उत्तम रीतीनें राज्य करी. त्याच्या पूर्वसुकृतेंकरून एके दिवशीं एक मुनिश्रेष्ठ त्याच्या राजवाड्यांत आले. राजानें त्या मुनीला आसनावर बसवून, भार्या चुडालेसह त्याची पूजा केली; व कांहीं उपदेश करावा, अशी त्यानें विनंति केली.

मुनीनें त्याचा अधिकार पाहून कांहीं सद्बोध करावा असें ठरविलें. राजापेक्षां चुडालेचा अधिकार अधिक हें साधूनें ओळखिलें. परंतु त्या मुनीनें दोघांनाही उपदेश केला व कांहीं दिवस तेथें वास्तव्य केलें. त्या मुनीचा रोज बोध ऐकतां ऐकतां चुडाला पूर्णत्वाला पोहोंचली. परंतु राजाची मननशक्ति व पूर्वसंस्कार शुद्ध व दृढ नसल्यानें त्याच्या मनावर तेव्हां व्हावा तसा परिणाम झाला नाहीं. रामा, चुडाला बाहेरून व्यावहारिक जनांप्रमाणें वागे. परंतु अंतर्यामीं ती पूर्ण योगी व पूर्णानंदी झाल्यानें तिच्या भावना व तिचें मन हीं तिच्या आटोक्यांत आलीं. यामुळें तिच्या चेहऱ्यावर एक प्रकारचें अलौकिक दिव्य तेज दिसूं लागलें. आपल्या पतीला मायाजाळांत गुरफटलेला पाहून तिला वाईट वाटे. रामा, एक दिवस एकांतांत असतां शिखिध्वज म्हणालाः—

"चुडाले, आपण आयुष्याच्या मध्यावर आलों. आतां आपणाला तारुण्याचे दिवस कांहीं पुन्हां यावयाचे नाहींत. परंतु असें असतां, सुंदरी, तारुण्यांत न दिसणारें तेज सांप्रत तुझ्या मुखावर कां दिसतें ? छे, यापूर्वीं तुझ्या ठिकाणीं मी असलें सौंदर्य कधींच पाहिलें नव्हतें. तसेंच, यापूर्वीं तूं इतकी आनंदी व उल्हासी नव्हतीस. सांग, चुडाले, सांग असा अप्राप्त ठेवा तरी कोणता तुला लाधला आहे ? मला वाटतें, हें राजवैभव, व मजपासून प्राप्त होणारें सुख, याच गोष्टी तुझ्या ह्या दिव्य तेजास कारणीभूत नसतील ना ?"

अरेरे ! राजाचें तें खोंचदार भाषण ऐकून दुसरी अज्ञानी स्त्री खास दुःखी झाली असती. परंतु चुडाला—सुख-दुःख-रहित व मानापमान-रहित अशी चुडाला—शांततापूर्वक स्मित करून म्हणालीः—

"नाहीं, महाराज नाहीं. मला राजवैभवानें अगर विषयसेवनानें ही स्थिति लाधली नाहीं तर गुरुजींच्या बोधामृतपानानें ही स्थिति लाधली आहे. महाराज, लहान मुली खेळूं लागल्या म्हणजे त्यांत एकादशीचा

उपवासही करतात, व द्वादशीचें पारणेंही करतात; परंतु ती एकादशी खरी असते काय ? द्वादशीही मिथ्याचना ? झालें तर मग ! मलाही या राजवैभवाचें कौतुक वाटत नाहीं. पतिदेवा ! उद्यां हें राज्य जरी विलयास गेलें तरी मला लवमात्रही खेद होणार नाहीं. माझ्या ऐहिक सौख्याच्या भावनांचा गुरुमाउलीच्या कृपेनें नायनाट झाला आहे. माझ्या देवा ! आपण त्या ज्ञानौघांत स्नान केलेंत ना ? मग आपली नाहीं का अशी वृत्ति झाली ? आपण अद्याप या नाशवंत जीविताला भुलतां काय ? हें राज्यवैभव आपणाला खरें वाटतें काय ? नका, महाराज नका या मोहांत शिरूं. "

रामा, स्त्री म्हणजे आपली दासी, ज्ञानानें कमीच, आपलाच अधिकार तिला पावन करून घेण्याचा ही समजूत दृढ असल्यानें, राजा शिखिध्वजाला चुडालेचें तें भाषण ऐकून थोडा रागच आला तो उपहासपूर्वक म्हणालाः—

" अरेरे ! आज मला पूर्ण प्रचिती आली. चुडाले, तुम्हां बायकांची जातच अशी आहे ! बरें. हा त्यांचा नैसर्गिक धर्मच आहे. चुडाले, असत्य भाषण जणूं काय यांच्या पांचवीला पुजिलेलें ! तुम्ही बायका, एक बोलावयाच्या, दुसरें करावयाच्या आणि मनांत असावयाचें तिसरेंच. आणि अगदीं गुप्तपणानें चौथेंच तुमच्या हातून व्हावयाचें ! चुडाले, जर तुझें गुपित मला सांगतेस—मग तें कितीही वाईट असतें तरी मला वाईट वाटलें नसतें; पण—पण तूं जो हा ब्रह्मज्ञान प्राप्त झाल्याचा आव आणिलास तो पाहून मला हसूंच येतें. वेदांत आणि ब्रह्मज्ञान इतकें सोपें आहे काय ? युगानुयुगें हटयोग करणाऱ्यांना जें लाधत नाहीं तें ब्रह्म तुझ्या सारख्या यःकश्चित् स्त्रीला सहजगत्या प्राप्त झालें अँ ? तें इतकें वाटेवरच लोळूं लागलें आहे नाहीं ? बाकी तूं चतुर खरीच ! तुला इतकें बेमालूम बोलतां तर आलें कीं नाहीं ? तुला विषयसुख स्पर्शही करीत नाहीं ना ? सुख दुःख तुला सारखेंच नव्हेकां ? अस्सें. मला तरी हें आजच कळलें.

पण कायहो राणीसाहेब, आपण तर व्यवहाराच्या सर्व गोष्टी पूर्ववत करितां हें कसें ? आपणांला अत्तराचा सुगन्ध येतो काय ? छेः ! संगीताचे आलाप आपल्या कर्णांना आनंद देत नसतील नाहीं ? तें ऐकून आपलें चित्त गानलुब्ध होणार नाहींच ! चुडाले ! मी तुला एकच जाब विचारितों कीं, तूं जर अशी निर्विकार सुखदुःखरहित आहेस तर पूर्वींच्याच प्रमाणें हें वैभवयुक्त आचरण तूं कां करतेस ? तुझ्या देहावर हे अलंकार कां ? हातांत गोटतोड्या ऐवजीं दोरखंडें बांधिलीं तरी तुला तीं सारखींच. नाकांत या सुंदर मोत्यांच्या नथे ऐवजीं गवतांच्या काड्यांचा विणलेला झुबका घालायला काय हरकत आहे ? पण कायग चुडाले ! आजपर्यंतचे हजारों ऋषी आणि मुनि ‘ मी ब्रह्म ओळखलें ’ ‘ मला ज्ञान झालें ’ असें स्वतः कधीं सांगत नसत. आणि तूं तर त्याचें पुराण माझ्या पुढें सांगितलेंस हें कसें ? ”

रामा, पतीचें हें भाषण ऐकून चुडालेच्या नेत्रांतून घळघळ अश्रु वाहूं लागले. ते अश्रू राजाच्या बोलण्यामुळें आले होते काय ? छे ! तीं आंसवें आपल्या भ्रताराचें अज्ञान व तो मायाजाळांत गुरफटलेला आहे हें पाहून आलेलीं होतीं. चुडाला मनांत ह्मणालीः— “अरेरे ! गुरुवर्यांनीं मला व नाथांना बरोबर बोधामृत पाजलें. पण तें यांच्या कां बरें पचनीं पडलें नाहीं ? अरेरे ! ‘ पतीवाचून कोणतेंही सुख भोगूं नये ’ हा पातिव्रतेचा धर्मना ! पण मी तर अविनाशी व अलौकिक ब्रह्मानंदाचें सुख एकटीच भोगतें. नको-नकोच असें. आजपर्यंत मी त्यांच्या बरोबर हें बाह्य वैभव व सुख भोगलें—अरेरे ! तें क्षणभंगुर, अशाश्वत तरी होतें ! पण हें चिरकालिक सुख मी त्यांच्याविना एकटी कशी भोगूं ? नाहीं. नाथा ! नाहीं ! बस्स हीच प्रतिज्ञा कीं, पतीला ज्ञानामृताचे घुटके पाजशील, तेव्हांच चुडाले, तूं आपलें कर्तव्य केलेंस असें होईल ! तोंपर्यंत तुझें ज्ञान फुकटच. पण हें व्हावें कसें ? होईल-होईल तेंही शक्य होईल. प्रयत्नांतीं परमेश्वर खास

मिळणारच. माझ्या गुरुमाऊली, ये-ये; धांवत ये. आणि या आपल्या कन्येच्या मस्तकीं वरदहस्त ठेव. दे—माझे देवते दे—मला या मंगलकार्याच्या यशाला अनंत आशीर्वाद दे. हो—कां नाहीं देणार ? मी करणारच रायाचा उद्धार ! ”

चुडालेनें रोज राजाला अनेक रीतीनें बोध करण्याचें सुरू ठेवलें. पण रामा ! राजाला वाटेच कीं, ही माझी दासी आणि ही गुरुत्वाचा आव आणून मला उपदेश कशाचा करिते ? रामा मुख्यतः विश्वास-विश्वासाच्या बळावरच या सर्व गोष्टी ठसणें अवलंबून आहे. ही गोष्ट चुडाला पूर्ण जाणून होती. रामा, माता आपल्या प्रेमळ बाळा साठीं ‘ चाऊम्यांऊ ’ चे घास मांडून त्याला कसें जेऊं घालते ! त्याप्रमाणें चुडालेनें चालविलें. तिनें अनेक परीनें अनेक वेळां त्याला बोध करावा. कालांतरानें तिचा प्रयत्न सफल झाला-राजाला वैराग्य प्राप्त झालें.

राजानें ती गोष्ट पत्नीला कळविली. रामा, पती विरागी झाला तर स्त्रियांना बरें वाटेल काय ? पण या साध्वीनें आपण होऊनच पतीला विरागी करण्याची खटपट केली ना ? राजाचें भाषण ऐकून आपल्या श्रमाचें सार्थक झालें ह्मणून चुडालेला क्षणभर संतोष वाटला.

ती ह्मणालीः—“ ठीक ठीक. आजपर्यंत अशाच रीतीनें थोर थोर राजे विरागी होऊन गेले. आतां आपण अंतरीं ज्ञान सांठवा. लोक कल्याणार्थच फक्त राज्य करा. ”

“ छे, छे. मला हें राज्य नको आणि त्या वैभवाचीही पण जरूर नाहीं. चुडाले, मी वनांत जाईन. सर्वसंग सोडून वनांत गेल्यावर मला ब्रह्मज्ञान लाधेल. या राज्यांत राहून तें घडणें नाहीं. खेरीज तेथें मला उत्तम गुरुही भेटण्याचा संभव आहे. ”

हें राजाचें भाषण ऐकून राणीला पुनः खेद वाटला.

रामा, चुडालेसारखा गुरू सोडून राजा वनोवनीं गुरूसाठीं हिंडणार हें ऐकून हंसूं नको. बाबारे, असेंच आहे. सहजप्राप्त चिंतामणी टाकून गारगोट्या वेंचणारे असेच लोक जगांत फार असतात.

चुडाला पुन्हां त्याला म्हणाली:–“ कांत ! आपण गुरूसाठीं अरण्य कां सेवितां ? महाराज, अंतःकरण शुद्धतेच्या पूर्णत्वाला पोहोंचल्यावर गुरु आपल्याकडे धांवत येतात. आपण सर्वसंग त्यागीन म्हणतां, पण नुसत्या वस्तूंचा त्याग करून उपयोग काय ? **नुसती अंगाला राख फांसून ब्रह्मज्ञान मिळतें तर गर्दभ उकिरड्यावर नाहीं का लोळत** ? महाराज, मनःशुद्धि–मनःशुद्धि फक्त पाहिजे. त्यावांचून सर्व खटाटोप व्यर्थ आहे. नुसत्या त्रिकाल स्नानानें काय बरें होणार ? मग जळांत राहणारे जलचर कां बरें उद्धरूं नयेत ? तरी आपण मनांतून निर्विकारवृत्ति ठेवून लोककल्याणार्थ राज्यसूत्रें चालवा. यांतच तुम्हीं आपलें कर्तव्य केलें असें होईल. ”

रामा, यावर जेव्हां राजा कांहीं बोलला नाहीं, तेव्हां तिला वाटलें कीं, पतीला आपलें बोलणें पटलें.

एक दिवस रात्रीं ती गाढ झोंपीं गेली आहे असें पाहून त्या दुर्दैवी राजानें गुपचुपपणें अरण्याचा मार्ग धरला. राणी चुडाला जागी झाली तों शय्येवर पति नाहीं असें पाहून तिनें चाकरांकडून सर्व वाड्याभर शोध केला. पत्ता लागत नाहीं असें पाहून तिनें प्रधानाला बोलावून आणविलें, व राजाचें पूर्वोक्त भाषण सांगून ती ह्मणाली:—

“ बहुधा स्वारी वनांत गेली असावी. तरी चोहोंकडे दूत पाठवावे व राज्याच्या हितासाठीं ही बातमी गुप्त ठेऊन राज्यकारभार नेहमीं प्रमाणें आपण चालवावा. ” असें सांगून तिनें प्रधानाला निरोप दिला.

रामा ! राजा राजवाड्यांतून बाहेर पडला तो अरण्यमार्गानें चालूं लागला. ज्याला नेहमीं मऊ मऊ रुजाम्यावरून चालण्याची संवय त्यानें

आज काय्याकुय्यांतून चालावें काय ? रामचंद्रा, अरण्यवास पत्करल्यानें आपणाला ज्ञानप्राप्ति होईल, या कल्पनेला बळी पडलेला तो राजा वस्त्रें भूषणें सांडून मोकळा झाला. अंगाला सुवासिक उट्या, अत्तरें हेंच ज्याला माहीत, त्यानें अंगाला राख फांसली, केसांचा जटामुकुट बांधला, व फक्त लंगोटी नेसून स्वारी हिमालयाच्या पुढें मेरुपर्वताच्या एका दरींत आली. त्या ठिकाणीं असे पुष्कळ लोक राहात होते. त्यानेंही तेथें एक गुंफा तयार केली. त्रिकाळ स्नान करावें, फलमूलांचाच आहार करावा, व ईश्वरसेवेंत काळ घालवावा, असा त्याचा रोजचा क्रम होता. तथापि त्याच्या चित्ताची तळमळ जाईना. चुडालेसारखी शांति आपणास कशानें प्राप्त होईल ! हा निदिध्यास त्याला लागला.

रामा ! राजाला ज्ञानप्राप्ती झाली नव्हती. त्यायोगें त्याचें चित्त स्थिर नव्हतें. तो असमाधानी असल्यानें त्याची अशी स्थिति होणें सहाजिकच होय !

रामचंद्रा ! प्रधानाकडून राजाचा शोध लागेना तेव्हां चुडाला त्याला ह्मणाली:-" राजनिष्ठ प्रधानजी, धन्याच्या, व प्रजेच्या कल्याणाकरितां तुम्हीं चतुराईनें ही वार्ता कोणाला कळूं न देतां, राजशकट हांकावा. स्वामींचा शोध मीच लावतें. मी आपणास जेव्हां बोलाविन तेव्हांच मात्र या. सर्व कारभार मी तुमच्यावरच सोंपवितें. माझ्या महालांत मी निवांत बसणार. तेथें कोणीही येवूं नये." नंतर तिनें श्रीगुरूचें ध्यान केलें. तत्क्षणीं प्रगट होऊन योगी म्हणाले:—" शाबास, बेटा शाबास. मला कां आळविलेंस ? "

" भगवन् ! मला योगसिद्धि करून घेणें आहे. "

" ठीक आहे. " असें ह्मणून योगिराजांनीं आसन कसें घालावें, आहार, निद्रा वगैरे अल्प प्रमाणांत ठेवून योगसिद्धि कशी करावी तें कथून आपल्या, देखरेखीखालीं अवघ्या दहा दिवसांतच तिला योगानंदांत पोहा-

वयास शिकविलें. नंतर पतिशोधास उत्सुक अशी ती चुडाला आपल्या घोर प्रयत्नानें पूर्ण योगी बनली. रामा, गुरुकृपा असल्यावर काय उशीर ? तिला योगसिद्धि प्राप्त करून देऊन योगी स्वस्थानीं गेले.

राणी चूडालेनें पुन्हा एकदां प्रधानाला राज्य कारभार नीट चालविण्याविषयीं सांगून, आपणाला आतां कोणी भेटूं नये अशी ताकीद देऊन, आपल्या महालाचे दरवाजे बंद करून तिनें आसन मांडिलें. रामा, त्या योगिनीचें सामर्थ्य काय सांगावें ? लिंग देहानें नद्या, पर्वत, गुहा, दऱ्या, फार काय पण स्वर्ग पाताळ वगैरे ठिकाणीं तिनें पतीचा शोध केला. पण पतीचा पत्ता कोठेंच लागेना. हें पाहून तिला फार वाईट वाटलें. ज्याच्यासाठीं आपण सिद्धि प्राप्त करून घेतल्या, त्याचा पत्ता न लागेल तर माझे श्रम व्यर्थच होणार ना ! इतक्यांत तिला सुचलें कीं, इतका हा खटाटोप पाहिजे कशाला ! आपण योगसमाधीनें ज्ञानदृष्टीनें राजा कोठें आहे तें शोधून काढूं ! शोधतां शोधतां राजा जेथें गुंफा बांधून राहिला होता तें स्थान दिसलें. रामा, राजा आपल्या पूर्वदेहांत आहे हें पाहून तिला इतका आनंद झाला कीं, त्या आनंदभरांत ती नाचूं लागली. तिनें आपल्या पतीचा तो कमंडलू, तें हरणाच्या कातड्याचें आसन, तो जटामुकूट, असलें वैभव अवलोकन केलें. तिनें विचार केला कीं, याला कांहीं दिवस असाच येथें राहूं द्यावें. कारण या रीतीनेंच त्याच्या चित्ताची शुद्धि होईल, आणि मग आपला कार्यभाग करण्यासही ठीक पडेल.

नंतर पुन्हा तिनें आपलें चित्त राज्यकारभारांत घालून प्रधानाच्या साह्यानें ती राज्य चालवूं लागली. आणखी तीन वर्षांनंतर तिनें पतीकडे जाण्याचें ठरविलें.

रामा ! राजा अत्यंत उदासीन बनला होता. पूर्वी आपणांस गुरु भेटले. परंतु त्यावेळीं आपण त्यांच्या उपदेशाचें चीज केलें नाहीं, असे विचार

त्याच्या मनांत येऊन त्याला पश्चात्ताप होई. तो रात्रंदिवस ' गुरुमाऊली गुरुमाऊली. ' म्हणून गहिंवरे. त्याचें अंतःकरण त्या गळणाऱ्या अश्रूंनीं शुद्ध झालें होतें. परंतु त्याच्या मनाला अद्याप शांती प्राप्त झाली नव्हती. चुडाला आपणाला नित्य परब्रह्मसुखाच्या गोष्टी सांगे, परंतु तिला म्यां दुष्टानें झिडकारिलें. ' आतां पुन्हां मला गुरु भेटतील का ? मला पावन करून घेतील का ? ' अशा प्रश्नांच्या जंजाळांत तो तळमळत होता.

इकडे त्याच्या उद्धारासाठीं तळमळणारी चुडाला तीन वर्षांनंतर पुरुषवेष घेऊन त्याच्याकडे आली. तिला अष्टसिद्धि प्राप्त झाल्यानें तिला वाटेल तें रूप घेतां येई, व पाहिजे तें करतां येई. रामा, चुडाला येऊन अंतराळीं उभी राहिली. तिला पाहून राजाला वाटलें कीं, आपण गुरूसाठीं तळमळत आहों म्हणून माझा उद्धार करण्यासाठीं हे महंत आले आहेत. त्याला अत्यानंद झाला.

" या, गुरुराया या. " असें म्हणून त्यानें आपल्या गुंफेंत आसनावर तिला बसविलें. रामा, चुडालेला राजाची आपणावर श्रद्धा बसवून घेणें होतें, म्हणून ज्या आसनावर ती बसली होती तें आसन तिनें स्वसामर्थ्यानें अंतराळीं राहूं दिलें.

राजा म्हणालाः—" महाराज ! आपण कोण ? मला तर वाटतें कीं आपण प्रत्यक्ष ब्रह्मदेव आहां ! किंवा विष्णु ? कीं शंकर ? महाराज, मी राज्यत्याग करून येथें आलों. माझा उद्धार करा. प्रभो ! मला वाटतें, आपण माझ्या तळमळीचा वेग आपल्या ज्ञानसामर्थ्यानें जाणला नाहीं ना ? गुरुराज, मनाच्या शांतीसाठीं फोडलेला टाहो ऐकून तर दयाघना, आपण इकडे वळलां नाहीं ना ? महाराज, मला आपलें नांव कळेल का ?"

" ऐक, राजा ऐक. मी कोणी देव नाहीं. नारदाचा पुत्र जो कुंभक तो मी आहें. राजा, आश्चर्य मानूं नको ! तुला मी थोडा पूर्वेतिहास सांगतों तो ऐक. पूर्वीं एका पर्वणीच्या वेळीं देव गंधर्व वगैरे आपापल्या

स्त्रियांसहवर्तमान सरस्वतीवर स्नानाला आले. राजा, माझे पिते आपली तंबोरी खांद्यावर टाकून, जवळच एका झाडाखालीं निवांत बसले होते. परंतु गंधर्वपत्न्यांची ती जलक्रीडा व अंगाला चिकटून बसलेलीं ओलीं वस्त्रें, वगैरे पाहून माझे पिते कामदेवाच्या आधीन झाले. त्याचा परिणाम म्हणजे माझा जन्म एका कुंभांत झाला. आणि म्हणूनच माझें नांव कुंभक असें पडलें. मी नेहमीं तिन्ही लोकीं हिंडतों. माझ्या पित्यामुळें मला देवादिक अत्यंत मान देतात. "

" मुनिवरा, या दासाला समाधान नाहीं. राज्य व स्त्री यांचा त्याग करून मी येथें आलों. परंतु त्यामुळें माझ्या मनाला शांति न वाटतां तळमळच वाटते. तरी महाराज, या दासाला आपल्या सत्संगाचा लाभ घडवाल काय ? "

" होय. राजा, जशी आमच्या संगतीची तुला उत्कंठा आहे तशीच मुमुक्षूच्या संगतीवांचून आह्मांला तरी शांतता कोठें वाटते ? राजा ! तुझ्यासाठीं मी येथें राहतों. नाहीं, मला राहावेंच लागेल. "

रामा, नंतर कुंभक त्या ठिकाणीं राहिला. तो त्या राजाला नित्य बोध करी. एक दिवस तो राजाला ह्मणालाः—

" राजा मी तुला थोडा इतिहास सांगतों. एका महाबलाढ्य अशा हत्तीला पकडण्याचें एकानें योजिलें. एक भला मोठा खड्डा खणून नंतर त्यावर अगदीं पातळ फळ्या टाकल्या, त्यावर थोडी माती पसरली. पुढें पावसाळ्यांत तेथें गवत उगवलें. साहजिकच तें कोवळें लुसलुशीत गवत खाण्यास तो हत्ती तेथें आला. तो तेथें जातो न जातो तोंच तो त्या खड्ड्यांत पडला. नंतर पारध्यानें त्याला बांधून अंकुशाच्या योगानें त्याला बराच वठणीवर आणला. परंतु पुढें केवळ दैवयोगानें तो हत्ती सुटला. महाताला तें समजतांच तो त्याच्या मागें येवून एका झाडावर बसला. आतां उडी टाकून

अंकुशाच्या चोंचणीनें पुनः त्यास बांधणार तों हत्तीनें मान हलवली. पारध्याची उडी चुकून तो हत्तीच्या पायाशीं पडला. हत्तीनेंही आपलें स्वातंत्र्य हरण करणाऱ्याला पायानें तुडविण्याचें मनांत आणिलें. परंतु पुन्हां त्याला त्याची दया येऊन सोंडेनें त्याला बाजूला फेंकून तो हत्ती स्वच्छंदानें हिंडूं लागला. परंतु पारध्यानें पुनः अत्यंत परिश्रमानें त्या हत्तीला पकडलें. राजा, आपल्यापुढें पडलेल्या शत्रूला जर त्याच वेळीं तो ठार करिता तर त्याला पुन्हा पराधीनता कां आली असती ? पण बाबा, हें प्राक्तन ! दुसरें काय ? त्याच प्रमाणें राजा, एका ब्राह्मणानें ऐकलें कीं, अमूक पर्वतावर एकवीस दिवस अनुष्ठान केलें कीं, चिंतामणी प्राप्त होतो. राजा, तो दरिद्री ब्राह्मण तेथें गेला व तप करूं लागला. राजा, त्याच्या पूर्वपुण्याईनें तिसरेच दिवशीं चिंतामणि मिळाला. परंतु त्याला वाटलें कीं, छे ? तो वीस दिवसांनंतर येणार. तेव्हां त्यानें तो चिंतामणी भिरकावून दिला. नंतर एकविसाव्या दिवशीं त्या ब्राह्मणाला एक काचेचा खडा मिळाला. राजा, त्या हर्षांत त्यानें घर गांठलें. व चिंतामणि मिळाल्याचें आपल्या पत्नीला सांगून, आपलें सर्व द्रव्य दान करून तो वनांत आला. तेथें त्यानें खड्याची पूजा केली व इच्छित मागूं लागला. पण तो काचमणी इष्ट वस्तु कशी देणार ? तेव्हां यांत मजा अशी झाली कीं, होतें तेंही गेलें व चिंतामणी मिळाला नाहीं तो नाहींच. राजा, स्वस्थ मनानें यांतील गूढ ओळख. पहा आपल्या मनांतला विचार. ”

“ नाहीं. दयासागरा मला कांहींच कळलें नाहीं, स्वामिन्, गज कोण ? महात कोण ? प्रथम धरला कसला, सुटला कसा ? बरें, पुन्हां त्यानें पारधी पायाखालीं पडला असतां त्याला मारलें कसें नाहीं ? तसेंच चिंतामणि, ब्राह्मण, काचेचा खडा वगैरे मला कांहींच कळलें नाहीं. तरी पुनः सांगा. ”

" ऐक, राजा हे दोन्ही दृष्टांत तुझ्याच पूर्वचरित्राचे आदर्श आहेत. राजा, हत्ती ह्मणजे तूंच. तूं मूळचा स्वतंत्र परंतु अज्ञानाच्या खड्ड्यांत पडून परतंत्र झालास. राजा, पारधी ह्मणजेच अज्ञान. त्या अज्ञानानें तुला संसाराशीं जखडून टाकिलें. परंतु ज्याप्रमाणें हत्तीला सुटण्याची इच्छा झाली, तशीच तुलाही झाली, व त्यामुळें तुझ्या घरीं महामुनीश्वर येऊन त्यांनीं तुला सदुपदेश केला. परंतु तुजपुढें अज्ञान आडवें पडलें. राजा, त्याच वेळीं ज्ञानबलानें त्या अज्ञानरूप शत्रूला मारतास तर पुन्हां बंधन कां पावतास ? राजा, अज्ञानामुळेंच तुला अविश्वास वाटला ना ? तो कोणाबद्दल हें तुझें तूंच आपलें ओळख. आणि ज्याप्रमाणें त्या ब्राह्मणानें अनुष्ठान केलें असतां चिंतामणी मिळतो असें ऐकलें, तसेंच तं गुरूवांचून मुक्ति नाहीं हें दृढ मानल्यानें त्याच्याप्रमाणें तुला चिंतामणि लाधलेला—सत्संग लाधलेला तूं फेटाळलास. राजा हा सत्संग ह्मणजेच तुझी पत्नी चुडाला. राजा तुला वाटे कीं, हीं आपली पत्नी—स्त्री—हिला कसलें ब्रह्मज्ञान कळणार ? याप्रमाणें चिंतामणि सोडून अरण्यांत येऊन तूं ही यातायात केलीस ! राजा, त्या ब्राह्मणाप्रमाणें तुझें द्रव्य—तुझें राज्य—सोडून अरण्यांत आलास. राजा, सांग पाहूं, चुडालेचें न ऐकतां वनांत येऊन तूं अधिक तें काय मिळविलेंस ? हो खरेंच. तुला वाटेल कीं, मला चुडाला काय माहीत ? परंतु आह्मी येथें बसून कोठें काय चाललें आहे हें जाणतों. राजा, तुला आमच्यासारख्याच्या संगतीचा ध्यास लागलेला समजूनच मी येथें आलों ना ? "

" महाराज, या दासाला आपल्या सामर्थ्याविषयीं शंका कशी येईल बरें ? आपण मला प्रत्यक्ष देव भेटलां. या पुढें मी आपले पाय सोडणार नाहीं. मला आतां पाठीमागें कसलाही पाश नाहीं. राज्य, पत्नी वगैरे सोडून मी येथें आलोंच आहें. आतां स्वामी सांगतील त्या मार्गानें जाऊन जन्माचें सार्थक करावयाचें. "

यावर जरा हंसून कुंभक ह्मणाले:—" पण कायरे, तूं येथें येऊन अधिक तें काय केलेंस ? राजा, तेथें तुझ्या डोक्यावर मुकुटाचा भार होता; येथें जटांचा आहे. तेथें सेवकजन सेवा करीत; येथें इंद्रियें करतात. राजा, तेथें तूं पंचपक्वान्नें खात होतास, येथें फळें खातोसच. म्हणजे तुझ्या भुकेचें शमन—पोट भरल्याचा आनंद सारखाच ना ? तेथें गजनीच्या मऊ मऊ गाद्यांची शय्या होती; येथें वाळलेल्या गवतावर निजतोस. पण राजा, झोपेचें सुख तुला सारखेंच कीं नाहीं ? तेथें राजवाडा होता; येथें तूं झोपडीच्या छाये खालीं आहेस. तात्पर्य, तुला वाटतें तसें तूं कांहीं त्यागिलें आहेस, असें मला नाहीं वाटत ! "

आधींच मनस्तापानें दुर्बळ झालेला राजा सताऊन म्हणाला:— " सांगा, महाराज सांगा. मी कशा कशाचा त्याग करूं ? अरेरे ! मी या आपल्या सुंदर देहाकडे पाहिलें नाहीं, उन्हांत याला भाजून काढलें. पावसांत भिजविलें. उभा तर उभाच राहिलों. अनेक प्रकारचें कर्म करून देहाचें नुसतें मढें बनवलें ! आतां अधिक काय करूं ? कसला त्याग करूं ? "

असें म्हणून त्यानें गळ्यांतील माळा तडातड तोडून टाकल्या. कफनीच्या चिंध्या चिंध्या केल्या. फलमूलांची परडी भिरकावून दिली. पाण्याचा तुंब्याही फेंकून दिला व शेवटीं गुंफा सोडून दूर जाऊन बसला. रामा, तें त्याचें करणें पाहून कुंभक विस्मयानें पाहूं लागला. राजाच्या अज्ञानाची त्याला कींव आली. तो त्याजपाशीं जाऊन म्हणाला:—

" राजा हें तूं काय केलेंस ? बाबारे, आतां त्वां जरी फळें खाल्लीं नाहींस, पाणी प्याला नाहींस, तर काय वृक्ष ' खा ' ' पाणी पी ' असें म्हणतील ? राजा त्या वस्तु मोडून तोडून तूं त्यांचा त्याग काय केलास ? अरे, त्या काय तुला चिकटून कां बसल्या होत्या ! "

राजानें बराच विचार करून शेवटीं ठरविलें कीं, आतां काय राहिलें ? बायको सोडली, राज्यही त्यागिलें, छत्रेंही नाहींत आणि चामरेंही नाहींत; आतां फक्त हा जीवच काय तो बाकी राहिला आहे तेवढा त्यागून या कटकटींतून सुटावें, म्हणून त्यानें झाडांच्या सालीचा एक फांस तयार केला व तो मानेभोंवतीं खेंचला. आतां नेट करून तो ओढणार तोंच कुंभकानें जाऊन त्याला मोकळें केलें. आणि त्याला म्हणाला, ' वेड्या, जीव दिल्यावर मग काय राहिलें ? मग तुला सद्गति कशी मिळणार ? तुला जें ज्ञान पाहिजे आहे, जें सुख हवें आहे, मनाला शांति मिळावी म्हणून तुझी जी धडपड, ती या प्राणघातानें सिद्धीला जाईल काय ? नाहीं. राजा, आपले डोळे उत्तम असावे असें वाटणाऱ्यानें ते फोडण्याला जसें प्रवृत्त व्हावें; जिभेला चव नाहीं म्हणून ती कापून टाकण्याला उद्युक्त व्हावें, तशीच ही तुझी कृति आहे. राजा, आजपर्यंत तूं निष्काम कर्म केलेंस राज्याचा मोह सोडून, येथें येऊन शरिराला कष्ट दिलेस. त्या योगानें तुझी चित्तशुद्धि झाली. परंतु जर तुला खरें ज्ञान पाहिजे असेल, ब्रह्मानंदांत डोलावयाचें असेल तर तो त्याग–त्याचा त्याग-कर, त्याला अंतःकरणांत थारा देऊं नकोस. "

रामा, पुन्हां पत्नीपति छे, छे—गुरु शिष्यांची जोडी स्नान संध्या करून फलाहार करून बसली. नंतर राजानें पुनः विचारलें:— " महाराज, त्याचा ह्मणजे कशाचा त्याग करूं ? हें कृपा करून सांगा. "

" अहंकार ! बाबारे अहंकार. तुला जें हें चालतें बोलतें शरीर मी असें वाटत आहे, तो मीपणा ती 'मी' ची आसक्तिच तुझ्या ज्ञानप्राप्तीच्या आड येत आहे. राजा तूं ह्मणतोस कीं, ' मी ' ह्मटल्यावांचून व्यापार चालणार कसा ? कबूल. परंतु त्या ' मी ' मध्यें जो अहंकार, जो गर्व आहे तो तूं सोडलास आहेस काय ? राजा, मघां मी तुला त्याग कर ह्मणतांच तुझ्या अहंकाराच्या उमाळ्यानेंउसळी खाल्लीना ? ह्मणूनच तूं प्राणनाशाला

तयार झालास. परंतु तूं चुडालेला जेव्हां झिटकारून बोललास कीं, वृद्धपणीं विषयांत दंग असतेस, तेव्हां ती स्त्रीस्वभावाप्रमाणें रडली काय ? तिनें तुझी समजावणी करण्यासाठीं तुझे पाय धरले काय ? त्यावर अश्रूंचें सिंचन केलें काय ? नाहीं. राजा, नाहीं ! तें कां बरें ? तर तिचें देहावरचें 'मी, मी ' पणाचें—अहंकाराचें—पटल नाहींसें झालें होतें. ती ब्रह्मानंदाचे घोट प्याली होती. त्या ठिकाणीं कोणीं वंदिल्यानें अगर निंदिल्यानें काय होणार होतें ? राजा, तूं म्हणशील कीं मी चांगला हातापायांचा असतांना, शरिराला लागलें किंवा दुखापत झाली तर मनाला तळमळ लागत असतांना शरीर माझें कसें नव्हे ? राजा, हा सर्व भ्रम आहे. कसा तो पहा. समज, अंधारांत दोरी पडली असतांना, सर्प म्हणून भ्यालेला प्राणी, जरी दुसऱ्यानें अरे तो सर्प नाहीं, ती दोरी आहे, असें सांगितलें, तरी तो प्राणी त्या दोरीला स्पर्श करण्यास भितो. कारण त्याला ती दोरी सर्पच आहे असा भ्रम झालेला असतो. तो त्याचा भ्रम नाहींसा करण्याचा उपाय म्हणजे दिवा घेऊन त्याला ती दोरी दाखविणें हा होय. राजा, त्याप्रमाणेंच या वर वर दिसणाऱ्या मोह, जालाला भुलणाऱ्या मानवाला ज्ञानदीप घेऊन शोधल्याखेरीज आपली चूक समजत नाहीं. ''

रामा, अशा रीतीनें त्या चुडालेनें—त्या कुंभकरूपी चुडालेनें—त्या राजाला गुरूपासून संपादिलेलें ज्ञान सांगितलें. अनेक दृष्टांत दिले व याप्रमाणें राजाला ज्ञानप्राप्ति झाली. परंतु त्याच्या चित्ताला खरें समाधान वाटेना. तेव्हां तिनें त्याला समाधि लावण्यास शिकविलें. त्याची तशी समाधि लागतांच तिला अत्यानंद झाला त्याच्या शरीररक्षणाची व्यवस्था करून त्याच्या अंगावर वस्त्र घालून ती आपल्या मंदिरांत परत आली. तेथें थोडे दिवस राज्यकारभार पाहून ती पुन्हां वनात आली. व राजाची समाधी उतरावी म्हणून त्याला थापटून

हाका मारून, व संगीत गायन करून पाहिलें. परंतु तो भानावर येईना तेव्हां ती घाबरली. राजा मरण तर नाहींना पावला ! अरेरे ! मग मला तरी हा देह ठेवून काय करावयाचें आहे ? असे मनाला प्रश्न करून तिनें सूक्ष्मरूपानें त्याच्या देहांत प्रवेश केला.

त्याचा प्राण आहे, फक्त तो समाधिसुख अनुभवीत आहे, हें पाहून तिला बरें वाटलें.

ती बाहेर येऊन कुंभकरूपांत गाऊं लागली. राजा भानावर आला खरा, पण त्याला डोळेही उघडण्याची शक्ति राहिली नव्हती. पण जिच्यापुढें अष्ट-सिद्धि हात जोडून तयार तेथें काय कमी ? कुंभकरूपी चुडालेनें आपला हात राजाच्या अंगावर फिरवितांच त्याला पूर्वीप्रमाणें शक्ति आली.

" धन्य ! धन्य ! ! गुरुराज, धन्य समाधी ! धन्य तो आनंद ! ! अरे पण तें सुख, तो आनंद मी केवळ क्षणभरच भोगला. आपण मला त्या समाधींतून कां बरें जागें केलें ? "

राजाला त्या समाधिसुखानें इतका आनंद झाला कीं, सांगतां सोय नाहीं ! त्यानें कुंभकाच्या पायांवर लोळण तर किती वेळां घेतली ! अशा रीतीनें बराच काळ झाला. कुंभकानें त्याचें स्वस्वरूप त्याला दाखविलें त्याचा अहंपणा पार लयाला गेला. ते गुरुशिष्य शरीरानें फक्त भिन्न, बाकी एकजीव झाले. नंतर राजाची कसोटी पाहण्याचें चुडालेनें मनांत ठरविलें.

माझ्या वाचक भगिनीनों ! आजपर्यंत पुरुषांनीं पूर्वकाळापासून तो हल्लींच्या काळापर्यंत बायकांची कसोटी पहाण्याची चाल आहे. अशी उदाहरणें किती तरी झालेलीं आहेत, आजलाही होत असतील, पुढेंही होतील. परंतु पतीला कसाला लावणारी फक्त चुडालाच. बायांनो ! हा अधिकार सर्वांना नाहीं. तो अधिकार यावयाला तसेंच अलोट ज्ञान, चतुरता व अंगीं सामर्थ्य असलें पाहिजे, व मुख्यतः गुरुकृपा पाहिजे. असो.

आपला बोध पूर्ण ठसला आहे किंवा नाहीं, हें पहाण्यासाठीं चुडालेनें आपल्या सामर्थ्यानें एके दिवशीं इंद्रादि देव विमानांतून तेथें आणविले, व ती राजाला म्हणाली:—" राजा, पहा तुझ्या पुण्यप्रभावानें हे इंद्रादि देव विमानांतून आले आहेत. ऊठ. ऊठ. अरे ! त्यांचा सत्कार कर. "

नंतर राजानें गुंफेंतून बाहेर येऊन देवांना आंत नेलें. त्यांना सत्कार-पूर्वक आसनांवर बसविलें.

इंद्र म्हणाला:—" राजा, कायरे तुझें हें पुण्य ! बाबारे, तुझ्या सामर्थ्यानें आज आम्हांला स्वर्गांत कंप सुटला. असा महात्मा एकदां तरी पहावा म्हणून आम्ही तुझ्या भेटीला आलों. चला—आम्हांला आपल्या सहवासाचा लाभ देण्यासाठीं आपण स्वर्गाला चला. धन्य हा आश्रम ! धन्य कुंभकाचें भाग्य ! असा शिष्य गुरूवर ताण करणारा शिष्य—धन्यच आहे येथील सर्व ! "

याप्रमाणें बोलून राजा काय म्हणतो, तें ऐकण्याकरितां सर्व स्वस्थ बसले. राजाच्या ठिकाणीं बोध परिपूर्ण बाणला होता. ' मीं तूं ' पणा रसातळाला गेला होता. देहावरची आसक्ति उडाली होती. अहंकाराची पायमल्ली होऊन ती जागा आत्मबोधानें पटकावली होती.

राजा कांहींच बोलत नाहीं, हें पाहून इंद्र पुनः म्हणाला:—" मग काय, येतोस ना राजा ? तुझ्या संगतींत काळ जावा अशी आमची सर्वांची फार इच्छा आहे. चला—चला राजेश्वरा ! चला. "

' मी आपल्या सान्निध स्वर्गीं असलों काय किंवा येथें असलों काय सारखेंच. आपण जें जें म्हटलें तें तें मला पावल्यासारखेंच आहे. मला स्वर्गादिकाशीं काय करावयाचें आहे ? मला जें पाहिजे होतें तें या माझ्या गुरुमाउलीनें येथेंच मिळवून दिलें आहे. हे देवाधिदेवा, स्वर्ग तरी कोठला आणि नरक तरी कोठला ? सारे कल्पनेचे खेळ आहेत. मला या गवतापासून तों सत्यलोकापर्यंत कसलीच इच्छा नाहीं. "

हें राजाचें भाषण ऐकून इंद्रादि देव थक्क झाले.

" कुंभका, धन्य आहे तुझी ! राजाला याच देहांत आपल्या स्वरूपीं लीन केलेंस ! येतों आतां आम्हीं. " असें म्हणून इंद्र इतर देवांसह निघून गेला.

इंद्रादि देव गेल्यावर कसून परीक्षा पाहण्यासाठीं कुंभकानें एक विमान निर्माण केलें. व स्वर्ग, नरक, सत्यलोक, पाताळ, कैलास वगैरे सर्व ठिकाणीं राजाला फिरवून आणिलें. परंतु राजाला नंदनवन पाहून हर्षही वाटला नाहीं व नरक पाहून दुःखही वाटलें नाहीं. कुभंकानें, ' राजा मला येथें राहावेंसें वाटतें ' असें म्हटलें, तर यानें ' हं बरें. ' या शब्दा-खेरीज त्यानें कांहींच म्हटलें नाहीं. त्याचें चित्त कोठेंच गुंतल्याचें दिसेना. नंतर ते आपल्या गुंफेंत परत आले. त्यावर एकदोन दिवस जाऊं देऊन कुंभकरूपी चुडाला राजाला म्हणालीः—" राजा आज स्वर्गांत मोठी सभा भरावयाची आहे. तेव्हां मला तिकडे गेलेंच पाहिजे. माझे पिते नारद तेथें येतील व देवही माझी चौकशी करतील. "

" या चरणांचा वियोग मला कसा सहन होईल ? पण महाराज सभेंत नसतील तर येथें न्यूनता पडणारच. तरी आई जशी आपल्या तान्ह्याला घरीं ठेऊन जाते, पण त्याच्या ओढीनें लौकर परत येते; तसेंच माझ्या गुरुमाउलीनें यावें. "

" होय बेटा, तुजशिवाय मला एक क्षणही बरा जात नाहीं. " असें म्हणून आकाशमार्गानें कुंभक उडाला. राजा तर किती तरी वेळ तिकडेच पहात राहिला.

इकडे चुडाला वायुवेगानें आपल्या महालांत येऊन दाखल झाली. प्रधानापाशीं सर्व चौकशी करून व त्याला पुढील व्यवस्था सांगून तिनें आपल्या महालाचीं दारें बंद करून घेतलीं. अरण्यांत येतांना तिनें पुनरपि कुंभकरूप घेतलें. व राजाला पूर्ण कसाला लावण्यासाठीं नवी युक्ति मनांत योजून ती पुन्हां गुंफेंत आली.

तिला पहातांच, ‘ गुरु माऊली, गुरु माऊली ’ असें म्हणून राजानें तिच्या पायांवर लोळण घेतली. चुडालेला मनांत आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या.

कुंभकानें चेहरा उतरल्यासारखा करून म्हटलें:—“ अहारे देवा, आतां काय करूं ? ” असें म्हणून त्यानें जमिनीवर गडबडां लोळण्यास सुरवात केली. मध्येंच कपाळही बडवून घेण्यास कमी केलें नाहीं.

राजा घाबरून म्हणाला:—‘ महाराज काय झालें ? ’

“ काय सांगूं कपाळ माझें ? राजा, लाज वाटते. पोटांत पीळ पडतो कीं रे ! बाबा, मी आतां सभेहून परत येतांना वाटेंत मला दुर्वासऋषी भेटले. त्यांनीं, “ कुंभका, कुंभका येरे ” असें म्हटलें. मला दुर्दैवानें काय पहा बुद्धि सुचली ! मी म्हटलें “ कांहो, अगदीं बाईलवेड्या नवऱ्यासारखेच हाका मारतां ! ” मी इतकें म्हणतांच तो कोपी ब्राह्मण संतापून म्हणाला ‘ मला बाईलवेडा म्हणतोस काय ? ठीक आहे तर यापुढें तूं बाईलच होशील ! ’

‘ राजा ’ मग माझे डोळे उघडले. मी त्यांचे पाय धरले. अश्रूनें त्यांना न्हाऊं घातलें. क्षमा मागितली. तेव्हां कोठें त्यांनीं “ बरें तर, नुसता रात्रीचाच तूं बायको होशील. ” असा उश्शाप दिला. राजा, मला दुसरें कांहीं नाहीं वाटत, पण तुझा वियोग तर मला एक क्षणभरही रेटत नाहीं. आणि मी स्त्री झाल्यावर आपणाला एकाच अंथरुणावर कसें निजतां येईल ? हायरे देवा ! हें काय केलेंस ! ’

“ महाराज, स्त्री आणि पुरुष यांत काय आहे ? हे कल्पनेचे खेळ आहेत. अहो गुरुराज, आपणचना माझा सर्व संशय रसातळाला नेलात ? मग आपणाला हें आजच काय झालें ? छे छे ! हें नुसतें भ्रमाचें पांघरूण आहे. स्वामींना हें कधींच बाधक होत नाहीं. माझी परीक्षा पाहण्यासाठीं तर हें स्वामींनीं चालविलें नाहींना ! आत्मानंदांत सचैल स्नान केल्या-

वर हा भ्रम कसा उरेल ? अहाहा ! सर्वाठायीं सर्वभूतीं आत्माराम आहे. आनंद आहे. ब्रह्म आहे ! महाराज हें संशयाचें पटल काढून टाका."

" अरेरे ! पहा—पहारे माझ्या जिवलगा राजा, हे पहा ! अरे या जटा गेल्या ! हं ! ती पहा तेथें वेणी झाली ! ओहो हें काय, दाढीमिशा जाऊन तेथें नथ—आणि हेंरे कानांत काय ! अरे या बुगड्या बाळ्या ! झालें सूर्य मावळला. माझें शरीर स्त्रीचें बनत चाललें ! "

कुंभकाची रंभा अप्सरांनाही लाजाविणारी मदनिका बनली. तिनें आपल्या स्त्रीजातीचा नैसर्गिक लीलांना आरंभ केला. चट्कन् आपल्या त्या मूल्यवान् वस्त्राचा पदर सांवरीत तिनें खालीं मान घातली. परंतु राजाच्या चित्तवृत्तींत कांहीं बदल होतो कीं काय, हें ती चोरून पहात होती.

अशा रीतीनें रात्रीं मदनिका बनून राजाचें मन चळतें कीं काय, हें तिनें पाहिलें; परंतु आत्मस्वरूपीं लीन झालेला राजा किंचिन्मात्रही चळला नाहीं. तेव्हां कसाच्या मात्रेचे आणखी चार वळसे चढवून परीक्षा पाहण्यासाठींच कीं काय, एके दिवशीं कुंभक ह्मणाला " राजा, काय सांगूरे माझें दुर्दैव ? बाबारे, प्रारब्ध पहा कसें खेळवितें तें ! राजा, मी रात्रीं तरुण मदनिका बनल्यावर जें दुःख अनुभवितों तें तुला काय सांगूं ? राजा, माझें हें वय तारुण्यानें मुसमुसलेलें, छे, रे बाबा, मला हा तोंड बांधून बुक्यांचा मार सोसवत नाहीं. राजा काय करूं ? मी इतके दिवस अत्यंत कष्ट सोसले. पण आतां मला लग्नच केलें पाहिजे. त्यावांचून गत्यंतर नाहीं. "

" स्वामींची मर्जी. पण मला हें खरें वाटत नाहीं. महाराज, माझें अज्ञान लयाला नेणारे आपण, हें काय बोलतां ? तथापि गुरुमाउलीनें जें मनांत येईल तें करावें. देव, मनुष्य यांपैकीं पाहिजे त्या पुरुषास पसंत करून महाराजांनीं लग्न करावें. मात्र दिवसभर मजपाशीं रहावें. नाहींतर त्यांना रात्रीं तेथेंच घेऊन यावें. दोघांची सेवा या दासाकडून घडेल. "

" राजा, हें कायरे सांगतोस ? पहा बरें. मी लग्न केलें कीं परतंत्रता आली ना ? खेरीज तुझा वियोग तर मला क्षणभरही सोसवत नाहीं. तर माझा विचार तुझ्याशींच लग्न करण्याचा आहे आणि.........

"नका. नका. महाराज, नकाच असें बोलूं. गुरुमाउली मी तुमचें पाडस ना ? माझी ही आळ पुरवाच. माते, या लेंकराला अशा रीतीचें कठिण फर्मान नकोच सोडूं. अरेरे ! हें मी काय ऐकतों ! छे ! असली पातकी आज्ञा माझे गुरुराज मला नाहींच करणार. "

यावर कुंभक ह्मणाला:—" राजा हा प्रारब्धाचा घाला आहे. हा विधि हरिहरांनाही चुकला नाहीं, तर तो मला चुकेल ? ' राजा तूं पुन्हां भुललास का ? अरे, स्त्री काय, पुरुष काय, सर्वच भ्रम ! बाबारे, ज्ञान झाल्यावर जसे हर्षशोकादि विकार नाहींत, त्याप्रमाणें आलेला भोग मुकाट्यानें भोगलाच पाहिजे. बाबारे, एकाच स्त्रीला, बाप माझी मुलगी ह्मणतो, पुत्र माझी आई म्हणून हांक मारतो, पति पहावा तर ही माझी प्रिय पत्नी असें ह्मणतो, भाऊ ताई म्हणून म्हणतो, दीर वहिनी म्हणून संबोधितो. असा प्रत्येकाचा भाव जरी वेगळा तरी स्त्री एकच ना ? तद्वत् गुरु काय, शिष्य काय, सर्व एकरूपच. एकाच परमेश्वरी अंशाचे दोन भाग आहेत. स्त्री आणि पुरुष हे मनाचे भेद आहेत. हें जर तुला पटलें म्हणतोस तर माझ्या आज्ञेला तूं मान कां देत नाहींस ? "

राजा हतबुद्ध होऊन स्तब्धच राहिला. क्षणभर भानरहित झाला. थोड्या वेळानें भानावर येऊन म्हणाला:—

" महाराज, मला विषयाची काडीएवढी सुद्धां गोडी नाहीं; परंतु मी गुर्वाज्ञा मोडावयाला कसा तयार होऊं ?"

नंतर कांहीं दिवसांनीं कुंभकानें एका सुमुहूर्तावर राजाशीं लग्न लाविलें. परंतु राजाची वृत्ति बिलकुल चळेना. चुडालेनें नानाप्रकारच्या प्रणयचेष्टा कराव्या; नानाविलास दाखवावे; राजाशीं जबरीनें विलास केले. राजाच्या मनांत गुरुबुद्धी वांचून दुसरा भावच उत्पन्न झाला नाहीं. कुंभकाच्या

बोधानें पूर्ण समाधानी बनलेला राजा तिळमात्रही चळला नाहीं. ज्या ठिकाणीं आपलेपणा राहिला नाहीं, त्याठिकाणीं इतरांची काय कथा ? अखेर अगदीं शेवटचा उपाय कुंभकरूपी चुडालेनें योजिला. तिनें ठरविलें कीं, आतां आपण याच्या देखत परपुरुषाशीं रत होऊं.

दुसऱ्या दिवशीं कुंभक व राजा असे दोघेजण स्नानसंध्यादिक कर्में करावयास नदीवर गेले. कुंभकानें आपलें कर्म झट्कन् आटोपून आपण पुढें निघाला. नंतर त्यानें स्वतः मदनिका बनून, दुसरा एक पुरुष निर्माण करून, राजा येण्याच्या वाटेवर, सहज दिसेल अशा झाडींत त्या पुरुषाबरोबर विलास चालविले. राजा परत येतांना सहजीं त्याची नजर तिकडे गेली. परंतु–अहाहा ! आपल्या हातून हें काय घडलें ! गुरुरायांना यामुळें संकोच तर वाटणार नाहीं ना ? असें त्याला वाटून तसें बोलून तो पुढें गुंफेंत निघून गेला. त्याच्या मनांत गुरुव्यतिरिक्त दुसरा भावच नसल्यामुळें त्याला काय वाटणार ? नंतर मदनिका गडबडीनें येऊन राजापुढें हात जोडून उभी राहिली.

तिला पहातांच राजा ह्मणाला " स्वामिन्, आपण लौकर कां आलां ? महाराज, माझी सहज तिकडे नजर गेली. परंतु माते, लेंकराची मातेला लाज ती कसली ? महाराज, मी आपलें पाडस ना ? माझ्या पाहण्यानें स्वामींना संकोच वाटला नाहीं ना ? अरेरे हें काय झालें ? माझी ही गुरुसेवा न होतां गुरूला ताप मात्र झाला ! मी खरोखरीच करंटा ! "

परंतु नाटकी मदनिकेनें हुंदके देण्यास आरंभ केला. व हात जोडून राजाला म्हणाली. माझ्या नाथा ' मी आपली अग्नी ब्राह्मण साक्ष कल्पून लावलेल्या लग्नाची दासी आहे. महाराज ओढाळ गुरूं, त्याला हिरवें रान दिसतांच तिकडे धांव घेतेंच. मी तसाच अपराध केला आहे. महाराज आपणांला काय सांगावयाला पाहिजे ? राजनीति आपण जाणतच आहां. तेव्हां योग्य न्यायानें मला जो योग्य तो दंड करा. पुन्हां माझ्याकडून असलें कृत्य होणार नाहीं. हा देह मी आपणाला अर्पण केला

असून आज मी घोर अपराध केला. महाराज, एकवेळ क्षमा करा. मी पुन्हां असें नाहीं हो कधीं करणार !."

मदनिकेचें भाषण ऐकून राजानें कानांत बोटेंच घातलीं.

" हाय ! हाय ! मी काय ऐकतों ! गुरुमहाराज, नकोच हें पातक मला. महाराज, मी आपणाकडे गुरुमूर्तीशिवाय दुसऱ्या भावनेनें कधींच पाहिलें नाहीं. नको, ही गुरुनिंदा मी कशी ऐकूं ? महाराज, आपल्या कृपेनें मला स्त्री पुरुष, द्वैताद्वैत, वगैरे कांहीं उरलें नाहीं. महाराज, आपण ही माझी परीक्षा पहात असाल ! असेना ! परंतु ज्या माझ्या गुरुमाऊलीला मुंगीचेंही अंतरंग समजतें, त्या माउलीला माझें अंतरंग समजणार नाहीं ? समजेलच. महाराज, या डोळ्यांनीं 'गुरु' या भावनेंवांचून पाहिलें असेल तर याच्या खांचा होवोत. गुरुनामाशिवाय जर या जिव्हेनें इतर शब्द उच्चारले असतील तर ही माझी जिव्हा झडून जावो ! अरेरे ! हें मन जर गुरुचिंतनावांचून एक क्षणभर रिकामें असेल तर माझ्यावर गुरुहत्येच्या पातकाचे डोंगर कोसळून पडोत ! "

झालें. भट्टींत घातलेलें सोनें बावन्न कशी उतरलें. गुरुमाउली शिष्याप्रमाणें गहिंवरली तिला मनांत राजा बद्दल धन्यता वाटली.

'छे ! याचा आतां कोठपर्यंत अंत पहावयाचा ! झाला–कसाला लावण्याचा कडेलोट झाला." असें मनांत म्हणून, मदनिकेच्या ठिकाणीं चुडाला दिसूं लागली ! राजा आश्चर्यचकित झाला.

" अरे ! मी जागा आहें का ? किंवा हें स्वप्न तर नाहीं ना ! ही कोण ? चुडाला ! माझी पत्नी चुडाला ! ! छे–पण ती इतक्या लांब काटक्याकुटक्यांतून, उन्हांतान्हांतून येथें कशी येईल ? अरे पण नाहीं ह्मणावें तर ती पहा चुडाला–हो–तीच ! पहा–पहा कशी नेहमीप्रमाणें हंसत मुखानें पहात आहे. पण छे. हा भ्रमच असावा." असें ह्मणून राजानें आपले डोळे चोळले. हाताला चिमटा घेतला.

" हो पण कुंभक कोठें आहे ? बरें ती मदनिका कोठें आहे ? आलें

लक्षांत. माझें मन पहाण्यासाठीं स्वामींनी चुडालेचें रूप घेतलें. घ्या, स्वामीराज, पाहिजे तशी माझी परीक्षा घ्या. "

राजा अशा संशयांत पडलेला पाहून चुडाला ह्मणालीः—

" अहो महाराजा, माझ्या प्राणेश्वरा, आपणाला संशय कां वाटतो ? मी आपली पत्नी चुडालाच आहें. आपण स्वप्नांत नाहीं."

" सांग, प्राणसखे सांग. तूं येथें कशी आलीस ? तुझ्या या सुकुमार पायाला खडे खुपले नाहींत ? माझ्या प्राणेश्वरी, तूं या उन्हांतून नेमकी कशी आलीस ? मी येथें आहें हें तुला कसें कळलें ? "

" महाराज, आपणाला आठवतच असेल कीं, मी आपणास वनांत जाऊं नये म्हणून परोपरीनें सांगितलें. **आपली आपणाला ओळख झाल्यावर रान अगर राजवाडा एकच.** आपणाला उपरति झाली आहे तर आत्मबोध मनावर पक्का ठसवा. त्यासाठीं वनांत जावयास नको. पण आपण तर मला झोंप लागतांच तेथून निघालां. नंतर मी योगाभ्यास शिकलें व आपला गुप्तरूपानें शोध केला. आपणाला येथें पाहिलें. कर्माच्या कटकटीला आपण विटल्याचें पाहिलें. नंतर मी कुंभकाचा वेष घेतला. आणि आपणाला आत्मबोध केला. इंद्रादिदेवही मीच झालें होतें. ब्रह्मांड मीच दाखविलें. नंतर या दासीनें आपणाला कसाला लावण्यासाठीं मदनिकेचें रूप घेतलें. पण आपण बिलकूल चळलां नाहीं. नंतर मीच पुरुषवेष घेतला. आपणामागें पुन्हां मदनिकारूपानें येऊन बरेंच बोलूनही पाहिलें. परंतु आपली पूर्ण समाधानवृत्ती पाहून आतां मी खरें रूप प्रगट केलें. "

अहाहा ! तो आनंद—त्यावेळचा पति-पत्नींचा—गुरु—शिष्यांचा ह्मणं पाहिजे तर—कोण वर्णन करील !

राजानें आनंदातिशयानें चुडालेला मांडीवर बसविलें.

" चुडाला—धन्य माझी चुडाला ! मी अधोगतीच्या खाड्यांत पडत असतां, कष्टांची परवा न करतां, निश्चयानें मला त्या खाड्यांतून वर

काढणाऱ्या माझ्या देवते, तुला काय म्हणूं ? आहाहा, व्यवहारिक नात्यानें मी तुझा गुरु ना ? पण–काय माझ्या गुरुदेवते ! तुला मी काय संबोधूं ! छे ! चुडाला हा माझा देह जरी मी तुजवरून ओंवाळून टाकला तरी याची फेड होईल काय ! नाहीं इतकेंच नव्हे तर या शरीराच्या कातड्याचे जोडे जरी सात जन्म तुझ्या पायीं घातले तरीसुद्धां मी तुझ्या ऋणांतून मुक्त होणार नाहीं. चुडाले माझे चुडाले ! म्यां मूढानें तुला काय ग दुरुत्तरें केलीं ? हा गुरु टाकून गुरु शोधण्यासाठीं मी वनांत आलोंना ! पण माझ्या चूडालेनें तेथेंही उडी घेतली. चुडाले कर–आपली ओटी पुढें कर. माझ्या अनंत अपराधांनीं तुझी ओटी मला भरूं दे. पण नाहीं, मी तुझे पाय धरून क्षमेची याचनाच केली पाहिजे. माझी चुडाला दयेची खाण आहे. मला क्षमा करीलच. ”

असें ह्मणून राजा तिच्या पायांवर मस्तक ठेऊन पडला. “ चुडाले, हा देह तुझा तुझ्या पायांवर घातला बरें. पण छे, हा मुळीं पहिला तुझाच आहे. ”

राजा पत्नीकडे पाहून आनंदसागरांत पोहूं लागला.

“ महाराज, आपणास स्वानुभव बाणलाना ? महाराज, माझे उपकार कसले मानितां ? महाराज, आपण व मी दोन कोठें आहोंत ! महाराज, आपणच आपल्या पायांतला कांटा काढला, तर हाताचे आभार कां मानायला पाहिजेत ! तें असो. पण आतां तरी आपली आपणास ओळख पटलीना ?

“ होय, चुडाले होय. ”

“ पण महाराज, आतां आपला हेतु काय !

“ कसला हेतु चुडाले ! हं समजलों. आतां हा देह पडेपर्यंत राजमंदिरांत असला काय किंवा स्मशानांत राहिला काय मला दोन्ही सारखेंच वाटतें.

“ चला महाराज, तर मग नगरांत चला. पूर्वींसारखेंच आपलें राज्य चालवा. प्रारब्ध आहे तें भोगून सारूं या.

" बरें आहे चुडाला; परंतु माझें एकच मागणें आहे. चूडाले, तुझा सहवास मला नित्य असावा. मी राज्यसिंहासनावर बसलों कीं तेथें माझी चुडाला पाहिजे.

चुडाला हंसत हंसत ह्मणाली:–" महाराज, काय हरकत आहे ! होईल, तसेंच होईल.

चुडालेला इच्छा होतांच काय उशीर ! चतुरंग सेना तयार झाली. राजाला वस्त्रेंभूषणें घालून व त्याच्यासह रथांत बसून चुडाला शहरांत निघाली. प्रधान मंत्री वगैरे सामोरे आले. नगरजनांनीं राजाराणीला पंचारत्या ओंवाळल्या. राजा दरबारांत आल्याची बातमी हां हां ह्मणतां पसरली. नजराणे घेऊन अनेक राजे आले होते. शिखिध्वज राजानेंही त्यांचा योग्य सत्कार करून त्यांना देणग्या दिल्या. पुढें राज्यकारभार न्यायानें हांकून आपल्या प्रजेला सुखी व संतुष्ट केलें. कित्येक वर्षें राज्य करून दोघांनीं देहत्याग केला. या प्रमाणें हें वसिष्ठानें श्रीरामाला सांगितलेलें चुडालेचें पवित्र व सुंदर चरित्र आहे.

माझ्या वाचक भगिनींनो, आज तुह्मांला चुडाले सारखें षड्रिपूंपासून पतींचें रक्षण करण्यास इतके कष्ट, इतकी यातायात करावी लागणारच नाहीं. तिनें पतीला मायामोहाच्या, अहंकाररूपी व्यसनाच्या तडाक्यांतून ओढून काढिलें तसें केलेंत तर फारच स्तुत्य; निदान आज तुह्मीं ( असतील तर ) पतींच्यां शरीराची, अब्रूची, नाश करणारीं जीं दुर्व्यसनें समाजांत धिंगाणा घालीत आहेत; तीं सुटण्याचा प्रयत्न करा. त्यामुळें पतीचें आरोग्य वाढेल. आरोग्यवाढीबरोबर आयुष्यवृद्धि ठरलेलीच.

शिवाय, करमणुकीच्या वेळीं तुह्मीं चुडालेसारख्यांच्या कथा–आर्यस्त्रियांच्या उज्ज्वल अशा कथा–वाचण्याचा परिपाठ ठेवाल तर तें संतोष व सुखदायक होय, असें मीं समजेन.

---

# पतीचें सत्व राखणारी चांगुणा.

पूर्वकाळीं कांतिनगरींत श्रियाळ राजा राज्य करित होता. तो अत्यंत शूर, सत्यवचनी, दाता आणि उदार असा होता. सुदैवानें त्याला पत्नी—छे ! पत्नी कशाची—रत्नच तें ! अमूल्य रत्न ! होय ! अमोल रत्नच अशी लाभली होती ! किंबहुना श्रियाळापेक्षां पुढें येणाऱ्या गोष्टींत चांगुणेसच जास्त महत्त्व दिलें पाहिजे.

भक्ताला देव नेहमीं कसोटीला लावून पहात असतो. तशीच कसोटी चांगुणेची व श्रियाळाची घेण्याची देवांनीं गोष्ट घडवून आणिली. तो भाग ओघानेंच पुढें येणार आहे. परंतु त्यापूर्वी त्यांची थोडीशी माहिती वाचकांना देऊं या.

चांगुणेस फारा नवसासायासानें एकच मुलगा झाला होता. त्याचें नांव चिलया. राजवैभवांत रुळत असलेल्या चांगुणेच्या पोटीं झालेलं बालक सुंदर असणारच. परंतु त्याहीपेक्षां आश्चर्य हें कीं तो चिलया अत्यंत बुद्धिमान् व सद्गुणी होता. उघडच आहे. " शुद्धबीजापोटीं फळें रसाळ गोमटीं " तें काय खोटें ! छे ! चांगुणेचा चिलया लहान असतांनांच तिनें त्याला नाना तऱ्हेच्या गोष्टी सांगाव्या. कधीं खोटें बोलूं नये. दुसऱ्याचें वाईट करूं नये हें त्याच्या मनावर फार उत्कट तऱ्हेनें बिंबविलें होतें. खेरजि आईबापांचें वर्तन त्याचे पुढें होतेंच.

आपल्यांत अशी ह्मण आहे—होणार तें ब्रह्मादिकांसही चुकणार नाहीं. तेंच खरें.

एके दिवशीं नारद कैलासाला गेले होते. श्रीशंकर आनंदांत बसले होते. जवळच त्यांचीं बालकें षडानन व गजानन होतीं. देवी पार्वती

शंकराशीं कांहीं विनोद करीत होत्या; परंतु नारदास पहातांच त्या गप्प बसल्या.

" कां मातोश्री, मी येतांच आपण कां थांबलां ? " नारद ह्मणाले.

थोडेंसें हंसून देवि पार्वती ह्मणाल्याः—"नारदा अंऽहं ! अगदीं कानाला खडा लावून घेतला आहे. मी विसरावयाची नाहीं हो कधीं ! पूर्वीं आह्मी एकदां द्यूत खेळत असतां तूं येऊन आह्मांस पण करावयास लावून, खोटें दान पाडून पुन्हां यांना 'स्त्रीनें जिंकलें' ह्मणून राग आणविलास. आणि मला मग रानोवनीं भटकून, गाऊन नि नाचून, नानाप्रकार करून स्वारीला कैलासास आणावें लागलें. आहे कां आठवण ? नारदा, तुला मुळीं लोक ह्मणतातच बरें. "

" काय ह्मणतात आईसाहेब ? "

" कळ लावून तमाशा पहाणारा नारद ह्मणून. "

" छे, छे, मातोश्री, मी आपलें मूल. मी हरिभजनावांचून रिकामा वेळच दवडीत नाहीं. लोक काय पाहिजे तें बोलतात. "

" अरे, तुह्मीं लागलांत वाद करावयाला. पण कायरे, नारदा, कांहीं नवी खबर ? आतां कोठून आली स्वारी ? सांग तर खरें !

" अहाहा ! काय सांगूं महादेवा ! आतां मी आलों मृत्युलोकाहूनच. पण त्याला मृत्युलोक–कनिष्ठ लोक–कां ह्मणावा बरें ? देवा तेथलीं माणसें–छे ! माणसें कसलीं ! देवच तीं ! पाहिलीं कीं वाटतें त्याला मृत्युलोक का ह्मणावें ? देवा आज मी कांतिनगरींत गेलों होतों. ओ हो, हो ! ! काय सांगूं ! काय हो त्या श्रीयाळराजाचे गुण ! असा दाता आपण कांहीं बोवा पाहिला नाहीं. शूरही तसाच. एक का दोन सांगूं ! देवा, त्यांत कांहीं मोठेंसें नाहीं हो. पण त्याची बायको चांगुणा ! अहाहा ! या तुमच्या लक्ष्मी न् पार्वती नि सावित्रीबाई चटसाऱ्या पासंगालाही नाहीं पुरणार पासंगाला ! बरें मुलगा ! लहान बच्चाच आहे. पण त्याची

आईबापांवरही ताण. अहो, भाट काय कीर्ति गातीलच पण सारा मृत्युलोक त्याच्या कीर्तीनें दरवळतो आहे. आज मी जेथें जाई तेथें चांगुणा, श्रीयाळ, चिलया या शिवाय लोकांच्या तोंडीं गोष्ट नाहीं. जिकडे तिकडे हेंच. "

" कां नारदा, फारशी स्तुति करतोस ? "

" स्तुति कसली ? माझ्या हातावर कांहीं त्यानं गूळ खोबरं नाहीं दिलं. किंवा त्याची कांहीं उपवर मुलगी नाहीं! बाकी असती ह्मणून काय ह्मणा ! मी बालब्रह्मचारी. पण आपलं ऐकलं, व आपण विचारलंच ह्मणून सांगितलं. "

" हं ! काय सांगितलं काय ! सारा मृत्युलोक त्याच्या कीर्तीनें दरवळला ! आमच्या देवललना त्याच्या बायकोच्या पासंगालाही पुरणार नाहींत ! "

" होय, देवा हें खरंच आहे. "

अत्यंत खवळून शंकर उठले. आपल्या जटा आपटीत ते ह्मणाले:— " पहा नारदा पहा ! हा मी निघालों त्या तुझ्या श्रियाळाचें सत्त्व पाहण्यास. "

असें ह्मणून शंकरांची स्वारी निघून गेली. नारदही निघाले. पार्वती आई मनांत ह्मणाल्या 'हा कोठें गेला आणि कळ लावली नाहीं असं नाहींच व्हायचं. आतां पुढें काय होतं कुणास ठाऊक ! '

" आहाहा ! " धन्यच ती माऊली ! धन्य तो बाळ ! सुखी असोत बिचारीं ! असें बोलत कांहीं ब्राह्मण चालले होते. इतक्यांत वाईट वेष धारण करून, वृद्धावस्थेनें कांपत, कोलमडत, गलित कुष्ठाची दुर्गंधी सोडीत शंकराची स्वारी राजद्वारीं येऊन थडकली. दारावरच्या पहारेकऱ्यांस ते लगेच खेकसून ह्मणाले:---

" कायरे, हा दाता दाता ह्मणून ज्याचा डांगोरा पिटतात त्या श्रियाळा-चाच ना वाडा ! जा त्याला ह्मणावं दाराशीं अतिथी आला आहे. "

हा प्रकार पाहून बिचारा पहारेकरीही चकित झाला. ' कुणीकडे महाराज नि कुणीकडे हें ओंगळ ध्यान ! असें त्याला आश्चर्य वाटलें.

थोड्याच वेळांत राजा श्रियाळ बाहेर आला. त्यानें नम्रपणें अतिथीला नमस्कार केला. परंतु त्याकडे दुर्लक्ष्य करून अतिथी महाराज ह्मणाले:— " कायरे राजा, तुझ्याच का कीर्तीचा पाढा सगळे ब्राह्मण वाचतात ! वाहवारे विप्रप्रेम ! अरे, मी केव्हांचा येथें उन्हांत तळमळतों आहे आणि तूं खुशाल चैनींत आंत बसला आहेस ! हाच कांरे ब्राह्मणाचा तुझ्या दरबारीं सत्कार !

" दीन दयाळ ! क्षमा करा. हा दास आपल्या सेवेला तयार आहे. चलावें वाड्यांत. "

असें ह्मणून राजानें आपल्या दोन्ही हातांचा आधार देऊन त्यांना आंत नेलें. मऊशा आसनावर बसवून आपण नम्रपणें उभा राहिला. अत्यंत श्रमल्याप्रमाणें धांपा टाकीत ब्राह्मण बसला.

" महाराज, वारा घालतों आपल्याला. " राजा नम्रपणें ह्मणाला.

ताबडतोब दहा पांच नौकर धांवलें. ' राजा बोले, दळ हाले. ' स्वतः राजानेंच आतिथीला हात धरून आंत आणल्यावर नौकरांची धांदल काय विचारतां ? भराभर पंखे घेऊन नौकर ब्राह्मणास वारा घालूं लागले.

" राजा, तुझी दाता ह्मणून कीर्ती ऐकून मी एवढ्या लांब आलों. तूं वाचेनें देतों ह्मटलेंस कीं तें खरें केल्याविना रहातच नाहींस, असें लोक सांगतात. "

" आपली कृपा महाराज. दुसरं काय ? पण महाराजांना काय पाहिजे ? "

" अरे, ती मिळण्याची आशा असली तर सांगून उपयोग ? काय पाहिजे ! देशील काय ? "

" होय महाराज. काय पाहिजे ? एखादा गांव इनाम करून देऊं ? सुवर्ण पाहिजे ? दासदासी पाहिजेत काय ? दिव्य रत्नें, हिरे यांपैकीं कांहीं देण्याचा हुकूम सोडूं ? फार काय, हें राज्यही मागत असल्यास स्वामींना अर्पण करीन. इतकेंच काय, पण हा प्राणही खर्चीं घालण्यांस मागें पुढें पाहणार नाहीं ! "

" बस, बस. राजा असे बोलघेवडे मी पुष्कळ पाहिले आहेत. अरे, तोंडानें वल्गना तर खूप केलीस ! बाबारे, मला ब्राह्मणाला राज्य घेऊन काय करावयाचें आहे ? तें संभाळण्यास हातांत तरवार धरण्याचेंही माझ्या अंगीं सामर्थ्य नाहीं. मग ती गाजविण्याचें कोठून असेल ? तूं तोंडानें बोललास यापैकीं मला कांहीं नको. "

" आज्ञा करावी महाराज ! तत्काळ देतों. "

" बाबारे, मला मांस–नरमांस–पाहिजे आहे ! "

" जशी आज्ञा. " असें ह्मणून राजा निघाला.

" जशी आज्ञा ! कसें चटकन् बोललास ? ऐक, नरमांस खरें–पण तें वृद्ध, रोगी, अशक्त, युद्धांत जखमी झालेला अशाचें नको. "

" नाहीं महाराज. " राजा उद्गारला.

" अरे ए, थांब थोडा–मला वाटलें होतें तितकें कांहीं तुला समजत नाहीं. मी जर न बजावतों, तर तूं अशांचें मांस मला घालणार होतास, असें दिसतें. खरें ना ? "

राजा मुकाट्यानें उभा होता.

" तुला एकदां सगळ्यांचा पाढा वाचूं दे. अरे, त्याप्रमाणेंच चोर, जार, कैदी अगर कोणास बळजबरीनें धरून आणशील—"

" नाहीं महाराज. आपल्या राजीखुषीनें जो स्वदेह द्रव्य घेऊन विकील अशालाच आणतों. "

" नाहीं--राजा ! नाहीं. विकत घेतलेल्या माणसाचेंही मांस मला चालणार नाहीं "

" मग कोणाचें देऊं ? मी आपलें देतों. "

" अहारे ! तूं काय मला खुळा समजतोस कारे ? अरे, राजा प्रजेचा पालक तूं. "

" माझें मांस मी आनंदानें देईन. " हात जोडून दाराबाहेर येत देवी चांगुणा ह्मणाली.

" बाबांनो, तुह्मी दोघें याचकांचे मायबाप, तुह्मांला मारल्यावर हें अवाढव्य राज्य, हें अन्नछत्र कसें चालेल ? छे, तुह्मी दोघेंही माझ्या उपयोगी नाहीं. त्याप्रमाणेंच मला पवित्र असें मांस पाहिजे. "

" महाराज, मी मूढ आहें. आपणच मला सांगावें कोणाचें मांस देऊं तें. "

" सांगतों ऐका. तुह्माला एकुलता एक सुकुमार असा मुलगा आहेना ? बस. त्याचेंच मांस दे. "

राजा व राणी चांगुणा यांच्या डोक्यावर जर आकाश कोसळतें, विजेचा धक्का बसता, हृदयावर इंद्राच्या वज्राचा आघात होता, तरीही बरें झालें असतें. तीं त्या दुःखद कल्पनेच्या आघातानें फार विव्हल झालीं. तोंच गर्जना करीत ब्राह्मण ह्मणालाः---

" राजा, छे छे. थकलों बोवा ! आज तुझ्याशीं गांठ पडली आहे. दुर्दैव माझें. दुसरें काय ? हा याचकाचा सन्मान कारे ? अरे, दोन शब्दांचेंच काम ! ' नाहीं ' ह्मण. हा मी चाललों. मला का उद्योग नाहीं ? कां, दाता तेवढा तूंच एकटा आहेस ? "

राजानें अर्थपूर्ण नजरेनें पत्नीकडे पाहिलें. अहाहा ! चांगुणेच्या धैर्य-मेरूचें काय वर्णन करावें ? तिनें नेत्रांनीं आपली संमत्ति दिली.

" महाराज, अतिथी विन्मुख जातां उपयोगी नाहीं ! त्याला आसनावर बसवावें. " राणी नम्रपणें ह्मणाली.

" दयाळा, नका हो उठूं ! माझा बाळ कोठें आहे ? त्याला आणवितें, व आपली इच्छा पूर्ण करतें. " चांगुणा ह्मणाली.

" राजा, कष्टानें नको बरें माझी इच्छा पुरवूं. "

" नाहीं, महाराज आत्तांच जाऊन मी माझ्या तान्ह्यास घेऊन येतें. आपण जरा बसावें. "

शाबास ! चांगुणे शाबास ! तुला मानवी स्त्री कसें म्हणावें ? देवतांची देवता तूं अरेरे ! तुजवर मुलाचा प्राण घेण्याकरितां त्यास बोलावून आणण्याचा प्रसंग ! तो तूं पतीच्या सत्त्वाच्या रक्षणाकरितां आनंदानें रेटण्यास तयार व्हावेंस ! हें अलौकिक सामर्थ्य देवतेवांचून कोणांत असणार ?

चांगुणा आपल्या बाळाला आणण्यासाठीं निघाली. ती एक दालन ओलांडते तोंच, ' रुणझुण ' असा पायांतल्या तोरड्यांचा आवाज आला. पहाते तों चिलया धांवत तिच्याकडेच येत होता. आपल्या मातेच्या कमरेस आपल्या सुकुमार हातांनीं विळखा घालून कडेवर बसण्याची धडपड करूं लागला. मातेचे अंतःकरणास चटके बसूं लागले. बाळाला पोटाशीं कवटाळून तिनें एक हुंदका दिला.

" आई, काय ग झालं ? "

" बाळा नको, नको रे मला आई या नांवानं हाक मारूं ! मी तुझी आई कशी ? " असें बोलत भरून आलेलें अंतःकरण मोकळें करीत ती माता बाळाला घेऊन चालली होती. तिचे पाय उचलेनात. परंतु ती याचकाची मूर्ति दिसली कीं तिनें चार पावलें झपाझप टाकावींत. मुलगा 'तूं का रडतेस ? तुला काय झालं ? " असें विचारित होता. अतिथी

होते तेथपर्यंत चांगुणा मुलाला घेऊन आली. आईची वेडी माया ती. तिला वाटलें मुलाला त्यांच्या पायावर घालावें. माझ्या बाळाला ते आशिर्वाद देतील. कदाचित् त्याचें हें सुंदर रूप पाहून त्यांना दया येईल. मग तरी ते त्याच्या ऐवजीं माझें मांस घेण्यास कबूल होतील पण काय !

" अरे राजा भुकेनें बाबा माझा जीव चालला रे ! कुठें आहे ती तुझी थापाडी बायको ? पोराचें मांस मला देतां कीं नाहीं ? नाहीं तर मी आपला जातों तरी. " असें म्हणतांच चिलयानें त्यांच्यां पायांवर आपलें तें लहानसें मस्तक ठेविलें.

" राजा, हाचका तुझा पोरगा ? आतां तरी विलंब नको. मला एकदां याचं मांस घालतों म्हटलंत तें घाल नाहीं तर मी जातों तरी. "

"महाराज, माझं मांस का आपणाला पाहिजे ? तात, मग कां हो उशीर ? अहाहा ! बाबा यांच्यापेक्षां देह सार्थकीं आणखी कसा लागणार ? बाबा, तुम्हींच ना नेहमीं मला उपदेश करितां कीं, क्षत्रियाचं शीर हातावरच असावं म्हणून ? बाबा, क्षत्रियानें मरणाला भिणें हें त्याला शोभत नाहीं ना ? आईनें मला हें सांगितलें आहे. बाबा, याच्यापेक्षां चांगलें मरण कशांत आहे ? बाबा, आई मला नेहमीं सांगते कीं, याचकांचे मनोरथ पूर्ण करणें हेंचे आपल्या कुळाचं भूषण, हाच आपला धर्म आणि हेंच आपलं कर्मही पण. चल आई चल. यांचे मनोरथ पूर्ण कर. आई, तूं दुःख करूं नकोस. मला खरोखर यांत आनंदच वाटत आहे. माझं मन, आई तुला काय सांगूं ? किती उल्हसित झालं आहे ? बाबांच्या व्रतपालनासाठीं—आई, तुमच्या ब्रिदासाठीं—माझा देह खर्ची पडला, तर त्यांत मला फार संतोष वाटतो. आई, बाबा, तुम्हीच ना नेहमीं मला सांगतां कीं, हा देह नश्वर आहे म्हणून. मग असा हा नश्वर देह सत्कारणीं लावण्याचा प्रसंग आला असतां, मी माघार कां घ्यावी ? आई तूंच ना

मला गर्भांत असतांना पुत्रधर्माचा धडा घालून दिलास ? मला तूंच गुरूच्या ठिकाणीं आहेस ना ? माझ्या अंतःकरणांत ठसविलेला उपदेश तूं आतां पाळ–चल, आई चल. हे महाराज खोळंबले आहेत. ”

अहाहा ! ते बोल–त्या साध्वीच्या जणूं प्रतिबिंबाच्या तोंडचेच बोल– ऐकून अतिथी मनांत द्रवला. परंतु अद्याप त्याला त्यांची पूर्ण परीक्षा घ्यावयाची असल्यानें, त्यानें आपलें मन अधिकच कठोर केलें.

स्वारी पुन्हा गरगरां डोळे फिरवूं लागली. चांगुणेनें मुलाला कडेवर घेऊन आंत नेलें. त्याला आपल्या मांडीवर बसवून अनेकदां कुरवाळिलें. चुंबनें घेतलीं. पोटाशीं धरलें. त्याच्यावर अश्रुसिंचन केलें. जणुं काय, ती आपल्या लाडक्याला उष्ण अश्रूंनीं शेवटचें नहाण घालीत होती !

वाचकहो, मातेनें बाळास मारावयाचें आहे. कसा धीर व्हावा ? आपल्या पोराच्या पायांत बोंचलेला कांटा काढतांना सुई जोरानें लाववत नाहीं, मग हें व्हावें कसें ? परंतु साध्वी स्त्रिया, सत्यवचनी स्त्रीरत्नें, पतीच्या जिवासाठीं, त्याच्या ब्रिदासाठीं स्वतःचा जीव जाळून खाक करीत, त्यांना हेंही कठिण नव्हतें.

“ आई रडूं नकोस–आई, तूंचना सांगत होतीस कीं, मरणाच्या वेळीं जी इच्छा असते तो जन्म येतो म्हणून ? झालं तर मग आई; मीही हीच इच्छा धरीन कीं, याच माझ्या आईच्या पोटीं मी जन्माला यावें. आई, तूं दुःख करूं नको. मी पुन्हा तुझ्या पोटीं येईन. आई, आतां वेळ नको लावूं..........

“ बाळा—माझ्या बाळा, मला आई कशालारे आतां म्हणतोस ! बाळा, आपल्या लेंकरावर सुरी घालणारी आई, ती आई कशाची ! पण बाळा हा दुर्लौकिक लोकांत होईल ! माझ्या पाडसा मी केवळ हे याचक राजवाड्या बाहेर जाण्याचीच वाट पाहीन. लागलींच मी तुझ्या मागोमाग

आलेंच. बाळा, पाहिला, पुष्कळ विचार करून पाहिला. पण जर वचन मोडावं तर हे याचक मला तरी सामान्य दिसत नाहींत. ते आपणाला शापूनच बाहेर पडतील. बाळा, मग तशा तऱ्हेनें मरण्यापेक्षां सत्यासाठीं, धर्मासाठीं मेलेलें कांहीं वाईट नाहीं. तें सगळं खरं. पण काय करूं! माझ्या चिमण्या, तुझ्या या सुकुमार व सुंदर अशा देहाकडे पाहिलं कीं, हें कसें होईल असं वाटतं. "

" आई, मी लवकर मोठा होऊन लढाईवर जाऊं लागलों, आणि रणांगणावर मला मृत्यु आला–तर–तर आई, तूं अश्रू ढाळशील काय ? नाहीं, खचित ढाळणार नाहींस. उलट तुला संतोष होईल. तसंच आई बावांच्या ब्रिदासाठीं तूं मला मार. आई, मला मुळींच दुःख होत नाहीं. आई, इतक्या लहान वयांत हें सर्व तूंचना मला शिकविलंस ! मग आई, तुला कांग इतकं कोडं पडलं ! मी पुन्हा तुझा मुलगा होऊन खचित येईनग. "

" होय बाळ. असें ह्मणून पुनःपुनः आपल्या लाडक्याला कवटाळून व त्याचीं वारंवार चुंबनें घेऊन त्या सत्वस्थ मातेनें घट्ट डोळे मिटले, आणि सुरी उगारली. पण–पण तिच्या हातांत शक्ति कुठें होती ! ती खालींच पडली.

" अशी भिऊं नकोसग आई. याचकांना विलंब होईल. " पुन्हा देवि चांगुणेनें डोळे मिटले. मन दगडाहूनही कठोर केलें. तोंच त्या कोपिष्ठ याचकाचा चेहरा तिला डोळ्यापुढें दिसूं लागला. त्यासरशी तिनें सुरी उगारली, क्षणांत चिलयाचें शीर धडापासून वेगळें झालें. तें शीर तें कमळ—कसें होतें ! वाचकहो, त्या चांगुणेचा—त्या देवतेचाना तो कुसवा ! त्या चेहऱ्यावर हास्यच विलसत होतें. तिकडे एकवार डोळे उघडून त्या मातेनें पाहिलेसें केलें. तिला जबर मूर्च्छा आली परंतु त्यांतही तिला तो अतिथि दिसला. झालें. कर्तव्य हें सारिलेंच पाहिजे. असें मनांत येतांच ती अर्धवट भानावर आली.

इकडे ब्राह्मणाचा तगादा लागलेला पाहून राजा स्वतः पाकशाळेंत आला. तोंच छिन्नविछिन्न होऊन पडलेला पुत्र, व त्या दुःखानें मूर्छित पडलेली पत्नी पाहून त्याला आलेला गहिंवर दाबून त्यानें ह्मटलें:—" उठ, चांगुणे उठ ! "

पण छे ! ती प्रबल मूर्छेनें पडली होती. शेवटीं राजानें तिचें मस्तक आपल्या अंकावर घेऊन तिच्या डोळ्यांना पाणी लाविलें.

"चांगुणे, सावध हो, सावध हो. जें होणें अवघड म्हणून मला वाटत होतें तें माझ्यासाठीं–या अभाग्याच्या सत्वासाठीं तूं पार पाडलेंस. आतां याचकाचा शाप तरी कशाला ? चांगुणे–माझ्या देवते चांगुणे, अतिथीला तृप्त करून नंतर आपल्या चिलयाच्या भेटीला जाऊं."

राणी सावध झाली. ती म्हणाली:— "चिलया,– महाराज, या पापिणीनं तुमचा वंशमुकुट छिन्नविछिन्न—महाराज, तुमचं सत्व जाऊं नये, अतिथीनें क्रोधानें शाप देऊं नये, म्हणून हें माझं बाळ, तुमचं लेंकरूं मी त्याच्या पायावर घातलं हो ! "

"नाहीं. माझे कुलभूषणे, सत्वस्थ चांगुणे मला असं कसं वाटेल ? माझ्या लाडक्या चांगुणेचं हृदय लोण्याहूनही मृदु आहे, हें मला माहीत नाहीं काय ? आहे ! लाडके, आज याचक तृप्त होणार, तें माझ्या चांगुणेच्या धैर्यानं, चांगुणेच्या स्वार्थत्यागानें ! हें मी न जाणण्याइतका मूढ आहे कां ? चांगुणे, शब्द मी दिला; पण पार तूं पाडलास. ऊठ–ऊठ. आतां हें मांस ताटांत वाढून ते जाई तों आपण गप्प राहिलों कीं आपलं कर्तव्य संपलं."

चांगुणेनें तें मुखकमल उचललें, एकवार प्रेमानें त्याचें चुंबन घेतलें, व तें तसेंच पाहण्यासाठीं ठेवून बाकीच्या शरीराचें मांस सोन्याच्या ताटांत ठेविलें. व अतिथीला बोलवावयास तिनें सांगितलें. तिच्या डोळ्यांतून वारंवार आंसवें येतच होतीं !

राजानें ब्राह्मणाला बोलाविलें. अतिथि पाटावर बसला. त्यानें क्षणमात्र ताटांतील मांसाकडे पाहून राजाला म्हटलें:—

"कायरे श्रियाळा, तूं काय माझी मस्करी चालविली आहेस काय ? व्यवहारशून्या, मी काय व्याघ्रसिंहासारखा पशू म्हणून तूं माझ्यापुढें हें कच्चें मांस ठेवलेंस ? हें पहा अशा अवहेलनेपेक्षां मला तूं साफ नाहीं म्हणतास, तर मला राग आला नसता, आणि वाईटही पण वाटतें ना."

दुःखावेगानें गहिंवरलेला राजा हात जोडून म्हणाला:—

"महाराज, रागावूं नका. व्यवस्था करतों."

थोड्याच वेळांत मांस शिजवून आलें.

याचकानें त्याकडे पाहिलें. बराच विचार करून खेकसून म्हणाले " छे, छे! नको—नकोसा जीव झाला. राजा या ब्राह्मणाचें सामर्थ्य तुला ठाऊक नाहीं. अरे, ब्रह्मांड जाळून भस्म करीन !—ब्रह्मांड ! बाबांनों, मला तुम्ही निव्वळ जटाधारी गोसावडा समजतां काय ? कपटी—तुम्ही महाकपटी आहां. या शरिरांत शीर मुख्य—तेंच तुह्मी—माझ्याशीं कपट करून—ठेऊन या अपवित्र धडाचा पाक करून वाढलात ! तें कांहीं नाहीं—हा पहा मी चाललों—मला तुमच्या पाहुणचाराची गरज नाहीं ! तुमच्यावर माझा बिलकूल विश्वास नाहीं बस्स. माझ्या देखत तुझ्या पत्नीनें तें शीर उखळांत घालून कांडावें. आणि यापुढें जर तुमच्या नेत्रांतून अश्रूंचा एक टिपूस जरी आला तरी मी अस्साच्या अस्सा—तुमचें तें मांस अपवित्र समजून निघून जाईन. बोल—राजा बोल. तुला हें कबूल आहे ?

भक्तिपूर्ण चांगुणेला हा याचक कोणीतरी मोठा असावा, म्हणूनच त्यानें शीर ठेवल्याचें ओळखिलें; व असे महामुनि सहसा उगाच दुसऱ्याला त्रास देणार नाहींत—परंतु हे आपली कसोटीच पहात आहेत, हें उमगलें असावें. याचसाठीं अतिथी म्हणतील ती गोष्ट करावयाची असा तिचा

निश्चयच झाला. म्हणून जेव्हां राजा जास्तच चिंतातुर मुद्रेनें पाहूं लागला, तेव्हां तीच म्हणाली:—

" महाराज, ती चूक माझी आहे. आपण दयेचे समुद्रच आहांत. तरी या आपल्या कन्येला क्षमा करा व जरा थांबा. आपल्या आज्ञेप्रमाणें मी बाळाच्या शिराचा पाक करून लौकरच आपणांस वाढतें. "

" ऐकतोंच आहें. तुमच्या दर वेळच्या चुक्याच होत आहेत. पण माझ्या पोटांत खिळे कोंबले तरीसुद्धां पचतील, इतका भुकेनें काहूर केला आहेना ? पण सांगितलेलं लक्षांत आहे ना ? नाहींतर रडून भेकून घातलेल्यापेक्षां मला मुळींच नसलेलं पुरवलं. "

" नाहीं महाराज. आपल्या आज्ञेप्रमाणंच मी करितें. " असें म्हणून चांगुणेनें आपलें सत्व राखण्यासाठीं पदर कसला. तें मुख आणून अतिथी पुढें ती कांडूं लागली. अहाहा! त्यावेळीं अतिथींसही आश्चर्य वाटलें कां ? होय आश्चर्य वाटलें एवढेंच नव्हे तर अंतःकरणांत त्याला अनुकंपा उत्पन्न झाली. परंतु जों जों भक्त कसोटीची एकएक पायरी वर चढेल, तों तों देवरायांना गांजणूकीच्या अधिक पायऱ्या रचण्याची इच्छा होते. आत्तांच पहा ना ! चांगुणेनें महाकष्टानें दुःख दाबून कांडण आरंभितांच अतिथी म्हणाले:—

" काय ग चांगुणे, तुम्ही बायका दळतांना मंगलदायक गाणीं गातां ना ? चांगुणे, तूं मग मुकाट्यानें कां बरं कांडतेस ? अग माझ्यासारखा याचक, तुझ्यासारखी दाती–सांग बरं केवढा अपूर्व योग ! तेव्हां आनंदानं चार गाणीं म्हण. "

चांगुणा मनांत म्हणाली:–" आजचा माझा मंगलगीतें गाण्याचा समयच हा ! " परंतु तितक्यांत तिला वाटलें, खरंच, आम्ही बायका तरी काय, ज्यावेळीं दळण दळवत नसेल, तें कसें तरी दळावयाचें तेव्हांच ना गाणीं गातों ? असें म्हणून तिनें गाणीं म्हटलीं:—

अतिथि येऊन, मागे तुझें मांस।
न होतां उदास देह देसी ॥ १ ॥
सत्वासाठीं तुला, स्वहस्तें कापिला।
देह हा लाविला योग्य काजा ॥ २ ॥
तुझ्या भेटिलागीं मी बाळा येईन।
जाऊं दे जेवून अतिथीशीं ॥ ३ ॥
उदरा येऊनीं सार्थक बा केलें।
पित्याच्या राखिलें ब्रिदाशीं बा ॥ ४ ॥

चांगुणे धन्य ! धन्य तुझी बाई ! परंतु अद्यापि तुझ्या कसोटीच्या दोन पायऱ्या राहिल्या आहेत.

असो. अशा रीतीनें कांडणें होऊन त्याचा पाक बनवून तिनें भोजनाची तैयारी करून अतिथीला उठविण्यास सांगितलें.

चांगुणेला वाटत होतें, आतां स्वारी आनंदानें भोजन करून जाईल व मग आपण लौकरच आपल्या लाडक्याच्या भेटीला जाऊं. पण छे ! अतिथि गुरगुरत ह्मणाले:—“ राजा, तुह्मीं क्षत्रियांनीं नुसत्या लढायाच माराव्या. शत्रूच्या माऱ्यापुढें आपल्या छातीचा कोट करून तूं कित्येकदां रणांगणावर उभा असशील ! शत्रूला जेरीस आणण्याचे डावपेंच तुला माहीत असतील. परंतु व्यवहार नाहीं ! मुळींच नाहीं ! या चांगुणेपाशीं तरी त्याचे चार दिवस धडे घे. अरे मी तुझ्या दाराशीं आलों ह्मणून कायरे ? माझी योग्यता तुला ठाऊक नाहीं ? मी एकट्यानें कसें जेवावें ? पंक्तीला यजमान नको काय ? तेव्हां तूं ये. आणि हें पहा, आज या चांगुणेनं आम्हाला भोजन घालण्याचं सर्व श्रेय घेतलं आहे, तेव्हां तिलाही येऊं दे. ”

राजा, हें भाषण ऐकून दगडी पुतळ्याप्रमाणें निश्चल उभा राहिला. त्याला वाटलं, चांगुणा झाली ह्मणून काय झालं ! आतां कांहीं या संक-

टांतून आपण निभावत नाहीं. परंतु तितक्यांत त्याची नजर तिच्याकडे जातांच तिनें, " कांहीं हरकत नाहीं. " अशा अर्थाची खूण केली. इतकेंच नव्हे तर राजाचें व आपलें अशीं पानें वाढून घेऊन ती ह्मणाली:—

" महाराज, आपणांस इतकं संकट कां बरं वाटतं ? चिलया आपलं बाळना ? नाथा, मग पोटची वस्तु पोटांत घालण्यास काय हरकत ! त्याचसाठीं अतिथीचें मन मोडून आपल्या सत्वाची हानी होणार ना ? चला महाराज, आपलं बाळ जाऊन पुनः अतिथि नाराज होऊन जातील असं करून तरी अधिक काय आहे ! "

"ही बोलत आहे ही आपली लाडकी चांगुणाच का ? कां आज साक्षात् लक्ष्मीनें इच्या अंगांत प्रवेश केला काय ! अतिथींच्या एकेका आज्ञेनें माझं काळीज फाटून जातें. आतां यावेळीं खास माझी चांगुणा यांच्या आज्ञेच्या कचाटांतून तगणार नाहीं असं वाटतं होतं. परंतु ही तर आपणच होऊन सर्व गोष्टींस राजी होऊन उलट मला धीर देते ! चांगुणे, अत्यंत कोमल अंतःकरणाचे चांगुणे, शाबास तुझी ! आज मला तूं लाजविलंस!" राजाचे मनांत असे विचारतरंग उभे राहिले. परंतु पुनः स्वारीची तब्येत जावयाची, या धास्तीनें राजा उठून अतिथीसह पानावर बसला. आतां मात्र आपण निभावणार, अशा विचारानें त्यांचा जिव जरा हलका पडला. आतां फक्त घास घेण्याचेंच राहिलें. तोंच अतिथीची स्वारी ताडकन् उठून म्हणाली:—" बरी लौकरच आठवण झाली ! कायरे राजा, खरंच तुझाला दुसरा मुलगा नाहीं ? मग नाईलाज. अरे खुळ्या, तुम्हां निपुत्रिकांचीं तोंडंसुद्धां पाहूं नये. मग मजसारख्या ब्राह्मणानं अन्न ग्रहण कसें करावें ! अशक्य, अगदीं अशक्य. जातों राजा, तूंच सांग निपुत्रिकाच्या घरीं अन्न घ्यावं का ? "

अतिथि उठून दोन पावलें टाकतात तोंच उभी राहिलेली चांगुणा धाड्कन् जमिनीवर पडली. तिनें आतांपर्यंत दगडापेक्षां कठोर केलेलें मन

कोठच्या कोठें वितळून गेलें. तिला राहवेना. डोळ्यांतून आश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. कंठमुक्त करून तिनें हंबरडा फोडला.

" बाळा, जळोतरे माझे हात ! अहारे दैवा ! माझं बाळ जाऊनच्या जाऊन पुनः अतिथिही गेले ! धरणीमाते, नको नकोच अंत पाहूं ! घे–घे मला पोटांत ! हाय ! हाय ! मी कुठं जाऊं ! माझं बाळ–गेलं माझं बाळ !" मीच चांडाळणीनं त्याचा गळा कापला. अतिथि, एकच होतं ते बाळ तुह्मांला दिल्यावर आह्मी पुत्रवान् कशी राहूं ? आणि असं जर करावयाचं होतं तर कां हो माझं बाळ बळी घेतलं ! आणि आपल्या मधुरस्वरानं 'माझा देह सार्थकीं लागूं दे ' असें ह्मणून तुह्मासाठीं आपला प्राण उदारतेनं देणारा माझा बाळ गेला काय ! नाहीं ! तो सूर्यचंद्र असे तोंपर्यंत आपल्या तेजानं जीवंतच आहे. मग आह्मी निपुत्रिक कशीं ! मी त्या दिव्य चिरायु बाळाची माताच आहें. नका, अतिथीराज, जाऊं नका. तुह्मीच सांगा, माझा बाळ कीर्तीनं जिवंत नाहीं काय ? महाराज, मी आपली कन्या आहें. येवढं माझं ऐकाच. माझा बाळ गेलाच. आतां आपण तसेच जाऊं नका. असें ह्मणून अतिथीच्या पायांवर मस्तक ठेवून चांगुणा पडली.

अहाहा ! अतिथींच्या दोन्ही डोळ्यांतून प्रेमाश्रूंच्या धारा लागल्या. इकडे पार्वतीआई गुप्तरूपानें, पुढें काय होतें तें पाहण्यासाठीं आल्या होत्या. त्यांना काय वाटलें ! खरें तेंच वाटलें. आपणापेक्षां चांगुणा अधीक श्रेष्ठ आहे, हें खरें, असेंच वाटलें.

नारदानें अशा रीतीनें श्रीशंकर सत्व घेण्यास निघतांच, ती वर्दी सर्व देवांना दिली होती. त्यामुळें देवही विमानांतून हा सोहळा पाहतच होते ! इतकेंच काय, परंतु त्यांना धाक पडला, कीं, आतां या चांगुणेस हे काय देतील कोण जाणे ! परंतु त्यांनींही पुष्पवृष्टि केली. अतिथींनीं पायांवर पडलेल्या चांगुणेस उठविण्यास ते–कैलासनाथ खालीं वांकलेच.

" ऊठ, वत्से चांगुणे उठ. शोक आवर. मी जात नाहीं. भोजन

करतों. मात्र तें तुझ्या पुत्राखेरीज नाहीं. तर माझ्यावर तूं विश्वास ठेव पाहूं. आपल्या मुलास हांक मार–मार, चांगुणे तो येईल.

"येरे माझ्या तान्हुल्या–चिलया येरे. हे पहा अतिथी तुझ्यावांचून जेवीत नाहींत."

नुसत्या दृष्टिक्षेपानें ब्रह्मांड उत्पन्न करण्याचें ज्यांचें सामर्थ्य, त्यांनीं म्हटल्यावर चिलया कसा येणार नाहीं ! चांगुणेचें बोलावणें सरतें तोंच झुमझुम असा आवाज झाला ! चांगुणा तिकडे पहाते तों काय, आपला पुत्र धांवत येत आहे. तिनें दोन्ही हात पसरले. आपल्या लाडक्यास कवटाळणार तोंच अतिथींचे ऐवजीं हातांत डमरू, डोक्यावर जटा, त्यांतून वाहणारी गंगा, कपाळावर अर्धा चंद्र अशा थाटांत श्रीशंकर दिसले. त्यांनीं चिलयाला मांडीवर बसविलें. चांगुणा व राजा श्रियाळ यांच्या अलौकीक आनंदाचें वर्णन काय करावें !

"जा बाळा, अगोदर आपल्या आईला भेट जा. चांगुणे, हा अतिथि तुला यमासारखा वाटला असेल नाहीं ? चांगुणे, माझ्याकडे पाहून आश्चर्य मानूं नको. तुह्माला कसाला लावण्यासाठीं मी महादेव आलों होतों. वत्से, तुझ्यासारख्या सद्गुणानें वैभवाशिखरीं चढलेल्या कन्येस मी काय देणार ? त्यांतून तुला माहितच आहे कीं, मी स्मशानांत राहणारा दरिद्री तुला काय देणार ? तरीपण तूं कांहीं तरी माग.

**"देवा, मला दुसरं कांहीं नको. पतीच्या व याचकांच्या सेवेस हा देह असाच झिजो, आणि आपल्या कृपेनें माझी बुद्धि सद्भक्तीनें नेहमीं अशीच ओली चिंब राहो !"**

माझ्या वाचकभगिनींनो, अशा आपल्या पुराणकाळच्या आर्यभागिनी होत्या बरं ! आज आपलं कामही त्यांचीं चरित्रें, ( नाटकें कांदबऱ्या वाचण्यापैकींच थोडा वेळ काढून ) वाचणें, व आपल्या लहान मुलींच्या मनावर हीं चरित्रें बिंबविणें हेंच होय. आणि हें केलें तरी पुष्कळच होईल !

---

# सुमती.

पूर्वकाळीं काशिराज नांवाचा एक राजा राज्य करीत होता. त्याला दोन मुली होत्या. पैकीं वडील मुलगी शांडिल्या ही लग्नाला योग्य झाल्यावर तिच्या वरशोधनाची राजानें तयारी चालविली.

सायंकालचा समय. सूर्य पश्चिम दिशेला अत्यंत वेगानें जात होता. त्याचे किरण अत्यंत तेजःपुंज दिसत होते. राजवाड्याच्या मागील पुष्करणीवर ते किरण पडल्यानें तिला मनोहर स्वरूप प्राप्त झालें होतें. त्याच पुष्करणीवर राजकन्या शांडिल्या येऊन बसली. तिनें आपले गौरवर्ण पाय पुष्करणीच्या पायऱ्यांवर बसून पाण्यांत सोडले. तिच्या मागच्या पायरीवर तिचा पदर रूळत होता. ते सुकुमार गोंडस हात डोळ्यांवर येणारे कुरळे केस मागें सारीत होते. पाण्यांत ती सुंदर राजकन्या पाय नाचवीत असल्यानें तिच्या पायांतल्या तोरड्यांचा कर्णमधुर ध्वनि निघत होता. त्यायोगानें पायांजवळ येणारे लहानलहान मासे दूर पळत. अशा रीतीनें ती एकाग्र बसली असतां एकदम मागून तिचे कोणी डोळे झांकले.

" कोण बरं ? हात चाचपीत शांडिल्या ह्मणाली. " हं समजलं—सुमती ! "

" ताई, कसं ग मला ओळखलंस !

" हो—न ओळखायला काय झालं ! माझ्या सुमतीखेरीज इतके रेशमासारखे मऊमऊ हात दुसरे कोणाचे असणार !

इतक्यांत दोन तीन सख्या आल्या. एकीनें नुकत्याच तोडून आणलेल्या फुलांचे गुच्छ करून दोघी राजकन्यांस दिले.

" ताई आपण गडे येथें कांहींतरी खेळूंया ! सुमती ह्मणाली.

" नको–सुमती, तो पाहिलास का दिवस मावळत चालला ! "

" मावळेना ? " निर्भयपणें सुमती म्हणाली.

" तुला कधीं कशाची भीति वाटतेका सुमती ? अग, आतां अंधार पडेल, बागेंत हीं झाडंझुडं आणि कसं बरं खेळावं ? त्यांत या बाजूला नौकरलोकांची रहदारी वगैरे कमीच. वेळ आहे प्रसंग आहे ! "

" ताई, तूं अगदीं भागुबाईच ! उद्यां त्या नवऱ्याला या भीतीच्या त्रासानं पुरेपुरेसं करशील ! "

" खरंच गडे आतां शांडिल्याताईचं लग्न होणार, मग कसं बाई करमेल ? आज महाराजांनीं प्रधानांना कोठेंसा सांडणीस्वाराहातीं लखोटा पाठविला ! " सख्या म्हणाल्या.

"हो–आतां कोठला तरी एक राजपुत्र येईल नि ताईला घेऊन जाईल. वाईट बाई हें ! आई बाप सोडावयाचे नि दुसऱ्याच्या घरीं जावयाचें " सुमती म्हणाली.

" तुलाही आतां एकदोन वर्षांत असंच जायचं बरं ! " शांडिल्या म्हणाली.

" मी मुळींच लग्न करणार नाहीं ! "

" बाबांपुढं तुझं काय चालणार ? "

" तें पहाशील. ताई, मी बाबांना माझंच म्हणणं कबूल करवीन. मी आतां मुद्दाम घोड्यावर बसणं, तलवार पट्टा खेळावयास शिकणं, धनुष्याला तीर जोडणं, वगैरे शिकणार आहें. "

कांहीं दिवसांनीं लौकरच शांडिल्येचा एका ( राजपुत्राबरोबर न होतां ) ब्राह्मणाबरोबर विवाह झाला.

इकडे सुमतीनें नित्य नित्य राजाचें मन वळवून युद्धकलेचें शिक्षण घ्यावें. सुमती स्वरूपानें शांडिल्येपेक्षां सरस असून स्वभावानेंही ती

स्वाभिमानी होती. तिच्या अंगीं निश्चयीपणाही विशेष होता. धैर्य तर तिच्या हाडींमासीं खिळून गेलें होतें. या गुणांमुळें ती युद्धकलेंत निपुण झाली.

थोड्याच वर्षांनीं तिच्या लग्नाच्या गोष्टी निघूं लागल्या. आपली कन्या सुंदर पण जरा हट्टी आहे, ही गोष्ट लक्षांत घेऊन राजानें दूरदूर देशींच्या राजपुत्रांच्या तसबिरा मागविल्या. परंतु राजकन्येला त्यांपैकीं एकही तसबीर पसंत पडेना. शेवटीं राजा कंटाळून गेला. एक दिवस त्यानें मुलीची भेट घेतली व तो म्हणाला:—

" बाळे सुमती, तूं हें मांडलें आहेस तरी काय ? पोरी, मी तुला देशोदेशींच्या राजपुत्रांच्या तसबिरा किती बरं दाखविल्या ? त्यांपैकीं तुला एकही पसंत नाहीं ना ? "

" नाहीं बाबा. मला पाहिजे तसा पती त्यांत नाहीं. बाबा, मी ह्मणतें तुम्ही माझं लग्नच करूं नका. "

राजानें परोपरीनें तिची समजूत केली. परंतु ती आपला हेका सोडीना. तेव्हां ती गोष्ट तितकीच राहिली.

पुढें तिनें बऱ्याच युद्धप्रसंगीं आपलें शौर्य प्रकट केलें. कांहीं काळानें पित्याच्या राज्याचा भार तिनें बहुतेक आपल्या शिरावर घेतला. नंतर देहाचें सार्थक व्हावें म्हणून तिनें अरण्यांत एक आश्रम बांधिला व तेथें ती दानधर्म करीत ईश्वरचिंतनांत आपला काळ घालवूं लागली. तिचा बाळपणचा हूडपणा जाऊन आतां तिच्या अंगीं गांभीर्य आलें. तिनें आपला सुकुमार देह व्रतें उपोषणें करून कृश करून घेतला. तिच्या आश्रमाच्या बाजूनें जवळच एक नदी वहात होती. त्या नदीवर ती सांजसकाळ स्नानाला जाई. सुंदर अशा हरिणबालकांना कुरवाळीत तिनें वाळूवर आपलें आसन ठोकावें तिच्या मानी चेहऱ्यावर या वेळीं मार्दव दिसे. तीं रम्य अशीं हरिणबालकें तिच्या अंगाशीं बिलगून बसत. तिच्या

खांद्यावर आपली मान टाकून तीं आपल्या प्रेमळ सांगातीणीशीं मूकाभाषेंत बोलत कीं काय, असें वाटे.

इकडे तिची वडील बहिण शांडिल्या पित्यानें पाहून दिलेल्या पतीची एकनिष्ठपणानें सेवा करी. पतीचें सुख तेंच आपलें सुख, पतीचें दुःख तेंच आपलें दुःख असें तिला वाटे. अशी तिची पतीच्या ठिकाणीं भक्ति होती. तिचा पति स्नानसंध्याशील ब्राह्मण होता. तो आपला काळ स्वकर्म व ईश्वरचिंतन यांत घालवी. शांडिल्या त्यांत त्याला सहाय्य करी. अशा रीतीनें दोघें सुखानें कालक्रमण करीत होतीं.

कांहीं दिवसांनीं असें कांहीं त्या शहराचें दुर्दैव ओढावलें कीं, तें शहरच्याशहर अग्नि लागून जळूं लागलें. अनेक वाडे, संपत्तीनें भरलेलीं घरें अग्निमुखीं पडलीं. आबालवृद्ध सैरावैरा धावूं लागले. सुमती तें पाहून अत्यंत चिंतातुर झाली. एखादें परचक्र येतें तर तिनें हातांत शस्त्र घेऊन त्याचें निवारण केलें असतें. परंतु ह्या संकटाची गोष्ट अशी नव्हती. तिला तें संकट निवारणें जवळ जवळ अगदीं अशक्य होतें. शेवटीं ती धैर्यशालिनी आपल्या संरक्षणासाठीं हिंडूं लागली. कारण तिची गुंफाही अग्नीनें ग्रासली होती. त्यावेळीं सूर्यनारायणानें जणुं आपले सहस्र डोळे उघडले होते, इतकें कडक ऊन पडलें होतें. वरून उन्हाचा तडाका, खालून जमीन तापलेली, भोंवताली प्रचंड ज्वाळांचें आवरण, विसाव्याला दूरपर्यंत एक सुद्धां वृक्ष नाहीं, अशा परिस्थितींत ती सुमती इकडे तिकडे मोठ्या धैर्यानें संचार करीत होती. जी कधीं शत्रूच्या अफाट सैन्याला, वीरांच्या रणकर्कश आरोळ्यांना, बाणांच्या वृष्टीला, कधीही भ्याली नाहीं तीच सुमती आज थोडी चिंतामग्न झाली. हिंडतां हिंडतां तिला लांब एक आश्रम दिसला. ती आश्चर्ययुक्त मुद्रेनें तिकडे पाहूं लागली.

" अरे ! हा तर माझ्या ताईचा आश्रम होता तिथंच दिसतो ! हो–तो तिचाच आश्रम. " असें ह्मणून ती त्याजकडे जाऊं लागली.

इकडे अग्नि लागलेला पहातांच साध्वी शांडिल्या आश्रमाबाहेर आली. चोहोंकडे पाहतांच तिला क्षणभर–क्षणभरच भय वाटलें. थोडा विचार करून तिनें आश्रमांतून थोडें पाणी आणिलें. तें तिनें आपल्या आश्रमाभोंवतीं शिंपडलें व अग्नीला उद्देशून ह्मटलें:—

"हे अग्निदेवा, तपस्वी, मुनि व आमच्यासारख्या बायका यांना कशाचेंही भय नाहीं. तथापि, देवा मी हद्द घालून ठेवली आहे. तरी या पाण्याच्या शिंपडलेल्या हद्दीच्या अलीकडे त्वां येऊं नयेस. बा अग्निदेवा, ही माझी विनंती जर मी, कायेनें, वाचेनें अगर मनानें पातिव्रत्यापासून ढळलें नसेन तरच मान्य कर. देवा, लग्न झाल्यापासून पतीशिवाय मला दुसरें दैवत नाहीं. तरी देवा, तूं आमच्या या आश्रमाला धक्का लावूं नये. देवा, माझे पति अत्यंत ईश्वरभक्त असून तपस्वी आहेत. तेव्हां त्यांनीं मनांत आणिलें तर ते तुला शापून टाकतील."

पतिव्रतेचा शब्द मोडण्याचें कोणीं साहस केलें आहे काय ? आणि केलें तरी त्याचा परिणाम कधीं चांगला झाला आहे काय ? नाहीं. अग्नीनें शांडिल्येचा आश्रम वगळून बाकीचा प्रदेश जाळून भस्म केला.

अग्नि विझल्यानंतर शांडिल्या आश्रमाचे द्वारांत उभी होती. झालेल्या अग्निप्रलयानें पशुपक्षी व माणसांची प्राणहानि वगैरे झाल्याबद्दल ती व तिचा पति खेद करीत होतीं. इतक्यांत समोरून कोणी स्त्री आपल्या आश्रमाकडे येत आहे, असें त्यांनीं पाहिलें.

" अग्नीच्या तापानें त्रासून बिचारी कोणी तरी स्त्री येत आहे. आलेल्या पाहुण्याचा सत्कार हा केलाच पाहिजे, असा गृहस्थधर्म आहे. " असें ह्मणून ती त्या स्त्रीच्या सत्कारार्थ आश्रमाबाहेर आली. सुमती जवळ येतांच दोघी बहिणींनीं एकमेकींना ओळखिलें. सुमतीला पोटाशीं धरून शांडिल्या ह्मणाली:–

" चल, सुमती आंत चल. या प्रखर सूर्यतापानें व अग्नीच्या जाळ पोळीनें तुझें मुख किती लाल झालें आहे ! आणि-अग बाई ! हें काय ! माझें सुमन ! ( लडीवाळपणानें भगिनीला ती या नांवानें हाक मारी ) तुझ्या पायाला हे फोड ! अगबाई, केवढाले तरी फोड हे ! सुमती, तुझें सारें अंग कसें तापलें आहे ! चल, आंत चल. आधीं मी तुला थोडेंसें खाऊं घालतें. वाळ्याचें गार पाणी पी. आणि जरा विश्रांति घे. चल. "

शांडिल्येनें सुमतीचा हात धरून आंत नेलें. एखाद्या भ्रमिष्टासारखी सुमतीची स्थिति झाली. ती मनांत म्हणाली:–'ही माझी ताईच कां ? होय. ताई तर खरीच किंवा ही एखादी देवी आहे ! अहाहा ! कोण माझ्या ह्या ताईचा उदार व शांत स्वभाव ! पण खरंच, बाकीचें सर्व अरण्य जळून खाक झालं आणि हाच येवढा आश्रम कसा राहिला ! छे, तें कांहीं नाहीं. कदाचित् मी केलेल्या दानधर्मानें आणि व्रतवैकल्यानें संतुष्ट होऊन आज संकटकालीं देवानें तर आपल्या मायेनें हा आश्रम व ही ताई उत्पन्न केलीं नसतील ना ? बरें असें नाहीं म्हणावें तर सर्व अरण्य जळून एवढाच आश्रम कसा रहावा ? अरेरे ! आपल्यासाठीं देवाला कष्ट ! पडो हा देह ! देवराया मी कायरे समजूं ? याचा उलगडा मी कोणापाशीं करूं ? पण–पण नकोच मुळीं शंका ही. ही ताई, हा आश्रम, हें सर्व या ईश्वरी मायेनें निर्माण केलेलें आहे."

" ऊठ, सुमती ऊठ तूं थोडें खा, पाणी पी, म्हणजे पहा बरं तुला हुशारी येते कीं नाहीं ? " आपले दोन्ही हात जोडून सुमती यावर म्हणाली:—

" देवी, मी या मोहांत कशाला पडूं ? आपलें स्वरूप मी ओळखलें आहे. हे माते, मी अज्ञानी लेंकरूं आहें. माझ्या अपराधांची क्षमा कर. माझे कृपाळू आई, या देहासाठीं आपण कां कष्ट घेतलेत ! "

असें ह्मणून सुमतीनें भक्तिभावानें तिच्या पायावर मस्तक ठेऊन अश्रूंनीं तिचे पाय भिजविले.

शांडिल्येला वाटलें, आपली भगिनी त्या प्रदीप्त अग्नीनें, प्रखर उन्हानें व श्रमानें कष्टून तिला भ्रम झाला आहे. ह्मणून पायावरील सुमतीला सांवरून जवळच्या एका भांड्यांतलें गार पाणी तिच्या डोळ्यांला लाविलें. एक ओला रुमाल तिच्या डोक्यावर ठेविला.

" सुमती, तूं किनई उन्हांतून आल्यानें तुला ही ग्लानि आलेली आहे तेव्हां जरा तूं स्वस्थ पड पाहूं ! सुमती, तो तुझा धीट स्वभाव कुठें ग गेला ! बाळ, जरा हुशारी धर. "

" ताई, तूं माझी खरी ताईच आहेस काग ! "

" ह्मणजे काय !" अत्यंत आश्चर्ययुक्त मुद्रेनें पहात शांडिल्या ह्मणाली.

" मग सांग—ताई, या वेड्या सुमतीला सांग. सगळं अरण्य, येथील आश्रम, जवळपासचीं घरंदारं, फार तर काय येवढाले प्रचंड वृक्षसुद्धां जळून खाक होऊन गेले व हा तुझा आश्रम, येथला तुझा हा छोटा बाग, आणि झाडंझुडं तेवढीं कशी ग राहिलीं ? ताई, अशी काय तुझ्यापाशीं जादू आहे बाई ! ही माझी शंका दूर कर. ताई, तुला वाटतं आहे ना कीं 'ही असं काय बडबडते नि करते,' तर ताई, तुझाच तेवढा आश्रम कसा ग राहिला ? मला अद्यापही वाटतं कीं तुह्मीं कोणीं तरी देव आहां, आणि मुद्दाम येथें माझ्या ताईच्या आश्रमाचे जागीं आश्रम आपल्या दैवी शक्तीनें उत्पन्न केला. " आपल्या बहिणीच्या खांद्यावर लडीवाळपणें हात ठेवून शांडिल्या ह्मणाली:—

" अहा ग खुळे ! मला वाटलं कीं तुला उन्हानं तिरीमिरी येऊन तूं भानरहित झालीस. बाईग तुझी शंका अगदीं बरोबर आहे.

पण त्याचा उलगडा सुमति, मी करितें. सुमति, मी कोणी देवी नाहीं. तुझी लहानपणची जी ताई मी होतें तीच आहें. आतां हा आश्रम न जाळण्याचं कारण, सुमति, ' हे माझ्या पूज्य पतीचे पाय. बाईग, त्या पायांची मी एकनिष्ठपणें सेवा केली आहे. सुमति, मला दुसरातिसरा देव माहित नाहीं. तूं आश्चर्य मानूं नको. अग, रानावनांत राहून जें ज्याचें उपास्य दैवत असेल त्याप्रमाणें, गणपतीची, मारुतीची, रामाची, शाळिग्राम व बाण यांची भक्ति करून देव म्हणून एकनिष्ठ मनानें त्यांची सेवा करून ऋषिमुनि स्वसामर्थ्यानं नाहीं का अघटित गोष्टी करीत? मग या चालत्या बोलत्या देवांना देव मानून जर सेवा केली तर तशी शक्ति कां नाहीं येणार? हा आश्रम जळूं नये म्हणून मी अग्निनारायणास म्हटलं कीं, ' बाबारे माझ्या देवांना ताप होईल तरी तूं या आश्रमाला स्पर्शही करूं नकोस. तें–तें बघ लांब पाणी शिंपडलं आहेना तितकी हद्द मी त्यास आंखून दिली होती. त्याच्या अलिकडे तो आला नाहीं. पहा तूंच."

"काय! हें सामर्थ्य—अग्निसारख्या देवतेला हुकूम सोडण्याचें सामर्थ्य तुझ्या अंगीं आहे? कशानें बरं तें?"

"पातिव्रत्यप्रभावानं बरं सुमति! बाईग अग्निच काय पण पाहिजे त्या देवतेस आज्ञा करण्याचं सामर्थ्य माझ्या अंगीं आहे. सुमति, इतकंच काय, पण इंद्रादिक देवांना थरथर कांपावयास लावण्याचें सामर्थ्य या पातिव्रत्यांत आहे. सुमति, आठवतं कां तुला आपण लहानपणीं पुष्करणीवर बसलों होतों त्यावेळीं तूं म्हटल्याप्रमाणें वागलीस. लग्न केलं नाहींस–हें ऐकून मला अत्यंत वाईट वाटलं. बाईग, बायकांच्या जन्माचें सार्थक हातांत तरवार धरून होणार नाहीं. सुमति, त्यांना जर हा भवसागर तरून जाणें असेल तर त्यांनीं या पातिव्रत्यनौकेचाच आश्रय केला पाहिजे. सुमति, देवानंच प्रजा उत्पन्न करून त्यांचें संगोपन करण्याची कामगिरी आपणां बायकां-कडे सोंपविली आहे. बाईग, आपल्या अंगीं असलेल्या प्रेमाच्या झऱ्यानें

मृदु अंतःकरणानें, वात्सल्यानें तें काम करण्यास बायकांना मुळींच श्रम पडत नाहींत. सद्गुणी, निरोगी अशा प्रजेची निपजण ही मुख्यत्वेंकरून बायकांचे वर अवलंबून आहे. खेरीज, पतीची सेवाचाकरी, मुलांचं संगोपन, इतरांवर भूतदया इत्यादि गोष्टींनीं आपलं सर्व काम होतें. आपले हातून प्रपंच करितां करितां सहज परमार्थ होतो."

"अहारे देवा! ताई मी आजपर्यंत भलत्याच हट्टानं आपला देह कष्टविला. ताई, मी शूरपणानं युद्धं केलीं. तथापि त्याचा परिणाम कांहींच नाहीं. उपासपारणीं, व्रतवैकल्य हींही निरुपयोगी झालीं! ताई, तुझ्या अंगीं अलौकिक तेज व अंतःकरणांत विलक्षण शांति दिसत आहे. ताई, सांग ताई, मला हा देह कारणीं लावण्याचा कांहीं मंत्र सांग. व्यर्थ रे देवा, मी इतका खटाटोप केला! ताई, वडील बहिण मातेच्या जागीं—ताई घे या हतभागिनीला ओटच्यांत घे. ओढ, माझे देवते तुल्य ताई या खोल खाड्यांत पडलेल्या तुझ्या लेंकरास वर ओढ. ताई, तुझ्या आज्ञेप्रमाणें मी पुढचें पाऊल टाकणार. ताई तूं माझा वाटाड्या—तूं मला सुरक्षित मार्गाला लाव."

"सुमती! आज केवढं कार्य झालं! तुझ्या भर्कटलेल्या विचारांना ताळ्यावर आणण्याचें काम करण्याची संधि त्या अग्नीनेंच मला आणून दिली. पहा वाईटांतून चांगलं कसं निघतं तें! सुमति, मी सांगेन तसं तूं ऐकणार ना? उठ—सन्मार्गाला लागणारे बाळे उठ. पातिव्रत्त्याचा धडा घेण्याकरितां पदर कसून तयार हो. पहिल्यानें तुला थोडा त्रास पडेल; पण त्यानेंच तुला शेवटीं इहपरलोकीं सौख्य लाधेल."

असें म्हणून शांडिल्या किंचित् सचिंत बसली. नंतर म्हणालीः—

"सुमति, आतां तूं येथून त्या वाटेनें पुढें जा. तेथें तुला पवित्र गंगाकांठ लागेल. प्रथम त्या गंगेंत सचैल स्नान कर. पश्चात्तापानें व अग्नि-

तापानें तापलेलें तुझें शरीर ती गंगाबाईच शांत करूं शकेल. नंतर तेथूनच जवळ एक शिवमंदिर आहे तेथें जा. सुमति, लक्षांत ठेव—शंकराच्या देवळांतून बाहेर पडतांच तुला जो पुरुष प्रथम दिसेल त्याला तूं आपला देह अर्पण कर. मग तो कसाही असो. जा. त्याला संतुष्ट ठेवण्यांत, त्याची आज्ञा पाळण्यांत, त्याची शुश्रूषा करण्यांत हा तुझा देह झिजव—बाईग, दगडाला प्रथम टांकीचे घाव खावे लागतात, तेव्हांच ना त्याला देवत्व येतें ? मगच प्रत्येक मनुष्य त्या देवापुढें आपलें मस्तक नमवितो ना ? झालं तर मग ! त्वांही आज देहदंड सोसावा व पातिव्रत्यजिन्याची एकेक पायरी चढूं लागावी. पायांत गोळे येतील, धापा लागतील, पण तूं तो आपला धर्म—आपलें कर्तव्य म्हणून तें अवश्य करावें. सोन्याला सुद्धां प्रथम तावास लावतात ना ? तेव्हांचना तें कसाला चढतें ? ऊठ, जा. तूं जें जें करशील तें तें मला सर्व येथें माझे हे परमज्ञानी पति सांगतील."

"ताई, ती गंगा तर मला पावन करीलच. पण ही माझी देवता, ही माझी परम पवित्र, परम पावन भगिनी गंगा माझ्या पापी देहावरून गेली आहे. त्यानें हा माझा देह पावन नाहीं का झाला ? दे—माझे परम प्रिय ताई, दे, मला मंगल आशिर्वाद दे. म्हणजे मला पातिव्रत्याचा मार्ग चढण्यास सोपान सोपा होईल. ताई, तुझ्या आज्ञेप्रमाणेंच मी यापुढें वागेन आणि मग तुला भेटेन."

" जा, माझा तुला मंगल आशिर्वाद आहे."

भगिनीच्या सूचनेप्रमाणें सुमती त्या गंगातटाकीं गेली. स्नान झाल्यानंतर ती श्रीशंकराचे दर्शनार्थ गेली. रानांतल्या सुंदर पुष्पांची गुंफलेली माळ हातांत घेऊन ती देवळाबाहेर पडली. इतक्यांत तिची दृष्टि एका कोपऱ्याकडे गेली तेथें तिला एक पाठमोरा बसलेला गृहस्थ दिसला. भगिनीच्या

शब्दांची स्मृति होऊन सुमतीनें ती माळ त्याच्या गळ्यांत घातली. आपले दोन्ही हात जोडून त्याच्या पायाशीं नम्र होऊन ती म्हणाली:—

"घ्या—पतिदेवा, या अबलेला पदरांत घ्या. महाराज मी आपली धर्मपत्नी आहें. नाथा, मला कांहीं आज्ञा करावी."

यावर तो कण्हत कण्हत तिच्याकडे पाहून ह्मणाला:—

"कोण बाई तूं कोण? मी एक रोगग्रस्त ब्राह्मण आहें, या रोगानें माझी अगदीं दीनावस्था झालेली आहे. माझा एक श्वास कसा येतो आहेन् एक जातो आहे पहा! हे सुंदर स्त्रिये, पहा या माझ्या कुष्ठपीडित देहाकडे पहा, या माझ्या अस्थिचर्माच्या सांपळ्याला हा सुंदर देह अर्पण करून त्याचा विनाकारण नाश कां करतेस? तूं तर एकाद्या अप्सरेलाही सौंदर्यांत मागें टाकशील. बोल, तूं कोणत्या भाग्यवानाच्या उदरीं येऊन त्याला धन्य केलेंस? मला वाटतें तूं रंभा, देवकन्या किंवा राजकन्या यांपैकीं कोणी आहेस. असें असतां तूं पृथ्वीवरील सुंदर सुंदर राजपुत्र सोडून या दरिद्री, रोगी अशा ब्राह्मणाकडे धांव कां घेतलीस? जा आपल्या योग्यतेचा पति पाहून त्याच्याशीं विवाहबद्ध हो. हे सुंदर स्त्रिये, मला वाटतें तूं मला न पाहतांच, मी तुझा इच्छित पतिच आहें, अशा समजानं माझ्या गळ्यांत माळ घातलीस. हंः! माझ्या गळ्यांत आतां मृत्यु लौकरच माळ घालो! आया-ई-ई, कोण ग या यातना! ईश्वरा सोडीवरे बाबा लौकर!"

"नको—माझ्या पतिदेवा नको—माझ्याकरितां—या आपल्या दासीकरितां तरी असें बोलूं नका. कांत, स्वदेह मी आपणास वाचेनें, मनानें वाहिला ना? नाथा, सांगा बरं मग मी तो दुसऱ्याला कसा अर्पण करूं? अरेरे! स्त्रिया इतक्या धर्मभ्रष्ट होतील काय! नाहीं. महाराज, नाहीं. तो आम्हां स्त्रियांचा धर्म नाहीं! आपण रोगी असा किंवा महारोगी

असा. ही सुमती आपल्या वाणीला बट्टा लावणार नाहीं. चला–माझ्या देवा चला, मी आपणास निवाऱ्याच्या जागीं नेतें. ”

“ काय ? तूं मला अद्यापहि वरण्यास कबूल आहेस ? आश्चर्य ! ऐक, या अभाग्यासाठीं तरी ऐक. आपला हेका सोड. ”

“ नाहीं. महाराज, या सुमतीनें जें एकदां वाचेनें म्हटलें त्यांत कधींही बदल होणार नाहीं. पण आपण अशा उघड्यावर नका बसूं. बसा– माझ्या पाठीवर बसा. मी आपणाला सुरक्षित जागीं नेतें. ”

असें म्हणून तिनें त्याचीं चिरगुटें बांधून तें गांठोडें खाकेस मारिलें आणि त्या आपल्या गलितकुष्ठ अशा पतीला पाठीशीं घेऊन ती एका घरापाशीं आली. राजकन्या सुमतीला पहातांच त्या घरच्या यजमानानें लवून मुजरा करून ‘ काय आज्ञा ? ’ असें लीनतेनें म्हटलें.

“ मी एक सुंदर आश्रम बांधीपर्यंत या माझ्या पतींना सुरक्षितशी थोडी जागा पाहिजे. ”

तो गृहस्थ आश्चर्यपूर्वक म्हणालाः—

“ काय हे आपले पती ? अनेक देशचे राजपुत्र नापसंत करून हे पती आपण निवडलेत ? छे ! अगदीं अशक्य ! ही माझी थट्टाच असावी. ”

“ या सुमतीचे तोंडून असत्य असा एक शब्दही कधीं ऐकला आहे काय ? जें खरें तेंच मी बोलत असतें. हं जागा आहे काय ? ”

यजमानांनीं वाड्याच्या अगदीं एका बाजूला तिला जागा स्वच्छ करवून दिली. तिनें चिरगुटें नीटनेटकीं घालून त्यावर पतीला निजविलें. नंतर भिक्षा मागून थोडें तेल, पाणी तापविण्याची सर्व सामुग्री घेऊन ती परत आली. नंतर तिनें पाणी तापवून पतीच्या अंगाला तेल वगैरे लावून त्याला स्नान घातलें. मधुरसें अन्न खाऊं घातलें. अशा रीतीनें ती अत्यंत एकनिष्ठपणें त्याची सेवा शुश्रूषा करी. आणि तिच्याच अत्यंत कष्टानें ब्राह्मणाचा रोग बराच कमी पडत चालला.

एक दिवस त्यानें तिला म्हटलें:—

" तूं गेल्यावर मला एकट्याला येथें चैन पडत नाहीं. "

" ठीक आहे महाराज. आजपासून आपणांस बरोबर नेत जाईन. "

असें म्हणून तिनें एक लहानसा पेटारा पैदा केला. त्यांत पतीला बसवून तिनें तो डोक्यावर घेऊन बाहेर जावें. अशाच एका वेळीं ती जात असतां एका वाड्याच्या माडीवरून एक फुलांचा सुंदरसा गजरा खालीं पडला तो नेमका त्या पेटाऱ्यावर पडला. त्याच्या सुवासाला मोहून तो पत्नीला म्हणाला:—" थांब, तो पहा त्या पेटाऱ्याला अडकून राहिलेला गजरा मला वासाला दे. तिनें पतीच्या इच्छेनुरूप तो गजरा त्याला दिला. नंतर ती चालूं लागली. तोंच माडीवरून गाण्याचे मंजूळ आलाप ऐकूं आले. तें ऐकतांच तो ब्राह्मण सुशीलेला म्हणाला:—

" जरा येथेंच उभी रहा. अहाहा! काय हा कंठ! धन्य विधात्या!! " असें म्हणून त्यानें पेटाऱ्यावर ताल धरून तो नागासारखा डुलूं लागला. बराच वेळ झाला तरी तो पत्नीला चलण्याविषयीं आज्ञा करीना. तो इतका भानरहित झाला कीं, आपण कोठें आहोंत, कोणत्या स्थितींत आहोंत याचीही त्याला विस्मृति पडली. त्याची दृष्टि माडीकडे रोंखून राहिली. योगायोगाच्या गोष्टी ! माडीच्या खिडकींत एक स्त्री उभी राहिली. तिनें तोंडांतून पिक टाकून ती चटकन् आंत गेली. परंतु ब्राह्मणाला वाटलें कीं, हीच स्त्री गात असावी. आणि तिच्या सौंदर्यानें तर त्याचें मन अत्यंत चंचल झालें. तें वेश्येचें घर असल्यामुळें सुमतीला तेथें उभें राहणें बरें वाटेना. पतीची आज्ञा म्हणून ती इतका वेळ तेथें गप्प उभी होती. परंतु आतां तिला तेथें उभें राहवेचना. ती अत्यंत नम्रपणें म्हणाली:—

" महाराज, हें वेश्येचें घर आहे. येथें कुलस्त्रीनें कसें उभें राहावें बरें? नाथा, गाणें बंद झालें. कदाचित् आतां मंडळी खालीं येतील. माझ्या

देवा, ही दुनिया भल्याबुऱ्यांनीं भरलेली आहे. कदाचित् कोणी माझ्याकडे वाईट नजरेनें पहातील. बीभत्स बोलतील. तर नाथ, मला घरीं चलण्याची कृपा करून आज्ञा द्या. ”

त्या पत्नीच्या भाषणानें ब्राह्मण जरा ओशाळला. व—“ चल, चल. मी नादांतच होतों. ” असें पुटपुटला.

पतीची आज्ञा होतांच सुमतीला झपाझप चालूं लागली. घरीं आल्यानंतर ती आपल्या उद्योगांत निमग्न झाली. परंतु तिच्या पतीचें चित्त स्वस्थ नव्हतें. तो एका तर एकाच दिशेकडे पहात बसे. वरचेवर सुस्कारे टाकी. त्याचा चेहरा अत्यंत चिंताक्रांत दिसूं लागला. सुमतीच्या ही गोष्ट लक्षांत येतांच ती लगबगीनें पतीजवळ गेली. प्रेमपूर्ण नजरेनें त्याजकडे क्षणभर पाहून ती हात जोडून म्हणाली:—

“ आज आपणाला काय बरें होत आहे ? कांत, आपण कसल्या बरें गहन विचारांत आहां ? महाराज, मी आपली अर्धांगी ना ? मग या आपल्या आवडत्या दासीला नाहींका बरें आपलें दुःख सांगावयाचं ? असं नाहीं गडे ! आपण दुःखी–आणि मी–मी आपली अर्धांगी, तिला हें दुःख कळायला नको का ? महाराज, अंतःकरण खुलं करण्यायोग्य मी आपणांस वाटत नाहीं कांहो ? नाथ, या चरणाशिवाय मला कांहीं नको. त्यावर मनोभावानें प्रेम करण्याविना एक क्षण गेला असेल तर–तर या अभागिनीचां देह त्याच क्षणीं पडो. पतिदेवा, सांगाहो आपलं दुःख ! तें कितीही बिकट असलं तरी ही आपली दासी काय वाटेल तें करून तें कमी करण्याचा प्रयत्न करील. ”

“ अहाहा ! सुमति, धन्य धन्य तुझी भक्ति ! असलें अमूल्य रत्न लाभलें असून मला गारगोट्याच वेचाव्याशा वाटाव्यात ! धिक्कार असो

मला ! सुमति, अशाच बायका प्रत्येक पुरुषाला लाभतील तर जगांतले कित्येक नरपशु व्यसनाच्या कचाटयांतून सुटल्याविना राहणार नाहींत. "

" पण प्रियपतिदेवा, असं काय बरं ? मी आपणांस किंचित् तरी आवडतें ना ? आपल्या प्रेमाच्या ओघापैकीं एकतरी बिंदु देण्यास तयार आहां ना ? मग मला कां बरं आपल्या उद्विग्नतेचें कारण सांगत नाहीं ? सांगा, नाथा सांगा. "

" छे, छे सुमति, मी आपलं दुःख तुझ्याकरितां मनांतच दाबणार. माझी चूकच ती. मी अविचारी खराच ! गेलं-माझ्या गुणी देवते, माझं सर्व दुःख गेलं बरं ! "

" नाहीं. मला सांगावंच. "

" सुमति, तुला सांगूं नये असें वाटतें. पण काय करूं, तुझ्या हट्टाकरितां ह्मणून मी नाखुषीनें सांगतों. सुमती, माझं ओढाळ मन त्या गाण्यानं आकर्षण करून घेणाऱ्या व्यक्तीला मीं पाहिलें. सुमति, माझें वेडें मन तेथें गुंतलें आहे. "

" इतकंच ना ? महाराज, मी नेहमींची येथली राहणारी. मला ठाऊक आहे कीं ती वेश्या आहे. नाथ ती कुलस्त्री असती तर आपलं मन माघारें ओढण्याचा मी प्रयत्न केला असता. पण ती बोलून चालून वेश्या. आणि वेश्या द्रव्याच्या साहाय्यानें पाहिजे त्याला वश होते. पण पतिव्रता कुलस्त्रिया देवांनाही वश होणार नाहींत ! महाराज, मी थोडंफार काम करून द्रव्य जमवितें. नंतर मी आपणांस त्या वेश्येकडे नेऊन पोहोंचवीन."

" तूं मानवी स्त्री आहेस ? छे. मला वाटतं तूं देवलोकची असावीस ! नाहीं तर पतीला वेश्येकडे पोहोंचविण्यास कोणती स्त्री कबूल होईल ? परंतु सुमती. मी पायानें अधू तेव्हां ती मला पत्करील काय ? "

“ पैसा—पैशानें वेश्या वश होतात. तथापि आपल्याकरितां मी तिला अगोदर विचारीन आणि मग आपणास नेईन. ” ठरल्याप्रमाणें सुमतीनें त्या वेश्येचें अनुमोदन घेऊन ती पतीला पाठीवर घेऊन एके रात्रीं निघाली. आपल्या पतीची ही अवघड इच्छाही आपल्या हातून पार पडत आहे, या मानसिक आनंदाच्या भरांत ती झपाझप चालली होती. ब्राह्मणाचें चित्तही आनंदात गर्क झालें होतें. अशा रीतीनें तें दंपत्य आनंदसागरांत पोहत आहे तोंच आपल्या पाठीशीं कोणी तरी किंकाळी मारल्याचें सुमतीच्या कानीं आलें. ती मागें वळून पहातें तोंच खालील शब्द तिच्या पतीचे तोंडून निघालेले तिच्या कानीं आले. ‘ सुमती, थांबून जरा पहा बर आतां माझ्या पायाला कांहीं तरी येथें लागल्याचा भास झाला.”

त्यावर पुढील शब्द विवळत म्हटलेले त्या दोघांच्या कानावर पडले:—

“ कोणरे तूं ? चांडाळा मला असह्य यातना देणारा तूं कोण ? आई-ई-ई ! नको—नको यातना ह्या ! पण छे ! असें कां ? ज्यानें मला या यातना दिल्या त्याला तरी मी क्षमा कां करावी ? अरे ए, महामूर्खा, मला डिवचतांना तुला मजा वाटली असेल नाहीं ? हं तयार हो. अरेरे ! कोण हे माझे हाल ! हो पण अगोदर त्याला शाप ! ज्या नरपशूनें मला धक्का लावला असेल, तो सूर्योदय होतांच गतप्राण होवो ! ”

सुळावर लोंबकळणाऱ्या मांडव्य ऋषींचे हे शब्द होते.

“ हाय हाय ! सुमती, लागला—तुझ्या सौभाग्याला अग्नि लावला ! अरेरे ! मी जर अशा अपरात्रीं वाईट हेतूनें घराबाहेर पडलों नसतों तर-तर—तर अधमा, सुशील सुमतीवर वैधव्याचा प्रसंग कां येता ? सुमती, रोगरूपी काळाच्या दाढेंतून तूं माझी मुक्तता केलीस. पण सुमती, आतां तुझ्या सौभाग्यरवीला तूं या काळाच्या दाढेंतून कसा ओढणार ? सुमती, माझे गुणसरिते सुमती, या अधमानें तुला कोणत्या गोष्टींत सुख दिलें ?

धन्य, माझे लाडके सुमती धन्य ! तूं ह्मणूनच त्या रोगांत केवळ आपल्या श्रमानें या करंट्याला जिवदान दिलेंस. परंतु मी तुला त्याचा मोबदला, तुझ्या उत्कट पतिप्रेमाला पत्नीप्रेम देण्याऐवजीं, मला वेश्यारूपी उकिरडा फुंकण्याची दुष्ट वासना झाली ! वास्तवीक मी तुझ्यासारखें रत्न सोडून त्या मायावी मोहकपणाला भुलून हें जें निंद्य आचरण करण्यास प्रवृत्त झालों, त्या मला मरणाची ही शिक्षा योग्यच नाहीं काय ? भोग, अधमा या आपल्या कृतकर्मांचीं कटुफळें भोग ! ”

‘ नाहीं, माझ्या पतिदेवा नाहीं ! महाराज, मी एक तप आपली मनोभावानें सेवा केली. पातिव्रत्याचा प्रखर नेम मी उत्कृष्ट पाळिला आहे. नाथ, पातिव्रत्याच्या योगानें येणाऱ्या सामर्थ्याची योग्यता फार मोठी आहे. मी ती योग्यता—तें सामर्थ्य—पाहिलें आहे. माझ्या देवा, आज माझ्या पातिव्रत्यरूपी सुवर्णास कसाला लावण्याची वेळ आलेली आहे. तें त्या कसाला उतरेल अशी माझी पूर्ण खात्री आहे. आपण भिऊं नका, यावेळींही मी शापरूपी यमाशीं झगडून मी आपले प्राण वांचवीन. ”

असें ह्मणून सुमतीनें हात जोडले. आत्मविश्वासानें तिनें प्रथम करुणतेनें सूर्याची—स्तुति केली. नंतर त्यास उद्देशून ती ह्मणालीः—

“ बा सूर्यदेवा, जर मी एकनिष्ठपणें पतिसेवा केली असेल, पतिप्रेमानेंच जर हें अंतःकरण सदोदीत उचंबळत असेल तर मी तुला तुझी कन्या—धर्मकन्या—विनवितें तूं उदय गिरीवर येऊंच नको. दे—सूर्यदेवा, मला चुडेदान दे. पण छे, मी अशी भिक्षा कां मागावी ? नाहीं. मी तुला आपल्या पातिव्रत्याच्या तेजानें आज्ञाच करितें कीं, तूं उगवूंच नकोस. पहातें बरें मग या ऋषींचा शाप ते कसा खरा करितात तें ? त्यांना वाटलें असेल आपलें सामर्थ्य अधिक. परंतु पतिव्रता स्त्रीचें सामर्थ्य पाहून आज त्यांना आपली मान खालींच घालावी लागेल.”

" बाईग, माझ्या शरीरतापानें विव्हल होऊन कधींहीं न घडणारा प्रमाद आज माझ्या हातून घडला. सुमति, तूं माझी कन्याच बरें कां ? ह्मणूनच माझ्या तोंडून " मला धक्का लावणारा या क्षणीं जळून खाक होवो " असा शाप बाहेर पडला नाहीं. बाईग, आह्मां तपस्व्यांपेक्षां तुह्मां साध्वी स्त्रियांचा अधिकार फार मोठा आहे. हें मला ठाऊक आहे. खेरीज, सुमति, तुला ठाऊकच असेल कीं, आह्मी सहसा शाप देत नाहीं. कारण त्या योगानें आह्मी आचरलेलें तप फुकट जातें. सुमति, तुझ्या पातिव्रत्याच्या प्रभेपुढें माझें तपःसामर्थ्य फिकेंच पडेल. अरेरे ! आतां तुझ्या आज्ञेप्रमाणें सूर्योदय होणार नाहीं आणि तो झाला नाहीं; कीं, यज्ञयागादि कर्में बंद पडणार, सर्व कर्में बंद पडल्यानें मेघवृष्टीहि थांबणार. हाय हाय ! या सर्वाला कारण माझी चूक—अविचारीपणानें माझ्या हातून घडलेला प्रमाद ! "

इकडे सूर्योदय न झाल्यानें यज्ञयाग बंद झाले. देवांचा हविर्भाग त्यांना मिळेनासा झाला. तेव्हां सर्वांनीं तें गाऱ्हाणें ब्रह्मदेवाकडे नेलें. त्यांनीं सूर्योदय न होण्याचें कारण विचारतांच त्यांना ती सर्व हकीगत कळली. थोडा विचार करून ते ह्मणाले:—

" देवहो, कांट्यानेंच कांटा काढावा लागतो. आंतां हें संकट टाळण्यास एखाद्या साध्वीकडेच आपणाला धांव घेतली पाहिजे. मृत्युलोकांत हल्लीं मोठी साध्वी कोण बरें आहे ? अरे चित्रगुप्त, पहा बरं. "

" महाराज, अनुसये इतकी साध्वी स्त्री हल्लीं दुसरी मृत्युलोकांत नाहीं. "

" ठीक तर देवहो, तुह्मी तिकडेच जा. आपल्या दुःखाचें कारण तिला कळवा. ती तुमचें संकट निवारील. "

त्याप्रमाणें देव सती अनुसूयेकडे गेले. तिनें त्यांचें ह्मणणें शांतपणें ऐकून घेतलें. नंतर ती ह्मणाली:—

“देवहो, तुह्मी निष्काळजी असा. मी सर्व पूर्वींप्रमाणें चालू करतें.”

आश्वासन मिळतांच देव स्वस्थानीं निघून गेले. ते गेल्यानंतर तिनें आपल्या परमपूज्य पतीच्या चरणावर मस्तक ठेवून अत्रिऋषींचा शुभाशिर्वाद ग्रहण केला; व ती आश्रमाबाहेर पडली. ती सुमती होती तेथें आली. तिला पाहतांच सुमतीनें तिला नम्रपणें नमस्कार केला, आणि सौभाग्यदायक असा आशिर्वादही पटकाविला.

अनुसूयेनें अगदीं कळवळ्यानें तिला सर्व हकीगत विचारली. तिनेंही मोकळ्या मनानें सर्व हकीगत सांगितली, ती ऐकून अनुसूया म्हणाली:—

“ अहाग खुळे ! यासाठीं सूर्योदय कशालाग थांबविलास ? सांग बरं त्यानं देवादिकांची किती गैरसोय झाली असेल ? ”

“ पण देवि ! सूर्योदय होतांच माझे पतिराज गतप्राण होतील, त्याची वाट काय ?

चुकतेस बरं. तूंच सांग–अग त्वां सूर्याला जी आज्ञा केलीस ती कोणत्या सामर्थ्यानें ? पातिव्रत्याच्याचना ? झालं तर मग ! त्याच सामर्थ्यानें तुला मृतपतीला सजीव नसतं का करतां आलं ? बरं चला. झालं तें झालं ! आतां तूं सूर्याला केलेली आज्ञा माघारी घे पाहूं. ”

“ माझे धर्माचे आई, तुझ्यासारखीचा आशीर्वाद, हें माझ्या डोकीवर छत्र असतां मी आतां कां भिईन ? आई, कन्येच्या सौभाग्यरवीचें रक्षण करण्यास तूं समर्थ असतांना मी कां बरं नाहीं आपली आज्ञा माघारी घेणार ? ”

असें ह्मणून सुमतीनें सूर्यास उगवण्याची आज्ञा केली. परंतु सूर्याचे कोमल किरण दृष्टीला पडतात न पडतात तोंच तिचा पति निपचित पडून त्याचें चलनवलन बंद झालें.

" घाबरूं नको," धीरपूर्ण स्वरानें अनुसूया सुमतीला ह्मणाली. " अग, असं काय ? मी–मी आहेना ? सुमती, तूं मला आई ना ह्मटलंस ? मग असं काय बरं ? सावध हो, सावध हो. "

असं मूर्छित पडलेल्या सुमतीला आश्वासन देऊन तिनें हातांत पाणी घेऊन पतीच्या चरणांचें चिंतन करून तें पाणी सुमतीच्या पतीच्या आं-गावर शिंपडलें. तो तात्काळ खडबडून उठला.

" जा, तुम्ही सुमतीला हाक मारा तरच ती लवकर शुद्धीवर येईल" अनुसूया त्याला ह्मणाली.

पतीनें हांक मारतांच सुमती सावध झाली. सावध होतांच तिच्या तोंडून आश्चर्योद्गार निघाले:—

" हें काय ! आई, पतींचे पाय कसे बरे झाले ? तशीच त्यांची कृश तनू पुष्ट व तेजःपुंज कशी झाली ? आई, हा तुझ्या पातिव्रत्याचा प्रभाव नव्हेना ? हो खचित हा तुझा पातिव्रत्यप्रभावच ! आई, चला या कन्येच्या घरीं चला. "

थोर व उदार अंतःकरणाच्या अनुसूयेनें तिच्या घरीं जाऊन तिला बराच बोध केला. नंतर ती आपल्या आश्रमांत गेली.

इतकी हकीगत झाल्यानंतर सुमती आपली ज्येष्ठ भगिनी शांडिल्या हिच्या आश्रमीं पतीसह गेली.

भगिनीभगिनींची भेट झाल्यावर त्या मोदाचें कोठवर वर्णन करावें ? शांडिल्येनें वात्सल्यानें आपल्या भगिनीला पोटाशीं धरलें. दोघींचे पदर

प्रेमाश्रूंनीं भिजून ओलेचिंब झाले होते. दोघींचे पती तो देखावा अवलोकित असतां त्यांचे कंठसुद्धां प्रेमानें भरून आले.

अशा रीतीनें थोडा वेळ गेल्यानंतर शांडिल्या भगिनीला गद्गद रवानें ह्मणाली:—

" झालं, सुमन, स्त्रीजन्माचं आज सार्थक झालं—तूं आपल्या आचरणानं करून दाखविलंस. तुला मी पुन्हा आजच दृष्टीला पडतें आहे तरी प्रतिक्षणीं मी तुझी कृति अवलोकन करीत होतें. खरोखर, तूं आपल्या या कृतीनें स्त्रीजातीला धडा घालून दिलास. "

" ताई, या सर्वांचें श्रेय तुलाच आहे बरं. "

नंतर कांहीं दिवस तेथें राहून सुमती आपल्या पतीसह स्वाश्रमीं गेली.

अशी ही साध्वी सुमतीची कथा माझ्या भगिनींना मार्गदर्शक व पुण्यकारक होवो.

# च्यवन भार्गव व सुकन्या.

रात्रींचा गाढ अंधःकार जाऊन नुकताच अरुणोदय झाला होता. व सूर्यनारायण आपले कोमल किरण उंच उंच वृक्षांच्या शेंड्यावर टाकूं लागला. अशा रम्य वेळीं मनूचा पुत्र शर्याती राजा आपल्या सेवकांना वनशोभा पहावयास जाण्याची तयारी करण्याकरितां अधिकारयुक्त वाणीनें आज्ञा करीत होता. थोड्याच वेळांत सर्व तयारी होऊन राजा शिकारी पोषाख चढवूं लागला; इतक्यांत त्याची रूपवती कन्या ( जिच्या अंगच्या सद्गुणामुळें जिला सुकन्या म्हणत, ) तेथें आली व म्हणालीः—

" बाबा, मी आपल्या बरोबर येऊं काय ? सृष्टिशोभा पहावी, असें मला वाटतें. शिवाय मला शिकारीला तुम्ही कित्येकदां नेलें आहे. बाबा, तुम्ही मला युद्धकलेचें शिक्षण दिलेंच आहे; तेव्हां वनांत माझें संरक्षण मी करीनच. मग, येवूं ना मी ? "

सर्व साधारण मुलांवर माता पितरांची प्रीति ही असतेच; पण त्यांतल्यात्यांत राजाचें रूपगुणसंपन्न अशा सुकन्येवर भारी प्रेम होतें. तेव्हां अशा त्या आपल्या कन्येचा शब्द राजाला कसा मोडवेल ? तो म्हणालाः—

" चल बाळ. माझी कांहीं हरकत नाहीं. पण काय ग, आपल्या आईला विचारलेंस का ? "

" होय बाबा. " सुकन्येनें उत्तर दिलें.

राजवैभवाच्या थाटांत सुकन्येसह राजा शर्याती शिकारीला निघाला. वाटेनें अनेक डोंगर, वृक्ष, गुहा, सरोवरें, निरनिराळ्या रंगाचे पक्षी इत्यादिकांविषयीं, राजा आपल्या मुलीला माहिती देत होता.

जातां जातां ती मंडळी च्यवनऋषी ज्या अरण्याच्या भागांत राहात होते त्या भागांत आली. तेथील तीं सुंदर हरिणबालकें, ते लतापल्लव-युक्त हिरवेगार आश्रम वगैरे पाहून त्यांना अत्यंत संतोष वाटला. अशा रीतीनें निरनिराळे देखावे पहात राजा हिंडत होता; इतक्यांत सुकन्या आपल्या दासीसह राजापासून बऱ्याच अंतरावर एक वारूळ होतें त्या-पाशीं आली. बालिकाच ती ! तिनें आपल्या दासीसह कोठें कोठें काय काय आहे तें अगदीं बारकाईनें पहाण्यास आरंभ केला.

" अग बाई ! तें पाहिलंस का काय तें ? काय बरं असावं ? पहा, पहा कसं दिव्याच्या ज्योतीसारखं दिसतं आहे ! " त्या वारुळाचें निरी-क्षण करून आपल्या दासीला ह्मणाली. दोघीही पाहूं लागल्या; पण एकी-लाही तें काय आहे याचा निर्णय होईना. एक म्हणे, तेथें काजवे असा-वेत, तर दुसरी ह्मणे, बहुत करून कोणी तरी आंत युक्तीनें मंद दिवेच ठेविले असावेत. अशी पुष्कळ वाटाघाट झाली. शेवटीं अल्लडपणास अनु-सरून सुकन्येनें जवळच्या बाभळीचे दोन कांटे घेऊन, कांहीं विचार न करितां त्या लुकलुकणाऱ्या जागीं ते भोसकले !

अरेरे ! राजकन्ये, हें त्वां काय केलेंस ? तिनें जरी ही गोष्ट अज्ञानानें केली तरी तिचा परिणाम व्हावयाचा थोडाच राहणार !

तिनें कांटे भोंकसून दोन चार पळांचाच अवकाश, तों त्या ठिकाणीं रक्ताच्या धारा लागल्या. त्या पाहातांच मात्र ती घाबरली. " अहारे दैवा ! हें काय झालें ! पहा, पहा ग भागीरथि, येथून रक्त येत आहे. अनर्थ झाला ! आतां बाबा काय ह्मणतील ? "

भागीरथी ही तें रक्त पाहून घाबरली होती. ती ह्मणाली:—

" काय ताईसाहेब हें झालं ? कुठून तुह्माला ही बुद्धि झाली ? "

" तें असो ग. पण आतां पुढें काय करावयाचें ? "

" मला वाटतं महाराजांना ही हकिगत कळवावी. "

सुकन्येला तो विचार मान्य होऊन ती तिकडे जावयास निघाली. त्या भीतभीत जात आहेत इतक्यांत एक सेवक धापा टाकितच त्यांच्याकडे आला व ह्मणालाः—

" चला—चला ताईसाहेब, स्वारी परत फिरण्याची वेळ झाली. आपणास मी किती शोधलें आणि शेवटीं इकडे आलों. "

" पण कायरे, बाबा कुटं आहेत ? "

" तेथेंच एका आश्रमांत. येथें कोणी च्यवन भार्गव म्हणून तपोनिष्ठ व ज्ञानसंपन्न ऋषी आहेत त्यांची चौकशी करीत बसले आहेत. "

" ठिक. पण तूं जाऊन त्यांना इकडे मी बोलाविलें आहे ह्मणून सांग. "

" बरें आहे ताईसाहेब. " असें ह्मणून तो निघून गेला. लौकरच राजाची स्वारी तेथें आली. आपल्या कन्येचा उतरलेला चेहरा पाहून राजा म्हणालाः—

" कां सुकन्ये, अशावेळीं तुझा चेहरा प्रफुल्ल दिसावा तो असा म्लान कां बरं ? तुझी प्रकृति ठिक नाहीं कीं काय ? कां तुला भूकतहान लागली आहे ? "

" बाबा, यापैकीं मला कांहींही होत नसून मजकडून आज एक आगळीक झाली आहे. बाबा, तें पलिकडे वारूळ आहे तें पहा. " सुकन्या बापाला ह्मणाली.

राजानें तेथें पाहिलें व ह्मणालाः—" काय आहे तेथें ? तें तांबडें रक्तासारखें काय दिसतें ? बरें चला, असेल कांहीं. परंतु तूं अपराध कसला ह्मणालीस ? "

" तोच बाबा. तेथें काजव्यासारखें काय लुकलुकत आहे तें पहाण्यासाठीं मी कांट्यानें तेथें टोचलें आणि तेव्हांपासून तेथून रक्त येत आहे. " भीतभीत सुकन्या ह्मणाली.

नंतर राजानें जवळच्या आश्रमांत चौकशी केली, तों तें वारूळ तपस्वी च्यवनभार्गवांच्या अंगावर वाढलेलें आहे असें कळलें ! इतक्यांत, आपल्या बरोबरच्या मंडळीचा गुदमारा होत असून कोणाला शौचाला वगैरे होत नाहीं, अशी बातमी एका नोकरानें आणिली. ती बातमी एकून राजा तर हतबुद्ध होऊन स्वस्थ उभाच राहिला; पण असें किती वेळ चालणार ? लौकरच तें वारूळ सावधगिरीनें पोखरलें. तेव्हां च्यवनभार्गव मुनींचा देह दिसूं लागला. सर्व वारूळ पोखरून पहातात तों ते मुनिवर्य समाधिसुखांत—अर्धवट समाधींत—निमग्न होते. ते ध्यानावर आले तेव्हां राजानें नम्रपणानें सर्व हकिगत त्यांना निवेदन केली. ती हकिगत ऐकून मुनि किंचित् स्वस्थ बसले. 'ते शापून भस्म तर नाहींना करणार,' अशा चिंतेंत राजा आहे तोंच ते ह्मणाले:—

" कायरे शर्याते, तुझ्या कन्येचें वय काय आहे ? "

त्यांच्या बोलण्याचा आशय ध्यानांत येवून राजा ह्मणाला:—" महाराज, ती अद्यापि कुमारीच आहे. तिचा अपराध भयंकर खराच—पण दयासागरा, आपण कृपा करा. "

" राजा, तूं माझा हेतू तर जाणलास. जा तर पुढील तजविजीला लाग. "

" आज्ञा महाराज. मी आपली कन्या आपणाला मोठ्या समारंभानें अर्पण करितों. " राजा ह्मणाला.

यावरून पूर्वकाळीं सार्वभौम राजेसुद्धां तपस्वी ब्राह्मण, ऋषी यांना किती मान देत, त्यांच्या बऱ्यासाठीं कसा स्वार्थत्याग करीत, हें दिसून

येतें. गेला—तो काळ गेला. तें वैभव गेलें. बा भरतखंडा ! गतकालाच्या वैभवाची स्मृति होऊन तुला गहिंवर येत असेल नाहीं ? आणि सांप्रत दारिद्र्य, दुःख, याशिवाय तुझ्या वांट्यास काय आहे ? कांहींच नाहीं !

राजवैभवांत रुळणाऱ्या सुकन्येला ही हकिगत समजली. तिला किंचित् वाईट वाटलें. परंतु स्वतःच्या अपराधाची आठवण होतांच ती त्या गोष्टीला मोठ्या धैर्यानें कबूल झाली. वृद्ध व अंध अशा पतीबरोबर आपला विवाह होणार याबद्दल तिला वाईट वाटलें नाहीं. तिनें पित्राज्ञेला आनंदानें मान वाकविली. सुकन्याच ती !

नंतर लौकरच तिचा च्यवन भार्गवांबरोबर विवाह झाला. आपल्या प्राणापेक्षांही प्रिय अशा कन्यकेला च्यवनभार्गवाच्या स्वाधीन करून राजा परत निघाला. दैवाच्या खेळाचें त्याला कौतुक तर वाटलेंच; परंतु त्याहूनही आपल्या सद्गुणी मुलीचें आत्मसंयमन, धैर्य या गुणाविषयीं त्याला विशेष कौतुक वाटलें. आपल्या लाडक्या कन्येचा निरोप घेतांना त्याचा कंठ शोकानें भरून आला. परंतु सुकन्या ह्मणाली:—

" बाबा, कां बरं वाईट वाटून घेतां ? बाबा, मला माझ्या स्थितीबद्दल केव्हांही वाईट वाटणार नाहीं. तुह्मी मला कांहीं न्यून आहे असें समजूं नका. जा बाबा, संतोषानें जा. "

आहाहा ! केवढा संतोष त्या पित्याला झाला असेल ! मुलीच्या गुणांचें वर्णन करीत लवाजम्यासह तो स्वनगरीं गेला. पतीच्या आश्रमांत सुकन्याही नांदूं लागली. च्यवन भार्गव अत्यंत रागावत, त्रासत; परंतु आपल्या कळकळीच्या व अमूल्य सेवेनें सुकन्येनें त्यांची मर्जी संभाळावी. त्यांना कितीही क्रोध आला तरी तिनें मौन धरून अधिकच काळजीनें त्यांच्याबरोबर वागावें. हळुहळू आपल्या उत्तम आचरणानें तिनें पतीच्या मनांत आपल्याविषयीं प्रेमभाव उत्पन्न केला. एके दिवशीं पतीचे पाय अंकावर घेऊन ती चुरीत असतां च्यवनभार्गवांकडे आश्विनीकुमार आले.

कुशल प्रश्न झाल्यानंतर अश्विनीकुमारांनीं मुनींची बरीच चौकशी केली. मुनींनीही त्यांची बरीच स्तुति करून ह्मटलें:--

" बा अश्विनी कुमारांनों, माझी एक प्रार्थना आहे. मी तुह्माला माझें काम केल्याबद्दल नुसते शाब्दिक पाल्हाळानें न आळवितां तुमचें प्रिय मी करीन. माझे अंगीं तपःसामर्थ्य आहे हें तुह्मीं जाणतच आहां. "

" होय मुने, पण तुमचें काम तरी कोणचें ? "

" देवांनो, मी वृद्ध असून माझी भार्या तरूण व रूपगुणसंपन्न अशी आहे आणि तिनें आपल्या आचरणानें माझें प्रेम सर्वस्व हिराविलें आहे. तरी बा देवानो, तिनें सुखी असावें असें मला वाटतें. अशी सद्गुणी पत्नी मला माझ्या डोळ्यांनीं कधीं पाहिनसें मला झालें आहे; तरी तुम्ही मला माझी दृष्टि व माझें तारुण्य प्राप्त करून द्यावें. त्याचा मोबदला ह्मणून यज्ञांत तुम्हांला हविर्भाग मी मिळवून देईन. "

" ठीक आहे. मुने ! आह्मी तुमचें तारुण्य व नेत्र आणून देऊं; व तुह्मी आह्माला यज्ञांत हविर्भाग द्यावात. "

त्यानंतर अश्विनीकुमारांनीं त्यांना एका सरोवरांत स्नान करावयास सांगितलें; आणि त्यांत स्नान केल्याबरोबर त्यांचें तारुण्य व नेत्र परत प्राप्त होतील, असें सांगितलें. तें ऐकून च्यवनभार्गव आर्जवयुक्त वाणीनें ह्मणाले:-

" देवहो, मी हा असा अंध व जरेनें जर्जर झालेला; तर कृपा करून तुह्मीच मला त्या सरोवरावर नेऊन सुस्नान घाला. त्याबद्दल तुमचा मी जन्मभर ऋणी राहीन. "

मुनींचें तें दीनवाणें भाषण ऐकून कुमारांनीं त्यांला सरोवरावर नेलें. सरोवरांत स्नान केल्याबरोबर च्यवनभार्गव तरुण दिसूं लागले व त्यांची दृष्टिही परत आली. कुमारांचे आभार मानून च्यवन भार्गव आश्रमाला परत आले व अश्विनीकुमारही स्वस्थानीं गेले.

नंतर त्यांनीं घडलेली हकिगत सुकन्येला सांगितली. त्या आपल्या सतेज तरुण पतीला पाहून सुकन्येला अत्यंत संतोष वाटला. च्यवनभार्गवांनीं राजकन्या सुमतीला पाहतांच त्यांना अत्यंत समाधान झालें. कारण यापूर्वीं तिचें लावण्य त्यांना स्वनेत्रांनीं पाहणें शक्यच नव्हतें. अशा रूपगुणसंपन्न पत्नीला त्रास दिल्याबद्दल त्यांना वाईट वाटलें. यापुढें त्यांनीं सुकन्येला प्रेमानें वागविलें. सुकन्या मात्र पतीचा मानसन्मान पूर्वींप्रमाणें ठेवी. अशा रीतीनें तीं पति पत्नी आनंदांत असतां च्यवन भार्गव एक दिवस ह्मणालेः—

" प्रिये सुकन्ये, तुजसह जलक्रीडा करावी अशी माझी इच्छा आहे. येतेस काय ? पहा–पहा बाहेर उन्ह किती रखरखीत पडलें आहे. अशा वेळीं त्या वृक्षांच्या घनदाट छायेनें आच्छादिलेल्या पुष्करणींत क्रीडा केल्यानें आपणाला किती सुख होईल ? उठ–लाडके उठ; तुझ्या एकनिष्ठ सेवेनें संतुष्ट होऊन मी धन्वंतरी आश्विनी कुमारांची प्रार्थना करून हें क्रीडोद्यान तुझ्यासाठीं मागून घेतलें आहे. चल सुंदरी, चल; या संपत्तीचा उपभोग घेऊं चल. "

नंतर त्यांनीं पुष्करणींत मजेनें मनसोक्त क्रीडा केली. नंतर तीं दोघेंजण आश्रमांत परत आलीं. आपलीं ओलीं वस्त्रें सोडून धूतवस्त्रें नेसत आहेत तोंच सुकन्येचा पिता राजा शर्याती तेथें आला. आश्रमाच्या आंतील भागीं सुकन्या कोणा तरुणाबरोबर हंसत बोलत आहे असें त्यानें दुरून पाहिलें. तो अतिशय संतापला. 'अहाग नीच पोरी ! अरेरे ! हें मी काय पहातों ? हे डोळे–पोरीचे असे चाळे पहाण्यापेक्षां च्यवनमुनीसारखे अंध कां झाले नाहींत ? फोड–सुकन्ये फोड, च्यवनभार्गव मुनीसारखे कांटे खुपसून माझे डोळे फोड. बये ! सासरमाहेरच्या बेचाळीस कुळ्या नरकांत लोटणारें वर्तन करितांना तुला कांहींच दिक्कत वाटली नाहीं काय ?

बोल—च्यवनभार्गवाचें काय केलेंस बोल ? ते आहेत तरी कोठें ? ते विश्वासून तुझ्या पातिव्रत्यावर विश्वासून—कोठें यज्ञयागाला गेले असावे, असें मला वाटतें. पण अहारे अदृष्टा ! त्यांच्या विश्वासाचा या कार्टीनें असा फायदा घेतला ना ? गेल्या माझ्या बेचाळीस कुळ्या नरकांत गेल्या. हाय ! मुनिवरा, कायहो, हा प्रकार मी पहातों ? बोल दुष्टे बोल माझे ज्ञाते जामात कोठें आहेत ?

सुकन्येला, आपल्या बापानें जरी इतकें दूषण दिलें तरी मागाहून त्यास तें दिल्याबद्दल वाईटच वाटेल, या विचारामुळें आनंदच झाला. तिचा तो चेहरा शोभिवंत दिसूं लागला. तिच्या मुखावर किंचित् हास्याची लकीरही मारीत होती. आपल्या बापाला मुखानें उत्तर देण्याऐवजीं तिनें तरुण च्यवनभार्गवांकडे बोट केलें, आणि ‘ हेच ते; ’ असें मूकभावानें दर्शविलें.

“ कोण ? हा माझा जांवई ? बेफाम पोरी, आतां मात्र तुझ्यापुढें उभेंही राहूं नयेसें वाटूं लागलें. अरेरे ! जन्मदात्या बापाची-माझी तूं अशी अवहेलना करावीस ? काय ग भ्रष्ट पोरी, याच्या बरोबरच मी तुझा विवाह केला होता काय ? कां मला तूं अंध समजतेस ? झाली—अपमानाची परमावधी झाली ! केवढें हें धाडस ! धडधडीत परक्या पुरुषाला मजसमक्ष पती ह्मणण्यास तुला दिक्कत नाहीं वाटली अं ! ”

सुकन्येनें आपल्या पतीकडे दयार्द्रदृष्टीनें पाहिलें. राजा तें पाहून थरथर कांपत आहे तोंच मुनी ह्मणाले:—

“ शर्याते, ओळख-माझा आवाज ओळख. वा ! अविचारानें तूं आपल्या कन्येला फारच कटु बोललास. मी धन्वंतरी आश्विनीकुमार यांच्या पासून हें तारुण्य व नेत्र मिळविले आहेत.

इतक्यांत सुकन्या राजाच्या पायां पडून ह्मणाली:—

" बाबा, अशी कुशंका आपल्या मनांत कां बरें आली ? बाबा, आतां तुमची आणखी खात्री काय करूं ? या, अश्विनीकुमार, या; आपल्या धर्मकन्येच्या करितां धांवून या ! बाबा, मी मनानें ही भ्रष्ट नाहीं. असें असून आपण मजवर केवढा गहजब केलात ? देवांनों, या माझ्या प्रियपती व्यातिरिक्त इतर पुरुषांचें दर्शन घेतलें नसेल, जर मी यांच्या ठिकाणीं एकभाव ठेवून पातिव्रत्यानें वागलें असेन तरच यावेळीं माझ्या पतींना नेत्र व तारुण्य देणारे देव या ठिकाणीं येवोत !

शुद्धाचरणाचें फल मिळालें. अश्विनीकुमार आश्रमांत येऊन दाखल झाले. त्यांनीं राजाला सर्व हकीगत निवेदन केली. ती ऐकून राजाला कन्येला विनाकारण दोष दिल्याबद्दल फार वाईट वाटलें. तो ह्मणालाः—

" देवहो, तुम्हांला यज्ञांत हविर्भाग मिळवून देण्याचें–सोमपान करविण्याचें–वचन दिल्यामुळेंच तुम्ही माझ्या या ज्ञानसंपन्न जांवयाला तारुण्य प्राप्त करून दिलेत ना ? मला तें माहित नसल्यानें मी तिला दोष दिला. आणि त्यामुळेंच तुम्हाला आतां येथें येणें भाग पडलें. तरी त्याचें प्रायश्चित्त म्हणून मी यज्ञ करितों व तुम्हाला सोमपान करवितों तेणेंकरून तुम्ही व ही माझी सुकन्या, मी तिच्या पतीचें वचन पूर्ण करण्यास मदत करणार म्हणून, संतोषित व्हावें. बोल, बाळे बोल–मी तुझें काय प्रिय करूं ? "

" बाबा, आपण माझ्या पतीचें वचनच पूर्ण करा. यानें जो आनंद मला होईल तो दुसरा कशानेंही होणार नाहीं, "

लौकरच हें वर्तमान सर्वतोमुखीं झालें. च्यवनांच्यां आज्ञेबाहेर कोणींही न जातां त्यांच्या सासऱ्याच्या यज्ञाला सर्व मंडळी आली. यज्ञ समारंभ मोठ्या थाटांत झाला. व तो निर्विघ्नपणें पार पडला. शेवटीं

समारोप करतेवेळीं च्यवन भार्गवांचें अभीष्ट चिंतून अश्विनीकुमार म्हणाले:—

" सोमपानाची प्राप्ति आम्हांला केवळ सुकन्येमुळेंच झाली. कारण तिच्या सेवेनें, पातिव्रत्याच्या प्रभावानेंच च्यवन संतुष्ट झाले व हा सर्व योग जमून आला. धन्य तो शर्याती राजा कीं ज्याच्या पोटीं असलें कन्यारत्न जन्मलें ! धन्य तें वन कीं, ज्यामध्यें असल्या पतिव्रतेचें वास्तव्य झालें ! राजा शर्याते, आम्ही आज तुझ्या सद्गुणी कन्येच्या प्रभावानेंच धन्य झालों तेव्हां तुझ्या राज्याची सदैव भरभराट होवो आणि तुझी प्रजा अशीच एकनिष्ठ, राजनिष्ठ आणि धर्मपरायण राहो, असा आमचा तुला वर आहे. त्याप्रमाणेंच हे मुनिवर्या, हे सुकन्ये, तुम्ही उभ-यतां सुखानें नांदा " असें म्हणून अश्विनीकुमार जावयास निघाले. इतर लोकही निघाले. राजानें सर्वांची यथायोग्य पाठवणी केली, व नंतर तो आपल्या राजधानीला परत गेला.

पुढें दीर्घकालपर्यंत सुकन्या पतीसमवेत राहून सुंदर, सद्गुणी पुत्र प्रसवली !

खरोखर, धन्य आहे त्या सुकन्येची ! धन्य ती आर्यजननी कीं जिच्या पोटीं असली रत्नें निर्माण झालीं ! धन्य ती आर्यसंस्कृती कीं जिच्या अंगीं असलीं रत्नें निर्माण करण्याची योग्यता आहे ! आणि म्हणूनच सर्वकालीं आर्यस्त्रिया पातिव्रत्याच्या बाबतींत जगांतील इतर स्त्रियांपेक्षां श्रेष्ठच ठरणार ! परकीयांपासून आम्हांला पातिव्रत्त्याचे धडे शिकण्याची जरूरी नाहीं. तें आमच्या रोमरोमीं भिनलेलें आहे. असें असलें तरी पवित्राचरणाचे आदर्श सदैव डोळ्यांपुढें असलेले कांहीं वाईट नाहींत.

# मंदोदरी.

मंदोदरी ही महासाध्वी लंकेचा राजा रावण याची पत्नी खरी; परंतु हिचें चरित्र पतीच्या चरित्राच्या अगदीं उलट आहे.

अयोध्या नगरीचा महापराक्रमी राजा दशरथ याचा पुत्र भगवान् श्रीरामचंद्र याच्याशीं रावणाचें अत्यंत हाड वैर किंबहुना रावण श्रीशंकराच्या वरानें उन्मत्त झाला म्हणूनच श्रीरामचंद्रांना अवतार घ्यावा लागला असें ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. यांचें वैर असण्याचें कारण, जनक राजाची मुलगी सीता हिच्या स्वयंवराचे वेळीं भर दरबारांत रावणाची फजीती होऊन श्रीरामचंद्रांनीं पण जिंकून जानकीला पटकाविलें, हें होय. नंतर केवळ कलीच्याच प्रभावानें श्रीरामचंद्र वनांत आले व तेथें राहूं लागल्याचें वर्तमान राक्षसाकडून रावणाला कळलें.

जें प्रचंड धनुष्य रावणाला नुसतें उचलून धरवलें नाहीं—मग त्याला दोरी चढविण्याचें लांबच राहिलें—तें महाप्रचंड श्रीशंकराचें धनुष्य रामासारख्या एका तरुण मुलानें सहज लीलेनें उचललें इतकेंच काय पण त्याला बाण लावण्याकरितां वांकवल्या बरोबर तें मोडलें सुद्धां ! हें ऐकून मंदोदरीला वाटलें, कीं असला महाप्रतापी पुरुष मानवांत सांपडणें दुर्मिळ. वीस भुजांनीं आपल्या पतीला जें धनुष्य उचलणें मुष्कील झालें तें दोन हातांनीं उचलणारा देवावांचून दुसरा कोण असणार ?

तिची रामावर भक्ति जडली. त्या श्यामसुंदराशीं आपल्या पतीनें वैर न करितां सख्य करावें असें तिला फार वाटे. जों जों रावणाच्या मनांत द्वेषानें ठाणें दिलें तों तों मंदोदरीच्या मनांत रामाविषयीं अधिकाधिक भक्ति उत्पन्न होऊं लागली. तिचें त्याच्या ठिकाणीं भक्तियुक्त प्रेम जडलें. तिनें संधि साधून पतीला ह्मटलें:—

" कांत, आपण त्या रामाशीं सख्य करावें. महाराज, मी ऐकलें आहे, कीं जानकी मिळविण्याच्या पूर्वीं त्यानें विश्वामित्राच्या यज्ञांत उपद्रव देणारे महा बलाढ्य राक्षस ठार मारले आहेत ! आपलें सामर्थ्य काय सांगावें ? पण आपणाला जें धनुष्य उभेंही करवेना तेंच त्यानें आकर्ण ओढलें ना ? अनेक क्षत्रियांना खालीं माना घालावयास लावलें ना ? आणि जानकीला पटकाविलें ना ? महाराज, तो मनुष्य असेल काय ? मला तर वाटतें, कीं तो साक्षात् आदिपुरुषच असावा. तरी प्राणनाथांनीं त्याच्याशीं सख्य करावें. त्याची भक्ति करावी आणि आपल्या देहाचें सार्थक करावें.

मंदोदरीचे हे शब्द अमृताप्रमाणें हितकर नव्हते असें कोण ह्मणेल ? परंतु ज्यांना मद्य प्राशनाची दुष्ट संवय जडलेली आहे त्यांना हें अमृत रुचावें कसें ? आणि पचावें तरी कसें ? पत्नीचें भाषण ऐकून रावणानें गरगरा डोळे फिरविले व नाक फेंदारून तो रागानें ओरडलाः—

" मंदोदरी, तुला लाज नाहीं वाटत ? या रावणापुढें—ज्यानें श्रीशंकरांचा कैलास गदगदां हालविला—त्या बलाढ्य रावणापुढें—ते कालचें पोर तो मानवाचा पोरगा राम याचें वर्णन करतेस ! ! या बाहूंचें सामर्थ्य, मंदोदरी, तुला माहित नाहीं काय ? म्हणे त्यानें धनुष्य मोडलें. त्यांत मोठेंसें काय केलें ? तो वेळेचा गुण आहे. आणि शिवाय तें धनुष्य किती जुने पुराणें ! आणि हें जुनेंपुराणें धनुष्य मोडलें ह्मणून तो काय देव झाला ? आणि मी ह्मणतों कदाचित् असलाच देव तरी काय बिघडलें ? हे बाकीचे देव जसे माझ्या बंदींत आहेत तसा तो ही एक पडेल त्यांत. देव देव, कशाचा देव ! तेव्हां सांगून ठेवतों, या बाबतींत तूं कांहीं बोलूं नयेस. मला तें बिलकूल खपणार नाहीं. मंदोदरी, तूं माझी पट्टराणी म्हणून यावेळीं मी क्षमा केली. इतर जर कोणी असें बोलती तर शिक्षाच केली असती. "

रावणाचें हें भाषण ऐकून साध्वी मंदोदरीचें मन खट्टू झालें. राक्षस-समुदायांत ती भांगेंतील तुळसीप्रमाणें होती. तुळसीच्या वनांत जर तुळस असेल तर तिला कोणी परम भक्त विष्णुशिरीं तरी वाहील, परंतु तीच तुळस भांगेंत असली तर तिची अवस्था काय होईल ? ती कोणाच्या तरी पायाखालीं तुडविलीच जाणार ! आणि म्हणूनच रामाची सीता, पांडवांची द्रौपदी, नलाची दमयंती आणि हरिश्चंद्राची तारा यांच्यापेक्षां अनीतिमान् रावणाच्या संगतींत वागणाऱ्या सद्गुणी मंदोदरीचें एकापरी अधिक कौतुक कोणा गुणीजनास वाटणार नाहीं ?

रावण दुर्दैवी खराच. नाहींतर अशा या महासाध्वी सद्गुणी भार्येच्या उपदेशाची अवहेलना करून सर्वस्वाचा नाश करून घेण्याची दुर्बुद्धि त्याला होतीचना ! मात्र मंदोदरीची शाबास खरी. स्त्रीला पति हा पूज्य असलाच पाहिजे. त्याप्रमाणें रावण जरी दुष्ट होता तरी ती त्याला पूज्य मानून त्याची सेवा करीत असे, आणि प्रसंगीं हिताचा उपदेशही करी. परंतु, पत्नी पतीपेक्षां किती का शहाणी असेना तिचा उपदेश सामान्यतः पतीला रुचतच नाहीं. तशीच स्थिति रावणाची झाली. त्याला मंदोदरीचा उपदेश रुचला नाहीं. त्यानें रामाला त्रास देण्याची सुरवात केली. तो राक्षसांना रामाकडे पाठवी, परंतु रामानें त्यांना लंकेंत परत जाण्याचे श्रम दिले नाहींत; त्यांची रवानगी परलोकीं झाली. असें नेहमीं होत गेल्यानें रावणानें आपला मित्र मारीच याला आपल्या गुप्त कटांत घेऊन कपटानें सीतेला पळवून तर आणिली.

असा नियमच आहे कीं, सद्वर्तनी चतुर पत्नीला दुर्वर्तनी पती थोडा तरी वचकतोच. त्याचप्रमाणें रावणानें सीतेला राजवाड्यांत न ठेवितां अशोकवनांत राक्षसींच्या पहाऱ्यांत ठेविलें. ही गोष्ट मंदोदरीला समजतांच तिला अत्यंत दुःख झालें. रावणाला ती म्हणालीः—"पतिदेवा,

हें आपण काय बरें आरंभिलें आहे ? महाराज, मला तर वाटतें हीं सीता नव्हे तर राजलक्ष्मी खाक करणारी ही आगच आपण आणून ठेवली आहे ! महाराज, आपलें माझ्यावर थोडे—अगदीं थोडें—जरी प्रेम असलें तरी आपण त्या महापराक्रमी रामचंद्रास तिचा योग्य सत्कार करून परत द्यावी. त्याला अनन्यभावानें शरण जावें. माझ्या पूज्य देवा, आजपर्यंत परस्त्रीच्या अभिलाषानें कोणाचें तरी कल्याण झालें आहे काय ? नाथ, आपणाला माहित आहेना कीं, इंद्रानें अहल्येच्या पातिव्रत्याचें कपटानें हरण केलें तर गौतमाच्या शापानें त्याच्या अंगाला भगें पडलीं ! अहाहा ! काय त्या श्रीरामप्रभूचे गुंण वर्णन करावे ? त्यानें त्या दगड होऊन पडलेल्या अहल्येचा नुसत्या पायाच्या धुळीनें उद्धार केला ! ” मंदोदरीचें अंतःकरण यावेळीं भरून आलें. तिला आपण कोठें आहों याचेंही भान राहिलें नाहीं. तिच्या त्या पाणीदार काळ्याभोर नेत्रांतून तुटलेल्या मोत्याच्या सराप्रमाणें टपटप् भक्तियुक्त प्रेमाश्रू गळूं लागले. ती अर्धवट डोळे मिटून पुन्हा हळूहळू पुटपुटूं लागलीः—“ रामदेवा, नाहीं—नाहींच का हो आपलें तें श्यामसुंदर रूप मला दिसावयाचें ? अहल्योद्धारका, कसें दिसणार ? कारण आह्मां बायकांच्या सर्व इच्छा पतीच्या हातांत असतात. माझे पती, देवा, मला तुझें दर्शन करवतील का ? अगबाई ! छे ! पण हें काय, माझ्या पतींनीं तुझा—देवाधिदेवा तुझा केवढारे अपराध केला आहे ! अगबाई ! मी ऐकलेल्या गोष्टीवरून भक्तीनें जी राममूर्ति मी या अंतःकरणांत साठवून ठेविली आहे ती अशी रागानें कां बरें बघते ? रामा नकोरे असा रागानें पाहूं ! देवा ! देवा, कर—माझ्या अपराधी पतीला क्षमा कर. अहाहा ! असा दिवस मला पहावयाला सांपडेल का सीतेला बहुत मूल्य देणगी देऊन रामाला ती परत देण्यास निघालेली नाथांची मूर्ति मी पाहीन का ? करा नाथा ! असें कराच. मी किनई त्या

आपल्या मूर्तीला कोण्या पाप्याची दृष्ट लागूं नये ह्मणून हे प्राणसुद्धां ओवाळून टाकीन. यापेक्षां देहाचें उत्तम सार्थक तरी दुसरें कशानें होणार आहे ! ऐका—ऐकाच येवढें माझें. " असें ह्मणून मंदोदरी जमीनीवर जसे एखाद्याचे पाय धरितात तसें करूं लागली.

वास्तविक तिची रामाबद्दलची एवढी भक्ति, पतीच्या हिताविषयीं एवढी कळकळ पाहून दुसरा एखादा पती कांहीं तरी सुधारता. परंतु रजोगुणी रावण तिच्या त्या कृतीनें अतिशय चिडला मात्र. दहापैकीं पांच तोडांनीं तो खदखदां हांसून ह्मणालाः—

" मंदोदरी, तूं इतकी खुळी असशील असें मला वाटलें नव्हतें ! तुला ठाऊक नाहीं काय कीं देवसुद्धां मला थरथर कांपतात ! ते माझ्या बंदीशाळेंत आज गुलाम होऊन पडले आहेत. मग त्या मानवाच्या पोराची काय कथा ? मंदोदरी,स्वाभिमानाला झुगारू नकोस तुझी माझ्या ठीकाणीं जशी भक्ति, प्रेम आणि पूज्यता वसत आहे तसाच तूं माझ्या पराक्रमाबद्दलचा स्वाभिमान व विश्वास आपल्या अंतःकरणांत ठेव. राम देव आहे ही कल्पना सोडून दे. मंदोदरी, माझ्या लाडक्या पत्नीनें मजसमक्ष माझ्या शत्रूचे गुणानुवाद गावेत आणि मीं—देवमानवादिकांनाही अजिंक्य अशा रावणानें हें तुझें बरळणें ऐकून घ्यावें काय ? पण मंदोदरी ! तुझ्या वरील माझ्या अत्यंत प्रेमामुळें मला कसें मूढ बनविलें आहे पहा. मंदोदरी तुलाच ह्मणून मी आज असें सामोपचारानें सांगतों कीं, पुनः ह्या रामाचें नांव देखील तूं काढूं नकोस. "

असें म्हणून कांहींशा रागानेंच रावणाची स्वारी निघून गेली. बिचारी मंदोदरी अश्रू ढाळीत बसली. आपल्या पतीनें जर जानकीला सन्मानानें परत न पाठविली तर त्याचा काय परिणाम होईल हें ती जाणून होती परंतु हें सर्व माहित असूनही तें आपणाला टाळतां येत नाहीं, पतीचें मन

आपल्याकडून वळलें जात नाहीं ह्मणून तिला अत्यंत वाईट वाटलें. किंचित् काल तिनें असा विचारांत घालविला व तिनें निश्चय केला कीं, बस्स, कांहींही होवो. आपल्या हातून वरील गोष्टी होत नाहींत तर हरकत नाहीं पण सीतेचें सांत्वन करणें, तिला चार ममतेच्या गोष्टी सांगणें हें तरी आपल्या हातचें आहे कीं नाहीं? तेव्हां तीच गोष्ट आपण करूंया. बिचाऱ्या एकट्या सीतेला त्या अशोकवनांत राक्षसणींच्या पाहाऱ्यांत किती त्रास होत असेल? तिच्या मनाला किती दुःख होत असेल? तिच्या सारख्या राजवैभवांत वाढलेल्या राजकुमारीला त्या दुष्ट राक्षसीणींचा सहवास किती तापदायक होत असेल? अशा स्थितीमध्यें तिला चार धीराच्या गोष्टी सांगून तिचा पतिविरह हलका करण्यास कोण बरें आहे? मंदोदरीची सदसद्विवेक बुद्धि तिला डवचूं लागली. उठ–मंदोदरी उठ. त्या आपल्या दुःखी भगिनीच्या सांत्वनाला जा. तिची खाण्यापिण्याची चौकशी कर." त्याप्रमाणें मंदोदरी धैर्यानें उठली. जानकीच्या भेटीस जाण्याकरितां तिनें आपल्या बहुमूल्य शालूचा पदर कसला. अशोक वनांत गेल्यानंतर खालीं मान घालून बसलेली सीता तिला दिसली. रावणावांचून तेथें कोणीही आल्यास त्यास सीतेची भेट घेऊं देऊं नये असा जरी रावणाचा सक्त हुकूम होता तरी प्रत्यक्ष मंदोदरीस त्या रक्षक राक्षसीणींना अटकाव करितां येईना. कारण तिच्या अंगीं असे कांहीं गुण होते कीं, तिची छाप दुसऱ्यावर तेव्हांच पडावी. तिच्या पवित्र वर्तनाचें तेज चेहऱ्यावर विलसत असल्यानें, तें पहातांच कोणीही झाला तरी तो मवाळच पडे. मंदोदरी थेट सीतेजवळ गेली. क्षणभर तिच्याकडे पाहून ती ह्मणाली:—

"जानकी, तुझें शरीर इतकें सुकलें अं! बाईग, धीर धर; जरा विचार कर. आ––"

सीतेला वाटलें आपलें मन वळविण्याकरितां रावणानें या बाईला पाठविलें असावें; ह्मणून तिचें भाषण पुरेंही होऊं न देतां ती ह्मणाली:—

" बाई, कां मला त्रास देतां ? या देहांत प्राण आहे तोंवर मी आपल्या पातिव्रत्याचें रक्षण करीन. माझ्या पराक्रमी पतिराज रामांना जर कोणी सुदैवानें मी येथें असल्याचें सांगेल तर ते माझे पूज्य पति या तुमच्या रावणाचीं पाळेंमुळें खणून काढून मला मुक्त करतील. नाथ ! काय हो माझी ही स्थिति ! पण, मी तुह्मांला त्याच्याबद्दल कां बोल लावावा ! छे, छे–मीच पापिणीनें तुह्मांला त्या मायावी हरिणाचे मागें पाठवून दिल्यानें रावणाला माझें हरण करितां येऊन मला आज ही स्थिति आली आहे. अरेरे ! हा दुष्ट रावण जर माझ्या पातिव्रत्याचें हरण करूं पाहील तर आत्महत्त्येखेरीज मला दुसरा मार्गच नाहींना ? जा, बाई जा–त्या रावणाला ह्मणावें सतीचा छळ करण्यांत मोठासा पुरुषार्थ नाहीं. तूं जर खरा पराक्रमी असतास तर माझ्या नाथांच्या परोक्ष मला कां घेऊन येतास ? जा–यापेक्षां मला अधिक कांहीं बोलावयाचें नाहीं तरी तूं कटु बोलून मला अधिक दुखवूं सकोस ! "

" सीते, मी तुझा छळ करावा ह्मणून आलें नसून तुझा समाचार घ्यावा, तुला चार धीराचे शब्द सांगावे ह्मणून मी आलें आहें. मी तुझें हरण करणाऱ्या लंकाधीशाच्या आज्ञेवरून येथें आलें नाहीं. " हे सहानुभूतीचे शब्द ऐकतांच सीतेनें वर मान केली. दोघी साध्वींची भेट झाली.

" सीते ! मी लंकाधीशांची पत्नी बरं ! पतीला सन्मार्गावर आणण्याची मी खटपट करीन. निदान तुझ्या पातिव्रत्यावर मी जिवंत आहें तोंपर्यंत गदा येऊं देणार नाहीं. सीते, ही माझी आवडती त्रिजटा तुला पदोपदीं साहाय्य करील. तुला कांहीं कमी अधिक सांगणें झाल्यास हिच्या हातीं सांग. "

सीतेला याप्रमाणें आश्वासन देऊन मंदोदरी परत फिरली.

यानंतर एक दोन दिवसांनीं रावण नटून सजून महालाबाहेर पडतांना

तिनें पाहिला. ‘ हा अशोकवनांत तर नाहींना आत ’ असें तिला वाटलें. चौकशीअंतीं तिचा तर्क खरा झाला. परंतु ती रडत न बसतां रावणाच्या मागोमाग निघाली. रावण अत्यंत तांतडीनें तेथें पोहोंचला. तो आल्याची वर्दी येतांच सीतेनें आपलें मुख आच्छादून ती एका झाडाखालीं गुडघ्यांत मान घालून बसली. रावणानें दुरून बरेंच पाल्हाळीक भाषण केलें. बरीच धमकीही घातली; परंतु सीतेनें नुसती मान वरसुद्धां केली नाहीं, मग शब्द तर कोठला ! या मुळें पापी रावण खवळून तिच्याजवळ जाऊन तिच्या तोंडावरचा पदर काढणार इतक्यांत मंदोदरी तेथें आली. ती रावण व सीता यांच्यामध्यें उभी राहून पतीला ह्मणाली:—

“ हे लंकानाथ, असं काय बरं करतां ? नाथ, विचार करा—उद्यां मलाच जर अशा रितीनें कोणी छळूं लागला तर आपणांस काय बरं वाटेल ? महाराज, आपण सीतेला गोडीनें परत दिली नाहीं तरी हरकत नाहीं; परंतु तिच्या प्राणापेक्षां प्रिय अशा पातिव्रत्यासंबंधीं अविचारानें वागूं नका. पतिदेवा, आह्मां स्त्रियांना पातिव्रत्यापुढें प्राणाचीही परवा नसते. जर हिला आपण विनाकारण त्रास द्याल तर लवकरच आपणाला सीतेचें प्रेत दिसेल. तिच्या प्रिय भ्रताराला ती कायमची अंतरेल. नाथ, तिचा नाद आपण सोडाच. ”

‘ आपल्या आड आलेली मंदोदरी ! ’ तिला पाहतांच रावण क्रोधानें संतप्त झाला होता. त्यांत तिचें तें लांबलचक भाषण ऐकून तर तो फारच खवळला. त्यानें मंदोदरीला बरेंच वेडेंवांकडें बोलून अशोकवनांतून पाय काढला. सीतेच्या देखत झालेला अपमान त्याला शल्याप्रमाणें बोंचून राहिला. सीतेला चार शब्द सांगून मंदोदरीही आपल्या महालांत आली. आलेलें संकट टळल्याबद्दल संतोष मानून सीता स्वस्थ बसली. मंदोदरीच्या तोंडून ही सर्व हकीगत रावणाचा भाऊ बिभीषण याला समजली.

त्यानेंही रावणाला मंदोदरीप्रमाणें पुष्कळ हितोपदेश केला. परंतु, “ युक्तचि मरणाराला, हितपरिणामहि न सोसवे काढा ” या मयूरोक्ती प्रमाणें रावणाला तो उपदेश कटु लागला. आपला उपदेश रावणाला रुचत नाहीं, असें पाहून बिभीषण रामाकडे जाऊन मिळाला. झालें. रामांना यामुळें लंकेचा विध्वंस करणें सोपें झालें. त्यांनीं सुग्रीवादि वानर व बिभीषण यांचेसह लंकेवर स्वारी करून कुंभकर्ण व रावण यांना मारिलें. रावण पडतांच सैन्यांत मोठा हाहा:कार उडाला. तें वर्तमान एका दूतानें मंदोदरीला येऊन कळविलें. ती रडत व शोक करीत तेथें आली. समरांगणावर रक्तमांसाच्या चिखलांत निर्भयपणें ती आपल्या पतीचें शव धुंडूं लागली. परंतु तें तिला सांपडेना. वानरांनीं रावणाचें शव घेऊन त्याची विटंबना चालविली होती. इतक्यांत अश्रू गाळीत चाललेले राम पाहतांच ते स्वस्थ उभे राहिले. रामांनीं त्यांजकडे पाहून म्हटलें:—

“वानरहो, नका त्या रावणाच्या प्रेताची विटंबना करूं! बाबानों, शत्रू जिवंत आहे तोंपर्यंतच त्याच्याशीं शत्रुत्व. त्याचा अंत झाल्यावर मग शत्रुत्व कोणाशीं राहिलें ? ”

“रावण मारला गेला असतां राम उदास कां ?” असें वानरांना वाटलें. पण त्यांना विचारणार कोण ?

“चला, मजबरोबर चला. घ्या तें रावणाचें शव बरोबर.” असें म्हणून राम चालूं लागले. वानरही रामाज्ञेप्रमाणें निघाले. रामचंद्र महासाध्वी मंदोदरीकडे गेले. एखाद्या अपराधी सुनेप्रमाणें ते खालीं मान घालून उभे राहिले, पतिशोकानें विव्हल झालेल्या मंदोदरीनें त्यांना म्हटलें:—

“ कोणरे तूं ? ”

“मी आपलें बालक आहें आईसाहेब. या देहाला दाशरथी म्हणतात.” भीत भीत राम म्हणाले.

" लंकाधीशाचा शत्रू राम तोच ना तूं ? "

" होय. "

रामाच्या पाठोपाठ आलेले सुग्रीव, बिभीषण व लक्ष्मण हे रामाचा तो नम्रपणा पाहून आश्चर्यांत गढून गेले. इतक्यांत मंदोदरी ह्मणालीः—

" ठीक आहे. मला माझ्या पतीचें शव सांपडत नाहीं तें शोधून देविव पाहूं. शाबास ! रामा शाबास ! धोरणी आहेस. "

रामांनीं शव देण्यास वानरांना खुणाविलें. रावणाच्या देहाला कवटाळून मंदोदरीनें शोक केला. तो शोक ऐकून श्रीरामचंद्राच्याही डोळ्यांत अश्रू आले. कां बरे असें व्हावें ? जगाचा नायक श्रीरामचंद्र मंदोदरीपुढें गाय कां बरें झाले ! हा कशाचा प्रभाव ? पातिव्रत्याचा ! साध्वी स्त्रीचारित्र्याचा ! ! अहाहा ! बाई मंदोदरी ! धन्यच तूं कीं, साक्षात् देवाधिदेव श्रीरामचंद्र यांना तूं गाय करून टाकलेंस !

" भावजी, काय बरें पाहतां ? व्हा, पुढें व्हा, आणि माझ्या सतीच्या वाणाची तयारी करा. भावजी, गेले माझें नाथ मला सोडून गेले. मी आतां त्यांच्या भेटीला जाणार. भावजी, पण आधीं अशोक वनांतून त्या सीतेला आणवा बरं ! तिच्यावांचून माझी ओटी भरण्यास कोण योग्य आहे ? रामा, आपण कां उभे राहिलांस ? हं समजलें. मी दुःखभरांत कांहीं वेडेंवांकडें बोलेन असें तुला वाटलें काय ? नाहीं, रामा नाहीं. तुझ्या चातुर्यानें मी संतुष्ट झालें आहें. तूं खुशाल आपल्या प्रियपत्नीसह राज्य कर. "

" वहिनी, आपण सती जाऊं नका. लंकेचें राज्य आपल्या अनुमतीनें चालवितों. "

" भावजी, वेडे आहांत. विचारा, या देवाधिदेवाला विचारा कीं,

स्त्रीचा अर्धा देह स्वर्गीं गेल्यावर ती येथें कशी राहूं शकेल ? रामा, मीं जर तुझी अनन्यभावें भक्ति केली असेल तर माझी शेवटची इच्छा आहे कीं, तूं माझ्या सहगमनसमयीं माझ्या सन्मुख असावेंस. मला तुझें हें मन मोहक गोड रूप दिसावें.

" आपली इच्छा कोण मान्य करणार नाहीं ? "

लौकरच चंदनाची चिता धडाडूं लागली. महासाध्वी मंदोदरीचा सुंदर देह त्या चितेंत भस्म झाला.

वानरांसह राम शिबिरांत परत आल्यावर ह्मणालेः—

" बिभीषणा, धन्य तुझा भाऊ कीं, त्याला असलें स्त्रीरत्न लाभलें ! मला अत्यंत धाक होता तो या देवतेचाच ! किंबहुना मला रावणवधापेक्षां मंदोदरीच्या आशीर्वादाचीच काळजी होती. बाबांनों, सर्व काळ सर्वांनीं असल्या स्त्रीरत्नांना भ्यालें पाहिजे. ऋषिजनांच्या तपांत, देवांच्या देवपणांत जें सामर्थ्य नाहीं तें यांच्या रोमरोमीं भरलेलें असतें. "

यानंतर रामसीतेची गांठ पडली तेव्हांही तिनें मंदोदरीची अत्यंत स्तुति केली. कां नाहीं करणार ?

मंदोदरीप्रमाणें जर प्रत्येक भगिनी आपल्या पतिपुत्रबंधूंना नेहमीं सदुपदेश करील तर संदेशच्या वत्सलाबाहिनींनीं ह्मटल्याप्रमाणें रेल्वेंतून काय अगर एरवीं काय बाहेर मोकळ्या हवेवर हिंडण्या फिरण्यास बरें नाहीं कां पडणार ? आमचे बंधू कितीही शिकले तरी त्यांना परक्या बायकांकडे वांकड्या नजरेनें न पाहण्याचे धडे घरींच गिरविण्यास प्रत्येक स्त्रीनें शिकविलें पाहिजे. नीतिशिक्षणासंबंधीं कान टोंचावयास मास्तर प्रोफेसरांपेक्षां माता, भगिनी, पत्नीच जास्त योग्य !

# साध्वी गांधारी.

" ताई, ताई, बाबांच्या दरबारांत आत्तां कोणी वकील आला होता तो बहुधा तुला मागणी घालण्याकरितांच आला असावा " गांधार देशाच्या सुबल राजाचा मुलगा शकुनी आपल्या भगिनीला ह्मणाला.

" बरं बरं, मी कधीं तुला विचारलें आहे ? " रागाचा आविर्भाव आणून त्याची ताई त्याला ह्मणाली.

तीं दोघें आणखी कांहीं बोलणार तोंच ' महाराज आले ' अशी वर्दी घेऊन एक नोकर आला. बहिणभावंडें खेळण्यास दुसरीकडे गेलीं.

राजा सुबल येऊन तो एका सुशोभित मंचकावर बसला. त्याचा चेहरा कांहींसा चिंताक्रांत असून तो विचारांत गढून गेला होता. आणि याचमुळें पत्नी केव्हां आली हें त्याला समजलें नाहीं.

" अग बाई ! असं कां बरं तोंड उतरल्यासारखं दिसतं आहे ? काय होत आहे आपल्याला ? " राजाच्या खांद्यावर आपला अलंकारयुक्त हात ठेऊन ती ह्मणाली तरीही राजा सुबल आपल्या विचारांत गर्कच ! एक नाहीं दोन नाहीं.

" असं काय बरं ? मला नाहींका सांगायचं काय झालं तें ! "

" कोण तुह्मीं का ? केव्हां आलां ? बरं चला वेळेवरच आल्यात ह्मणायच्या. "

" मी केव्हांची आलें आहें. पण आज असं दुःखी असायला काय झालं ? "

"तेंच तर सांगतोंना ? हस्तिनापूरचा महापराक्रमी भीष्म तुला आहेच माहीत ? त्याच्या कडून आज वकील आला आहे. त्यानें आपल्या

कन्येला त्याचा वडील पुतण्या धृतराष्ट्र याचेकरितां मागणी घातली आहे, परंतु तो मुलगा जन्मांध आहे तेव्हां मुलगी द्यावी तरी पंचाईत, न द्यावी तरी पंचाईत. द्यावी तर मुलगा जन्मांध! बरं न द्यावी तर भीष्मासारख्या मोठ्या व पराक्रमी राजाशीं वैर करावें लागणार! त्याला नाराज करणें ह्मणजे आगींत उडी टाकणें आहे. मला तर कांहीं सुचत नाहीं. पिता या नात्यानें मजवर जी जबाबदारी आहे ती संभाळून या संकटांतून सुटण्याची मला तर बोवा कांहीं तोड दिसत नाहीं!"

राणीही मुकाट्यानें खालीं पहात राहिली. परंतु शकुनीनें वकील मागणी घालण्यास आल्याचें सांगितल्याचा व लागलीच आपला पिता येण्याचा कांहीं तरी खास संबंध आहे. तो काय आहे हें समजावून घेण्याची उत्कंठा राजकन्येस लागल्यानें तिनें खेळतां खेळतां शकुनीस झुकांडी देवून आईबापांचें बोलणें ऐकलें. अखेर बऱ्याच वाटाघाटीनंतर भीष्माच्या मागणीप्रमाणें राजकन्येला तेथें देण्याचें ठरलें. लौकरच लग्नाची धामधूम सुरू होऊन अंध धृतराष्ट्राला राजकन्या द्यावयाची, ही गोष्ट सर्वतोमुखीं झाली.

राजकन्या धर्मशील मातेच्या तालमींत तयार झाली होती. स्त्रियांचा मुख्य धर्म पातिव्रत्य ही गोष्ट लहानपणापासून तिनें मुलीच्या मनावर पक्की बिंबविली होती. तसेंच, पूर्वीं होऊन गेलेल्या साध्वी सीता, मंदोदरी वगैरेंचीं चरित्रें तिनें तिला नेहमीं ऐकविलीं होतीं. मुलीच्या निष्पाप अशा कोमल मनावर त्या गोष्टी कायमच्या ठसल्या होत्या.

एक दिवस तिनें एक लांब कपडा घेऊन त्याची घडी केली व त्यानें आपले दोन्ही डोळे घट्ट बांधिले.

" कां ताईसाहेब, मुलींना बोलावूं वाटतें? आतां काय तुह्मी लग्न होऊन सासरीं जाणार ह्मणून आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ खेळण्याचें मनांत आहे वाटतं?"

राजकन्येची सखी तिला ह्मणाली.

"आतां आंधळी कोशिंबीर जन्माचीच आहे बरं." राजकन्या ह्मणाली.

यावर एक घटका झाली, दोन झाल्या, मुलगी डोळे सोडीना. राणी-साहेबांच्या कानापर्यंत ती गोष्ट गेली. काय प्रकार आहे तें पाहण्या-करितां त्या आल्या.

"बाळ, डोळे कां बरं बांधलेस?" मुलीला कुरवाळीत आई ह्मणाली,

"आई, तुझ्या शिकवणीचेंच गोड फळ आहे हें! आई, माझे पती अंध आहेत ना? आई, त्यांना जर देवानं या जगांतील सुंदर पदार्थ पाहा-ण्यास डोळे दिले नाहींत तर मी तरी तें कां पाहावेत? खेरीज, आई, मी पतींना अन्ध पाहिलेच नाहींत तर त्यांविषयीं माझ्या मनांत वाईट भाव उत्पन्नच होणार नाहीं. आई, तूंच ना मला रामपत्नी जानकीची गोष्ट सांगितलीस कीं, तिनें फक्त एकदांच पतीला अर्पण केल्यावांचून सुंदर फुलांचा सुवास घेतला, तरीसुद्धां त्याचें फळ तिला भोगावें लागलें. मग मी तर नेहमींच पतींना न दिसणाऱ्या वस्तु पाहणार, नाहीं आई? झाला माझा निश्चय, मी कधींही यांत बदल करणार नाहीं."

"बाळे, मग तो संबंधच मोडूं पाहिजे तर. मोठा भीष्म, झाला म्हणून काय करणार आहे?"

"तें न करीनात; परंतु मी एकदां ठरविलेल्या पती खेरीज दुसऱ्या कोणाबरोबर लग्न करणार नाहीं! आई, कुमारी सावित्रीनें राजा अश्वपतीला असाच नाहीं का जबाब दिला? आतां इतर पुरुष मला पिता बंधू प्रमाणें आहेत."

मुलीच्या ह्या निश्चयानें सुबल राजा व राणी यांना वरयोजनेंत आपली चूक झाली. असें वाटूं लागलें; परंतु ती दुसऱ्या कोणाबरोबर लग्न करणार नसल्यानें त्यांनीं धृतराष्ट्राबरोबरच तिचा मोठ्या थाटांत लग्नसमारंभ पार पडला.

गांधारीनें ( हेंच राजकन्येचें नांव ) आपल्या उत्तम आचरणानें वडील मंडळींना संतोष दिला. भीष्मांना तर तिच्याबद्दल अत्यंत अभिमान वाटे.

धृतराष्ट्र अंध म्हणून सर्व राज्यकारभार तिचा दीर पंडू हा पहात असे. धृतराष्ट्र वडील असला तरी अंध म्हणून राज्याचा वारस पंडूच ठरला. तो पराक्रमी होता व राज्यकारभारही दक्षतेनें करी. परंतु लवकरच त्याला ब्रह्मशापामुळें राज्य करण्याचा वीट येऊन तो योग्याप्रमाणें रानावनांत भटकूं लागला. वनांत जातांना राज्यसूत्रें त्यानें धृतराष्ट्राच्या हातीं दिलीं. पुढें पंडूला कुंतीपासून वरांमुळें पांच मुलगे झाले तेच पांडव. गांधारीलाही व्यासांच्या चातुर्यानें शंभर मुलगे झाले. परंतु तिचा पहिला पुत्र दुर्योधन जन्माला आला तेव्हां ज्योतिष्यांनीं 'हा कुलनाशाला कारण होईल म्हणून याला आत्तांच टाकून द्या,' असें धृतराष्ट्राला सांगितलें; परंतु त्याला पुत्रमोहामुळें तसें करवलें नाहीं. चतुर गांधारीनें तेव्हांच, व्यास वगैरे शहाण्यांच्या अनुमतीनें पुत्रत्याग करावा असें पतीला ह्मटलें. तथापि त्यानें कोणाचेंही ऐकलें नाहीं. पुढें मुलगा मोठा झाला. आधींच दुर्योधन दुर्गुणी, त्यांत त्याला कर्ण, शकुनी ( मामा ) यांजसारख्यांची संगत असल्यानें तो चारचार करूं लागला. आपली चैन चालण्याकरितां त्यांनीं दुर्योधनास बापापासून हळुहळू राज्यसूत्रें आपल्या हातीं घेण्याची सल्ला दिली. आपलें पोर किती कां वाईट असेना मातापित्यास प्रेमदृष्टीमुळें तें चांगलेंच दिसतें. त्याप्रमाणें मुलानें राज्यकारभारांत मन घालतांच बापाला कौतुक वाटलें. तो पत्नीजवळ त्याबद्दल म्हणालासुद्धां कीं, "झालें बोवा-मी हा असा अंध; परंतु आतां काळजी नाहीं. बाळ दुर्योधन राजकाजांत मन घालूं लागला आहे. तो तर म्हणतो कीं, मी सर्व राज्य चालवीन. मी त्याला सर्व राज्य देऊन स्वस्थ हरिहरि म्हणत बसणार आहें."

"मी बोलूनचालून बायकोमाणूस. पण मला वाटतें त्या अल्लड

पोराच्या हातीं येवढा राज्याचा गाडा देऊं नये. आणखी, भाऊजींचा बाळ धर्म नाहीं का? त्याला आतां आपल्यावांचून कोण आहे बरं?" गांधारीचें हें बोलणें त्या वेळेपुरतें धृतराष्ट्राला रुचलें; परंतु त्याचा स्वभावच चंचल होता. त्याला जो जसें सांगे तसें तो त्या वेळेपुरता करण्यास तयार होई. त्यामुळें त्याचें होई काय कीं घटकेंत विदुराच्या मुठींत तर घटकेंत कर्णशकुनीच्या हातांत.

अखेर गोड गोड थापा देऊन दुर्योधनानें राज्यकारभार तर आपल्या हातीं घेतला. परंतु तें पंडूचें राज्य, त्यांचे पांच पुत्र जिवंत असतां याला कोण पचूं देणार? राज्यांतील मोठमोठ्या लोकांनीं मध्यस्थी करून राज्याचा अर्धा भाग पांडवांना देवविलाच. दुर्योधनाला त्याचें वैषम्य वाटून त्यानें पांडवांचा नानाप्रकारें छळ केला नुसता छळ करूनच तो थांबला नाहीं तर त्यांना ठार मारण्याचे सुद्धां प्रयत्न त्यानें केले; परंतु सत्पक्षाकडे विजय ठेवलेलाच, त्याचें कोणीं वांकडें करूं ह्मणेल तर तें कदापिही होणार नाहीं. या न्यायानें व श्रीकृष्ण भगवान् व संजय यांच्या कृपेनें पांडवांवरील सर्व संकटें टळून ते सुरक्षित राहिले.

गांधारीला दुर्योधनाची ही वागणूक बिलकूल पसंत नव्हती. तिनें त्याची पुष्कळवेळां कानउघाडणी केली, परंतु दुर्योधनाच्या मनावर त्याचा कांहीं एक परिणाम झाला नाहीं.

पांडवांशीं उघड उघड दोन हात करून न्यायानें त्यांच्या पासन राज्य घेतां येईना. तेव्हां दुर्योधनप्रभृती मंडळींनीं कपटद्यूताचा अवलंब करून पांडवांपासून राज्य घेऊन त्यांना वनवासाला पाठविलें. वनवास भोगून परत आल्यावर ते आपला अर्धा हिस्सा मागूं लागले. तो त्यांना देण्याबद्दल भीष्मादिक श्रेष्ठांनीं दुर्योधनास परोपरीनें बोध केला. परंतु तो तिकडे लक्ष न देतां सभेंतून उठून चालता झाला. तेव्हां शिष्टाई करण्यास

आलेल्या कृष्णांनीं धृतराष्ट्राला काय तो जबाब देण्यास सांगितलें. धृतराष्ट्राला संकट पडलें. थोडा विचार करून तो विदुराला ह्मणालाः—

" जा, विदुरा जा; माझा जन्माचा मंत्री गांधारी तिला बोलावून आण. ती मोठी चतुर व मुत्सद्दी असून दुर्योधनाला बोध करण्यायोग्य आहे. दुर्योधन तिच्या इतका कोणाला वचकत नाहीं. "

गांधारीनें सर्व हकीगत ऐकून घेऊन दुर्योधनाला आपल्यासमोर बोलाविलें, व आपल्या अधिकारी वाणीनें ती त्याला ह्मणालीः—

" दुर्योधना, तुला हे भिकेचे डोहाळे कां आठवले आहेत ? बाबारे, वास्तविक हें राज्य पांडवांचं. तुला या राज्याच्या उठाठेवी कां हव्यात ! सत्य व धर्म सोडला कीं त्याच्यापुढें दुःखाचे डोंगर वाढून ठेवलेलेच. सत्यधर्मानें पाहतां राज्यावर हक्क त्यांचाच ! अरे, भाऊजींनीं वनांत जातांना तें इकडच्या हातीं दिलं खरं. पण धर्माला स्मरून वागणें ह्मणजे भाऊजींचे हे पांच मुलगे मोठे होतांच त्यांचं राज्य त्यांना इकडून द्यावयाला पाहिजे होतं. बरं, तेव्हां नाहीं दिलं. पण आतां तरी सगळं नाहीं पण अर्धं राज्य तरी त्यांना देशील कीं नाहीं ? बाबारे, ते पराक्रमी आहेत. सज्जन आहेत. ईश्वरभक्त आहेत. धर्मानुज आहेत. त्यांचं तूं कधींही वाईट चिंतूं नको. दुर्योधना, चित्ररथानं जेव्हां तुम्हाला बंदिवान् केलं तेव्हां त्या अर्जुनानंच ना तुह्माला सोडविलं ! पहा बरं, त्यांचा सरळपणा. बाळ, कोणाचंच कांहींही अनहित केलं कीं तें प्रथम आपल्यापुढं वाढून येतं. तेव्हां हे खुळे विचार सोडून त्यांना अर्धं राज्य दे ह्मणजे तूं खरोखर सुखी होशील. "

अहाहा ! वरील भाषण किती हितकर आहे ! पण तें शुद्धाचरणी साध्वीच्या तोंडून निघालेलें मधुर भाषण पापी दुर्योधनाच्या अपवित्र

कानाला कडूच लागलें. सर्पाला दूध पाजलें तरी त्या दुधाचें विषाखेरीज काय बनणार आहे ! या गोष्टीला अनुसरून दुर्योधन ह्मणालाः—

" आई, या राजकारणांतल्या गोष्टी आहेत. यांत तुझा काय बरें संबंध? बायकांचीं हीं कामें नव्हेत. गृहकृत्यांतील कामें बायकांनीं करावीं. मी कांहीं आतां लहान नाहीं. खेरीज मला सल्ला देणारे माझ्या बरोबरीचे काका काय आणि मामा काय, कर्ण काय आहेतच कीं नाहींत ! मी पांडवांना राज्याचा हिस्सा मुळींच देणार नाहीं. "

आपल्या पोराचें तें भाषण ऐकून गांधारी क्रोधानें लाल झाली. तिचें शरीर थरथर कांपू लागलें. ती कठोर वाणीनें ह्मणाली:–

" महामूर्खा पोरा, तूं कोणापुढें काय बोलतोस ? तुला ठाऊक नाहीं काय, राज्यावर तुझाच काय पण या तुझ्या पित्यांचासुद्धां कांहीं हक्क नाहीं ! तें राज्य मुळीं भीष्म मामंजीचें आहे. त्यांनीं पितृभक्तीमुळें केलेली बिकट प्रतिज्ञा ते पाळतात, ह्मणून; नाहींपेक्षां वाटेल त्याला ते राज्य देतील. रे मूर्ख पोरा, पहा कांहीं डोळे उघडून पहा. अरे, हे तुझे जन्मदाते पिते मला सल्ला विचारतात आणि, व्यवहारशून्या, तूं मला, ' बायकांनीं गृहकृत्येंच पाहावीं ' ह्मणून शिकवितोस काय? पाहिलं महाराज ! मी सांगत नव्हतें का कीं, भलत्याला भलत्या पदावर चढवूं नये म्हणून ? आलीना प्रचिती ? अजून सावध व्हा आणि पुत्रमोह जिंकून मोहाला बळी न पडतां धर्माची कास धरा. याच्या सल्ल्याप्रमाणें वागाल तर आपला व आपल्या कुलाचा नाश करून घ्याल, तुम्ही त्यांना सुखासमाधानानें राज्य न द्याल तर ते ( पांडव ) युद्ध करून तुमच्यापासून जबरीनें राज्य घेणारच. राज्य, स्त्री व धर्म यांच्या झगड्यांत मनुष्य सांपडला कीं, तो जिवाची पर्वा करीत नाहीं. खेरीज, श्रीकृष्ण हा त्यांचा पक्षपाती असल्यामुळें तुम्हाला युद्धांत कधींही जय येणार नाहीं. जिकडे

धर्म तिकडे जय. जिकडे सत्य तिकडे जय. ऐका, महाराज नीट ऐका ! आणि हें नीट मनांत बाळगून त्याप्रमाणें वागा. नेहमींप्रमाणें या कानानें ऐकून त्या कानानें सोडून देऊन शेवटीं अपत्यमोहाला बळी पडूं नका. ”

हें भाषण मुलाविरुद्ध आईनें केलेलें आहे. पण तें सत्य व निःपक्षपातीपणानें भरलेलें आहे. चतुर गांधारीला अपत्यप्रेम नव्हतें का ? होतें. पण तें वात्सल्यप्रेम आंधळें नव्हतें. आपला मुलगा दुर्गुणी आहे तो सद्गुणी व्हावा, न्यायनीतीचा मार्ग त्यानें ओळखावा, याच हेतूनें किंचित् कटु पण सत्य व हितकर असा उपदेश तिनें केला. आतां हा उपदेश प्रिय नसेल ! पण सत्य प्रिय आणि हितकर असें बोलणें बोलतां येणें कठिणच. सत्य व हितकर बोलणें नेहमीं प्रिय असतें असें नाहीं. बहुशः तें अप्रियच असतें. शेवटीं सती गांधारीनें ह्मटल्याप्रमाणें धृतराष्ट्र पुत्रमोहाच्या तडाक्यांत सांपडून युद्धापर्यंत गोष्टी जाऊं देऊन शंभर पुत्रांना आंचवला. आपले सर्व पुत्र धारातीर्थी पडल्याचें ऐकून सती गांधारीला दुःख झालें. कारण म्हटलेंच आहे कीं, ‘ सर्व शोकांत पुत्रशोक फारच बिकट आहे. ’ किती झालें तरी तें मातेचें आंतडें ! आपले शंभर पुत्र मृत्युमुखीं पडून कुलनाश झालेला पाहून तिच्या कोमल मनाला धक्का बसला. तिच्या पोटांत पीळ पडून तिच्या डोळ्यांतून अविरत अश्रू वाहूं लागले. शोकानें विव्हल होऊन एकदां ती पडली असतां तिनें धर्माला बोलावून आणविलें. धर्म तिच्या पुढें येऊन लीनपणें म्हणाला:—

“ मातोश्री, हा पहा मी धर्म आलों आहें. कुंतीसमान पूज्य गांधारीकाकू, मी अत्यंत अपराधी आहें. आपणासारख्या साध्वीला पुत्रशोकानें विव्हळ करणारा हा अधम धर्म आपणापुढें आहे. करा—काकू, या कुलक्षय करणाऱ्या अधमाला शापून भस्म करा. पण नको. देवतेसमान असणाऱ्या काकू, माझ्या पापी देहाला मला पावन करून घेऊं द्या. आपल्या चरणधूलींत मला लोळूं द्या, त्यामुळें मी पावन होईन आणि मग

तुम्हीं शापण्यायोग्य मी होईन." असें म्हणून धर्मानें गांधारीचे पाय घट्ट धरले. त्याचीं तीं सुंदर गौरवर्ण बोटें गांधारीला डोळ्याला बांधलेल्या पट्टयाच्या फटींतून दिसलीं. अहाहा! तिच्या दृष्टीचें सामर्थ्य काय सांगावें? कारण त्यावेळीं रागीट अशी तिची दृष्टि धर्माच्या बोटांवर पडतांच तीं बोटें काळीं व कृश अशीं झालीं. श्रीकृष्ण व इतर पांडव यांना भय पडलें कीं, ही धर्माच्या सर्व शरीराची अशीच अवस्था करते कीं काय! परंतु भगिनीसौभाग्यभार वाहिलेला भगवान् कसला वस्ताद! त्यानें धर्माला मागें ओढलें.

" धर्मा, भ्यालास काय? बाबांनों मी जरी पुत्रदु:खानें जळत असलें तरी अविचारानें तुझाला शापाच्या अग्निकुंडांत ढकलणार नाहीं."

आणि पांडवांचें चंदन उडविण्याचें सामर्थ्य गांधारीच्या वाणींत होतें खरेंच. पण ती वाणी तिला असलें दुष्ट कृत्य करण्यास प्रवृत्त करणारी नव्हती. तिनें अनहिताच्या कामीं त्या पवित्र वाणीचा, त्या दिव्य दृष्टीचा अगर पातिव्रत्यप्रभावाचा दुरुपयोग कधींच केला नाहीं. उलट धर्माला अभय देऊन तिनें त्यास पोटाशीं धरून ह्मटलें:—

" धर्मा, तुलाचरे बाबा अजातशत्रु नांव शोभतें. धर्मा, संजय युद्धाची सर्व बातमी रोज तिकडे सांगे तेव्हां मी ती लक्षपूर्वक ऐकत असें. त्यावरून खऱ्या न्यायानें, खऱ्या क्षात्रधर्मानें तूंच काय तो वागल्याचें माझ्या ध्यानीं आलें. बाकी सर्व एका माळेचे मणी. ते मणि ओवायला तुजवांचून दुसरा कोणीही योग्य नाहीं. अरे, त्या भीमानें माझ्या बाळ दुःशासनाचे रक्ताचे घुटके कीरे घेतले! त्याचप्रमाणें दुर्योधनाला त्यानें लाथ मारली! बाल—बा भीमा, तूं या धर्मनिष्ठ, सत्यनिष्ठ धर्माचा पाठचा भाऊच नारे?"

भीम पुढे यऊन म्हणाला:—

" गांधारीकाकू मी रक्त प्यायलों नाहीं. मातोश्री, या तुझ्या भीमानें ज्यावेळीं दुःशासनानें माझ्या प्रिय निरपराधी द्रौपदीची वेणी धरून हिसकली त्यावेळीं–आई, त्याचवेळीं, तिच्या पाठीवर मोकळे केंस पाहून प्रतिज्ञा केली होती–' याच अधमाच्या–वडील भावजयीच्या केसाशीं झोंबी खेळणाऱ्या अधमाच्या रक्तानें माखलेल्या हातांनीं द्रौपदीची वेणी घालीन. ' सांगा काकू सांगा, अंगीं पराक्रम असतां क्षत्रियानें प्रतिज्ञापराङ्मुख व्हावें काय ? काकू त्या वेळेपासून त्या साध्वी द्रौपदीनें आपल केंस विंचरून वेणी घातली नव्हती. काकू, त्याच-प्रमाणें दुर्योधनानें आमचें कोणतें वाईट करण्याचें बाकी ठेवलें होतें ? मला विष तर घातलें, लाखेच्या घरांत जाळण्याचा तर प्रयत्न केला, भर सभेंत द्रौपदीची अब्रू घेण्याचा प्रयत्न तर केला. त्यावेळीं आम्ही–तिचे पती, या धर्माच्या वचनामुळें जिवंत असून नसल्यासारखेंच होतों ना ? अरेरे ! कोण त्यावेळीं तिजवरचा प्रसंग कठीण ! त्यावेळीं जर तिची अब्रू हा कृष्ण गुप्तरूपानें न राखता तर त्याचवेळीं तिच्या पातिव्रत्याच्या प्रभा-वानें कर्ण, दुर्योधन, दुःशासन वगैरेंची होळी झाली असती ! दुर्योधनानें आमचा कोणत्या प्रकारचा छळ केला, हें तुला ठाऊक आहेका ? त्यानें आम्हाला येथेंच त्रास दिला एवढेंच नव्हे तर वनांत देखील त्यानें आमची पाठ सोडिली नाहीं. "

" कायरे भीमा ! माझा असा एकही पुत्र नव्हता काय कीं, तो तुमच्या वाटेस गेला नाहीं ! भीमा एकच एकचरे मुलगा आह्मां अंधांना आधार ह्मणून ठेवायचा होता ! भीमा, माझ्या सर्वच पुत्रांनीं तुह्माला छळलें होतें नारे ! कसेरे तुह्मी भाऊ असून इतके निष्ठुर झालांत ! त्यांच्याकडे, त्यांच्या वयाकडे तरी तुह्मी बघून ह्मातारपणीं त्यांना आधा-राला शंभर काठ्यांपैकीं एक तरी काठी नीट ठेवावयाची होती ! कृष्णा, तूं आपणाला दीनदयाळ ह्मणून नारे ह्मणवितोस ! मग हीच कारे तुझी

दीनांविषयींची कळकळ! असो. माझें नशीब ! तुम्हांला तरी मीं कां बोल लावावा ? हाय ! हाय! गेले—माझे एक नाहीं दोन नाहीं शंभर पुत्र कालमुखीं पडले ! आतां मीं कोणाकडे बघून दिवस कंठावे ! अरेरे ! ज्या पुत्रांना मी जन्म दिला, मांडीवर घेऊन खेळविलें, त्यांचे लाड केले त्यांनीं मला दुःखांत लोटून जावें ना ? काय ही माझी कर्मदशा ! आतां मी कोणकोणाकरितां तरी रडूं ? " गांधारीच्या डोळ्यांतून अश्रुप्रवाह सुरू झाला.

गांधारीचें वरील पुत्रशोकांचें भाषण ऐकून कोणा सहृदय माणसाच्या डोळ्यांतून टचकन् पाणी येणार नाहीं ? इतका कोण कठोर अंतःकरणाचा असेल ? धर्माच्या डोळ्यांतून अश्रु आले यांत कांहीं नवल नाहीं; परंतु सर्वज्ञ असा श्रीकृष्ण भगवान् तोही शेल्याच्या पदरानें अश्रु पुसूं लागला. शेवटीं गांधारीनें विवेकानें आपलें मन घट्ट केलें व आपला शोक आवरला; तथापि, पुत्रांचें दर्शन घेण्याची तिला उत्कंठा लागली होती. ती म्हणालीः—

" चल, या नाटकाच्या सूत्रधाऱ्या कृष्णा चल—मला माझ्या मुलांची शवें तरी पाहूं दे. "

श्रीकृष्णांनीं गांधारीला तेथें नेलें. तिनें रक्तबंबाळ व धुळीनें माखलेल्या आपल्या पुत्रांच्या शवांना कवटाळिलें. परंतु शाबास तिची ! तिनें तळतळून एकाही पांडवाला शिव्याशाप दिले नाहींत ! एवढेंच काय परंतु शत्रुपुत्र अभिमन्यु यालाही कवटाळून अत्यंत शोक केला. त्याच्या पराक्रमाचे गुणानुवाद गात गात तिनें त्यास आपल्या अंकावर घेतलें. त्याचे गुण ती आठवूं लागलीः—

" बाळा, कायरे तुझा पराक्रम सांगतात ? पाडसा, तुझ्या या सुकुमार शरीरानें अनेक वीरांना जेरीस आणिलेंना ? धन्य ! सुभद्रे, धन्य तुझा कुसवा ! बाई उत्तरे, तुझा पति जरी हा लोक सोडून गेला तरी तो

कीर्तिरूपानें या भूमंडळावर जिवंतच नाहीं काय ? आवर, मुली शोक आवर. ”

नंतर धर्माच्या इच्छेप्रमाणें ती माउली त्यांचें कल्याण चिंतीत त्याजपाशींच राहिली. धन्य आत्मसंयमनाची ! धृतराष्ट्र अनेक वेळां पांडवांना संतापून बोले परंतु तिनें त्यास वारंवार बोध करावा व आपल्या दुर्वर्तनानें ते ( पुत्र ) प्राणाला मुकले. ते जर सद्वर्तनी असते तर ते आज हयात असते व सुखानें अर्धें राज्य चालविते. धृतराष्ट्रानें लोहभीमाचें चूर्ण केलें तेव्हां तिनें त्या दुष्ट वासनेबद्दल त्याची बरीच निर्भत्सना केली. केवढा हा निःपक्षपातीपणा ! यालाच म्हणतात मोठें मन !

असो. गांधारीची वागणूक खरोखर वाखाणण्यासारखी होती. ती सत्यमार्गी होती. ती रोज प्रातःकाळीं डोळ्यांना पडदा बांधी. पतीसाठीं नेहमीं डोळे बांधून राहणें ही गोष्ट सामान्य नव्हे. आणि म्हणूनच तिच्या दृष्टींत विलक्षण सामर्थ्य आलें होतें. ज्याप्रमाणें ती रागानें पहात असतां धर्माचीं बोटें काळीं ठिक्कर पडलीं त्याप्रमाणेंच तिच्या दृष्टींत–ती जर प्रसन्न असेल तर–वज्रदेही बनविण्याचें सामर्थ्य होतें. आणि याचसाठीं दुर्योधनास वज्रदेही बनविण्यासाठीं तिनें त्यास नग्न स्थितींत आपल्या खोलींत येण्याविषयीं बजाविलें. ही गोष्ट श्रीकृष्णाला समजून त्याला चिंता पडली. स्वारी लगबगीनें दुर्योधानास गांठून म्हणाली:—

“ कोण दुर्योधन ! आणि तूं अशा नग्न स्थितींत, वेड्यासारखा चाललास कोठें ? ”

दुर्योधन थोडासा गुटमळला; परंतु शेवटीं त्यानें खरें कारण सांगितलें. तो म्हणाला:—

“ कृष्णा, माझी आई गांधारी हिची समर्थ झालेली दृष्टि या माझ्या नाशवंत देहावरून फिरवून घेतों. कृष्णा, तिची प्रेममय दृष्टि जर माझ्या

अंगावरून फिरेल तर मी वज्रदेही होईन. मग हा पठ्ठ्या कोणाही शंभूपुढें छाती ठोकून जाईल. बस्स. मग युद्धांत शस्त्र लागून मरण्याची भीतिच नाहीं. "

खुळा, दुर्योधना तूं सर्वस्वी खुळा ! बाबारे, माता आपल्या तान्हुल्याची किंचित् कमी काळजी घेत असेल; परंतु श्रीकृष्ण आपल्या प्राणापलीकडेही त्या सद्गुणी पांडवांचें रक्षण करीत असे. त्याच्यापाशीं तूं हें सांगितलेंस ! अथवा मग प्राक्तन प्राक्तन म्हणून म्हणतात तें काय ? हें रहस्य जर तूं न फोडतास तर भीम तुझे प्राण कसे घेता ? असो. कृष्णानें मान डोलवित म्हटलें:—

" बाबारे, हंसावें कां रडावें तुझ्या अज्ञानाला ? महामूर्खा ! जन्मदात्या आईपुढें आतां तूं तिच्या बरोबरीचा झालेला मुलगा नग्न उभा राहणार ! हें पहा दुर्योधना, एकंदरींत तुला विचारच कमी ! बरें झालें मी तुला भेटलों म्हणून. नाहींतर तूं असाच आईपुढें जाऊन उभा राहतास आणि मग ती तुझ्यावर रागावतीसुद्धां. "

" अरे कृष्णा, तिनेंच मला उघडा ये म्हणून बजाविलें आहे ! "

" होय, कबूल तूं म्हणतोस तें. पण त्याचा अर्थ असा नाहीं. तूं जा उघडाबोडकाच, पण हें पहा हा एवढा फुलांचा मांडचोळणा माझ्यापाशीं आहे तेवढा घांलून जा. "

असें म्हणून कृष्णानें त्याला तो मांडचोळणा दिला व दुर्योधन गांधारीच्या महालांत जाईपर्यंत तो तेथें उभा राहिला. काय करतो ! पांडवांनीं भक्तिरज्जूनें जखडून टाकिला होता ना ?

दुर्योधन गांधारीपुढें गेला. तिनें त्यास पहातांच म्हटलें:—